मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

ISSN 0973-8452

मराठी अर्थशास्त्र परिषद

नियतकालिक

(त्रैमासिक)

# अर्थसंवाद

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

भारतीय सौर आश्विन – मार्गशीर्ष १९४२

ऑक्टोबर–डिसेंबर २०२० / खंड ४४, अंक ३

# ‘अर्थसंवाद’च्या लेखकांसाठी महत्त्वाच्या सूचना

१. लेखकांनी आपले शोधनिबंध Shree Lipi (२३३५) किंवा Kruti Dev किंवा Unicode यापैकी कोणत्याही Font मध्ये Pagemaker किंवा Ms Word मध्ये टाईप करून पाठवावा. या व्यतिरिक्त कोणताही Font वापरू नये.

२ **संशोधनपर लेखाची प्रत अथवा सीडी पोस्टाद्वारे पाठवू नये.** काही अडचण असल्यास संपादकांशी संपर्क साधावा.

३. **संशोधनपर लेखाची एक सॉफ्ट कॉपी (एक मूळ फाईल व त्याचीच PDF केलेली फाईल अशा दोन फाईल्स्) ई-मेल द्वारे प्रमुख संपादकांकडे rahulmhopare@rediffmail.com या ई-मेल ॲड्रेसवर पाठवावी.** लेखासोबत संपादकांना लेख पाठवल्याची स्वाक्षरी केलेली कव्हर नोट स्कॅन करून पाठवावी. तसेच ई-मेल केल्यानंतर संपादकांशी भ्रमणध्वनीवर (९९२३८७९०२०) संपर्क साधून आपला ई-मेल व्यवस्थित पोचल्याची खात्री करून घ्यावी.

४. संशोधनपर लेख पूर्वमुद्रित नसावा. त्यामध्ये कॉपीराईटचा भंग न करता संदर्भाचा उल्लेख करावा. आजीव सभासद क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल लिहिणे आवश्यक आहे.

५. लेखाच्या शीर्षकाखाली लेखकांनी स्वत:चे संपूर्ण नाव देवनागरीतूनच लिहावे.

६. संशोधनपर लेख खास अर्थसंवादसाठीच लिहिलेला असावा. माहिती व आकडेवारी अद्ययावत असावी. लेखात गरजेनुरूप सांख्यिकीय तक्ते व आलेखांचा वापर केल्यास उत्तम. लेखांची गुणवत्ता पाहून तज्ज्ञ परिक्षकांनी केलेल्या सर्व सूचनांची पूर्तता केल्यानंतरच त्याची प्रसिद्धीसाठी निवड केली जाईल.

७. भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या अर्थशास्त्र परिभाषा कोश यातील परिभाषेचा उपयोग करावा. संपादकांना पाठवलेल्या कव्हर नोटसह लेखनाची एक प्रत स्वत जयळ अवश्य ठेवावी.

८. लेखकांनी कृपया संशोधनपर लेख टाईप केल्यानंतर सर्व सांख्यिकी माहिती, शुद्धलेखन आणि व्याकरण अचूक तपासून नंतरच अंतिम प्रत पाठवावी.

९. संदर्भ सूची देताना पूढील पद्धतीने देणे आवश्यक आहे : उदा. पाटील, ज.फा., सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्राची बदलती अर्थव्यवस्था, सकाळ पेपर्स लिमिटेड, पुणे, २०१०, (पृष्ठ क्रमांक असेल तर द्यावा.)

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।
www.marthpari.org
(स्थापना वर्ष - १९७७)

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये।
शोधचर्चाविवादार्थं संवादोऽयं प्रवर्तितः।।

# अर्थसंवाद

(तज्ज्ञ परिक्षित नियतकालीक)

Reg.No. 31918/77 / ISSN 0973-8452

ऑक्टो.-नोव्हें.-डिसेंबर २०२०/ खंड ४४ / अंक ३

**प्रमुख संपादक**
**राहुल शं. म्होपरे**
(देवचंद कॉलेज, अर्जुननगर)

**सहाय्यक संपादक**
**चंद्रकांत जाधव**
(य.च.वारणा महाविद्यालय,वारणा नगर)

**सल्लागार मंडळ**
**(२०१८-२१)**
**जनार्दन काकडे**
**राजू शिंदे**
**अजय दरेकर**
**मोहन सदामते**

**संपादकीय पत्रव्यवहार**
**राहुल शं. म्होपरे**
'सर' निवास, री.स.नं. ३३/क/२,
प्लॉट नं. १८, लेक व्ह्यू कॉलनी,
दीपा गॅस गोडावूनच्या पाठीमागे,
उजळाईवाडी, ता. करवीर,
जि. कोल्हापूर - ४१६ ००४
भ्रमणध्वनी : ९९२३८७९०२०

**लेखातील मते लेखकांचीच**

## अ नु क्र म णि का

१. श्रीनिवास खांदेवाले
भांडवलशाही उत्पादन प्रणालीत शेतीचा प्रश्न ............... २०३

२. वसंतराव जुगळे, योजना जुगळे
अतिवृद्धी-अभिवृद्धी सहसंबंधातील पेचप्रसंग ............... २१३

३. प्रशांत हरमकर
अर्थशास्त्राचे २०२० चे नोबेल स्मृती पारितोषिक :
लिलाव सिद्धांत व संबंधित प्रारूपांना ....................... २३३

४. वंदना उत्तम कटारे
महिला आणि स्थलांतर .................................. २४६

५. एम. एच. शिंदे
महाराष्ट्रातील शेती उत्पन्नातील प्रादेशिक तफावती .......... २५४

६. आर.जे. इंगोले
भारतातील शेती आधारित उद्योगांतील संधी आणि समस्या.. २६६

७. मंजूषा मुसमाडे : पुस्तक परिचय
आर्थिक जाणीव समृद्ध करणारे अर्थजागर ................. २७३

८. जे. एफ. पाटील : पुस्तक परिचय
आर्थिक जगत ............................................ २७७

९. शि. ना. माने : अर्थ शब्दांची वाट पाहे...
विकास (Telescopic Development) .......................... २७९

१०. संतोष दास्ताने : अर्थ शब्दांची वाट पाहे...
बॅड बँक BAD BANK .......................................... २८१

११. मारोती वि. तेगमपुरे - कार्यवाह-खजिनदार, म.अ.प.
राष्ट्रीय वेबसंवाद अहवाल .................................. २८३

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### कार्यकारी मंडळ २०१९-२०

● **अध्यक्ष**
**अनिल बा. सूर्यवंशी (सोलापूर)**

● **कार्याध्यक्ष**
**कैलास के. पाटील (परभणी)**

● **कार्यवाह खजिनदार**
**मारोती वि. तेगमपुरे (अंबड)**

● **प्रमुख संपादक-अर्थसंवाद**
**राहुल शं. म्होपरे (कोल्हापूर)**

● **विश्वस्त**
**आप्पासाहेब पुजारी (मंगळवेढा)**
**रामकृष्ण टाले (नागपूर)**
**अजय दरेकर (बारामती)**

● **सदस्य**
**विजय भोपाळे (नांदेड)**
**स्नेहा देशपांडे (नागपुर)**
**बळवंत कोरे (कराड)**
**गणेश मांगडे (दापोली)**
**माधव शिंदे (अहमदनगर)**
**सुरेश ढाके (भुसावळ)**
**शिवाजी काकडे (बीड)**
**अरुण पिसे (धुळे)**
**राजाराम पाटील (सोलापूर)**
**दयाळू राठोड (अकोला)**
**मनीषकुमार कायरकर (बल्लारपूर)**

● **स्वीकृत सदस्य**
**जयवंत इंगळे (विटा)**
**गोरक्षनाथ सानप (संगमनेर)**

● **स्थानिक कार्यवाह**
**संजय जगदेव कोठारी (नांदगाव)**



**कार्यालयीन पत्रव्यवहार:**
(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)
मुद्रक-प्रकाशक : **मारोती वि. तेगमपुरे**
कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,
'संगाई', घर नं. २२, शहीद भगतसिंग नगर, भालचंद्र पेट्रोल पंपाच्यामागे, पारनेर रोड, अंबड, जि. जालना.
पिन - ४३१ २०४ भ्रमणध्वनी: ९४२३९९३१३७


**अर्थसंवाद वर्गणी :**

■ **परिषदेचे सदस्य :**

| | |
|---|---|
| आजीव सदस्य | : रु.३०००/- (एकरकमी) |
| इमारत निधी | : रु.२०००/- |
| सदस्य सूची | : रु. १००/- |
| एकूण | : रु. ५१००/- |

■ **संस्था सदस्य व अर्थसंवाद वर्गणीदार:**

| | |
|---|---|
| शैक्षणिक संस्था<br>व्यावसायिक संस्था<br>ग्रंथालये | रु.२०००/-(त्रैवार्षिक)<br>रु.३०००/-(पंचवार्षिक) |

■ **वर्षगणना :** १ एप्रिल ते ३१ मार्च

■ संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.

■ कृपया आजीव सदस्य वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच कार्यवाहांकडे पाठवावी.

■ अर्थसंवादची वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्ट किंवा NEFT (BOI खाते क्र. 094720110000368, IFSC - BKID0000947, राजारामपुरी, कोल्हापूर) द्वारे प्रमुख संपादकाकडे पाठवावी.

■ मनीऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.


**अर्थसंवादसाठी अनुदानाबद्दल आभार:**
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.


टिप: म. रा. सा. सं. मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.


हे त्रैमासिक, प्रकाशक मारोती वि. तेगमपुरे (प्रमुख संपादक राहुल शं. म्होपरे) यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता भारती मुद्रणालय, शाहुपुरी, कोल्हापूर येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, शहीद भगतसिंग नगर, भालचंद्र पेट्रोल पंपाच्यामागे, पारनेर रोड, अंबड - ४३१ २०४ येथे प्रसिद्ध केले.

# भांडवलशाही उत्पादन प्रणालीत शेतीचा प्रश्न

**श्रीनिवास खांदेवाले** †

**प्रास्ताविक**

मानव समाजाची सांस्कृतिक प्रगती कृषी उत्पादनामुळेच झाली. रोज शिकारीच्या मागे धावणे व नाशवंत फळांसाठी सगळ्या ऋतुंमध्ये जंगलात फिरणे, हे त्याला धान्योत्पादनामुळे टाळता आले. धान्य साठविण्यामुळे अन्न साठविणे शक्य झाले. त्यामुळे सांस्कृतिक प्रगतीसाठी भौतिक आधार आणि मोकळा वेळ मानवी समाजाला मिळाला.

सामान्य शेतकरी व त्यांच्या शेतीच्या उत्पन्नापासून मिळणारे जीवनमान ह्या दृष्टीने विचार केल्यास आपल्याला साधारणपणे तीन पद्धतींचा विचार करावा लागेल. एक पद्धती बलुतेदारीची, दुसरी पद्धती सरंजामशाही आणि तिसरी पद्धती जागतिकीकृत भांडवलशाहीतील निर्याताभिमुख बाजार पद्धती. पहिल्या दोन पद्धती कालानुक्रमे एकी नंतर दुसरी अशा अनन्य (Exclusive) नसून गतकाळात सोबतही अस्तित्वात असलेल्या दिसून येतात. अभ्यास पद्धती म्हणून पाहिल्यास असे म्हणता येईल की जग २१ व्या शतकाच्या तिसऱ्या दशकात जागतिकीकरणा (खाऊजा) पासून मागे हटत आहे. मुक्त व्यापाराचे प्रचलन करणारे जागतिक व्यापार संघटन गेल्या १०-१५ वर्षांत कृषी व्यापारासंबंधी काहीच प्रगती करू शकले नाही. भांडवलशाहीच्या अशा अवस्थेत शेतमालाच्या व्यापाराचे व शेतकऱ्यांच्या (शेतमजुरांच्या-ग्रामीण कारागिरांच्या, वन-मजुरांच्या) राहणीमानाचे प्रारूप व आश्वासकता काय आणि त्याचा आर्थिक सिद्धांत काय, असा प्रश्न निर्माण होतो.

एक अनुमान असे बांधता येईल की, समाज टोळी पद्धतीने राहात असताना राज्यव्यवस्था व शेती विकेंद्रित होती. राजेशाही व सरंजामशाही अंमलात आल्यानंतर नागरीकरण, राज्य व शेती व्यवस्थांचे केंद्रीकरण सुरू झाले व वाढले. पूर्वी रस्ते व दळणवळणाच्या सोयी अत्यंत कमी[१] असल्यामुळे खेड्यांतील शेतीव्यवस्था बऱ्याच प्रमाणावर धान्य-विनिमय, श्रम-विनिमय आणि पशुश्रम-विनिमय ह्यावर चालत असे. त्या व्यवहारांचे मौद्रीकरण झालेले नव्हते. वंचितता हा त्या परिस्थितीचा नकारात्मक पैलू होता तर सहकार्य हा सकारात्मक पैलू होता. अशा ग्रामीण समाज जीवनातील नकारात्मक पैलू (शिक्षणाचा अभाव, औद्योगिक शिक्षणाचा अभाव, आरोग्य

† माजी अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद, आजीव सभासद क्र. १०९
भ्रमणध्वनी : ०७४४७५६१५४४, ई-मेल : shreenivaskhandewale12@gmail.com

सोयींचा अभाव इत्यादी) शून्य करता आले तर ग्रामीण जीवन (शेती व ग्रामोद्योग विकास ह्यांच्या आधारे) स्वयंपूर्ण होईल असे गांधीजींना वाटले असेल तर त्यात काही अशक्य किंवा अतिशयोक्ती वाटू नये.

**साम्राज्यवाद, कृषी-निर्यात आणि शेती**

साम्राज्यवाद हा भांडवलशाहीचाच अर्क असलेला आविष्कार आहे. साम्राज्यवादाच्या पहिल्या पर्वात ब्रिटिश सत्ता भारतात शिरल्याबरोबर शोषणाद्वारे येथून वरकड (सरप्लस) मूल्य इंग्लंडला पाठविणे व त्यासाठी विविध क्षेत्रे शोधणे सुरू झाले. न. चिं. केळकर आपल्या 'मराठे व इंग्रज' ह्या ग्रंथात लिहितात की, १६९० सालच्या एका खलित्यात कंपनीच्या अधिकाऱ्यांनी असे लिहिलेले आढळते की : ''व्यापाराच्या नफ्याइतकाच इतर रीतीने वसूल मिळविण्याकडे आम्ही लक्ष दिले पाहिजे. राजसत्ता स्थापल्याशिवाय हा वसूल कसा मिळणार? समजा, उद्या व्यापार थांबला तर? व्यापार थांबला तरी आपला पाय हिंदुस्थानातून निघता कामा नये व हे व्हावयाचे तर खंबीर पायावर चिरकाल टिकण्यासारखे असे राज्यच आम्हांस हिंदुस्थानात स्थापणे जरूर आहे.''[२] तसे त्यांचे राज्य स्थापलेही गेले. पण ब्रिटिशांनी शेती आणि शेतकऱ्यांविषयी काय केले? त्या विषयाचे एक अभ्यासक एम. अझिझुल हक म्हणतात की, मोगल शेतसारा पद्धतीवर इंग्लिश सरंजामशाही जोडली गेली. मोगल शेतसारा पद्धतीमध्ये कसणाऱ्याला जमीन; जमिनीच्या व कसणाऱ्याच्या मगदुरानुसार महसूल; राज्याच्या महसुलाच्या मागणीची कायम निश्चिती (Permanent settlement of revenue demand) पूर, दुष्काळ इत्यादींमध्ये वसुली तहकूब; राजा हा राज्यातील जमिनीचा मालक नसून शेतसाऱ्याचा मालक; राजालासुद्धा त्याच्या वापरासाठी जमीन विकत घ्यावी लागत असे; उत्पादनातून शेतकऱ्याच्या कुटुंबाचा खर्च व पुढच्या पेरणीपर्यंतचा खर्च विचारात घेऊन उरलेल्या उत्पन्नाचा ठरावीक भाग शेतसाऱ्याच्या रूपाने तिजोरीत जाई; संकटाच्या वेळी (शेतीची कसणूक सुरळीत सुरू राहावी म्हणून आणि इस्लाममध्ये व्याज नसल्यामुळे) शेतकऱ्यांना व्याजमुक्त कर्ज देण्यात येत असे; जमीनदार हा महसूल गोळा करणारा अधिकारी होता व गोळा केलेल्या शेतसाऱ्याचा भाग त्याला मिळे. तो जमिनींचा मालक नव्हता.''[३]

मूळ भूमिका ही होती की जमीन, जंगले आदि संसाधने ही निसर्गाने मानवाला दिली आहेत; माणूस त्या संसाधनांचा मालक नाही, उपयोगकर्ता (User) आहे. त्याने उपयोग-दाम (User Charges) शेतसाऱ्याच्या रूपाने राज्यास द्यावे; जेव्हा तो शेतसारा देणार नाही तेव्हा ती जमीन मोकळी आहे असे समजण्यात येईल. कदाचित आपण सगळे उपयोगकर्ते आहोत ह्या भावनेने आदिवासी समाज अवस्थेत एकमेकांशी सहकार्य करणे कठीण जात नव्हते. ह्यासंबंधी ब्रिटिश विचार असे विकसित झाले होते की, ''जे. एस्. मिलच्या वक्तव्यानुसार, जमिनीची खासगी मालकी देण्याचे एकमेव प्रयोजन ती व्यक्ती जमिनीत सुधारणा करते का, हे होय. ती त्या जमिनीवर बिनकामाची बसून राहावयास नको.''[४]

ब्रिटिशांनी भारतात जमीनदारांना शेतसारा गोळा करण्याचे ठेके दिले. जमीनदारांनी महसूल संकलनासाठी तीन-चार स्तरांचे उप-संकलक निर्माण केले आणि त्या सर्वांच्या परिश्रमिकाचा बोजा शेतकऱ्यांकडून वसूल केला जात असल्यामुळे (बेसुमार फुगणाऱ्या महसूल वसुलीमुळे) सामान्य शेतकरी अतिशय गरीब झाला. ब्रिटिश सत्ता (१९४७ पर्यंत) असेपर्यंत शेतकरी वर्ग गरीबच राहिला, उत्पादकता वाढीचा मुद्दा दूरच राहिला. त्याचे एक महत्त्वाचे

कारण म्हणजे शेत जमिनीची शोषक मालकी व शोषक शेतसारा प्रणाली, हे होय. म्हणजे मोगल पद्धतीची माफक महसूल मागणी आणि ब्रिटिशांचे उत्पादकता वाढीचे तत्त्व ह्या दोन्हीपासून भारतीय शेतकरी वंचित राहिला. त्या दारिद्र्याचे निर्मूलन अजून झालेच नाही.

ब्रिटिश वसाहतवादाने वऱ्हाड (अमरावती विभाग) मधील कापूस शेतकऱ्यांची कशी लूट केली व त्याचे वऱ्हाडच्या ग्रामीण दारिद्र्यात कसे रूपांतर झाले ह्याचा आढावा डॉ. लक्ष्मण डी. सत्या ह्यांच्या (1) Cotton and Famine in Berar : 1850-1900 (2) Ecology, Colonialism and Cattle (Central India in the Nineteenth Century) आणि (3) Medicine, Disease and Ecology in Colonial India (The Deccan Plateau in the 19th Century) ह्या ग्रंथांच्या आधारे घेऊ. २०२० मध्ये जेव्हा आपण शेतकऱ्यांच्या दारिद्र्याची चर्चा करतो तेव्हा शेतमालाच्या किंमती महत्त्वाच्या आहेतच. पण त्यापूर्वी सरकार शेती उत्पादन प्रणालीला शोषणमुक्त करते की नाही हेही तपासले गेले पाहिजे.

डॉ. सत्यांनी ह्या तिन्ही इतिहासविषयक शोधग्रंथांत पश्चिम विदर्भाच्या शेतीचा (पूर्वीचा वऱ्हाड, इंग्लिश अपभ्रंश बेरार, आजचा अमरावती विभाग म्हणजे अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशिम, यवतमाळ जिल्हे) वसाहतवादाच्या परिणामांच्या अंगाने अभ्यास केला आहे.

पहिल्या ग्रंथात ते नोंदवितात की, १८६१-६५ दरम्यान दक्षिण अमेरिका व उत्तर अमेरिका ह्यांच्यात गुलामगिरीच्या प्रश्नावर गृहयुद्ध झाल्यामुळे दक्षिण अमेरिकेचा कापूस ब्रिटिश कापड गिरण्यांना मिळणे बंद होऊन बेरोजगारी फैलू लागली. त्याच्या आधीच कापसाचा पुरवठा ताबडतोब सुरू करण्यासाठी ब्रिटिश सरकारने सगळ्या वसाहतींचा आढावा घेतला असता त्यांना जमीन, हवामान, उत्पादित होणाऱ्या कापसाचा दर्जा ह्या सर्व दृष्टींनी वऱ्हाड सगळ्यात चांगला प्रदेश वाटला. लागलीच त्यांनी १८५४ मध्ये मुंबईत सुरू झालेली रेल्वे (देशात सर्वात आधी) नागपूरपर्यंत आणली. त्यामुळे वऱ्हाडचा कापूस मुंबईतून लँकेशायरला जाऊ लागला आणि वऱ्हाडची अर्थव्यवस्था एकदम जागतिक भांडवलशाहीशी जोडली गेली. लागलीच कापसाचे भरघोस वाढलेले भाव, कापसाखालील जमीन, जिनिंग-प्रेसिंग-कापड गिरण्या उद्योग, सोलापूरपासूनचे दखनी मजूर येऊन, अचानक स्वप्नातीत श्रीमंती आली. 'वऱ्हाड-सोन्याची कुऱ्हाड' हा वाक्प्रचार बहुधा त्याच काळातला असावा.

परंतु ह्या श्रीमंतीची नकारात्मक बाजू अशी की कापसाच्या लागवडीसाठी इतर पिकांची लागवड कमी केली गेली; जंगले कापली गेली; चराईच्या जमिनी कापसाखाली आणल्या गेल्या; हलक्या पडीत जमिनी इनाम देऊन त्या लागवडयोग्य करून कापसाखाली आणण्यासाठी (जमीनदार वर्गासारखा) सरकारी जमिनी भाडेपट्ट्याने कसणारा खातेदार व इजारदार वर्ग निर्माण केला गेला; जास्त पावसाच्या (धान पिकविणाऱ्या) चंद्रपूर-भंडारा जिल्ह्यांमध्येही सरकारने कापसाचा विस्तार केला. कापसाच्या विस्ताराबरोबर खेड्यापर्यंत दुकानदारी-सावकारी-कापूस व्यापार करणारा इतर प्रदेशातील वर्ग स्थायिक झाला. तो पीक गहाण घेऊन शेतकऱ्यांना कर्जेही देऊ लागला. पण बाजारात त्याच्या कापसाला कमी नफा मिळाला तर तो शेतकऱ्यांकडून घेण्यात येणाऱ्या कर्जातून भरून काढत असे. गावांमधील बलुतेदार, भागीदार पद्धती बंद केल्यामुळे खालच्या स्तरावरचा आर्थिक आधार संपला. इतर कुठलाही औद्योगिक विकास सरकारने घडवून आणला नाही. त्यामुळे खेड्यातला शेती नसलेला माणूस शेतमजूरच बनला. ब्रिटिशांनी कायद्याने नोंदविलेले, थेट सरकारला महसूल देतील ह्या अटीवर, खातेदार

निर्माण केले. त्यामुळे सरकारचे महसुलावरचे आणि शेतीवरचे नियंत्रण वाढले. खातेदार उत्पादकता वाढविण्याला किंवा कोणाला भागीदारीत सांभाळायलाही जबाबदार नव्हते.

धान्य पिके जमिनीच्या पृष्ठभागालगतच्या ओलाव्यावर पीक देतात. कापूस सुमारे आठ फुटापर्यंतचा ओलावा शोषून घेतो. त्यामुळे कापसाचे क्षेत्र वाढल्याबरोबर भूगर्भातील पाणी कमी झाले. नाले, विहिरी व नद्याही कोरड्या होऊन वारंवार दुष्काळ पडू लागले. गृहयुद्ध संपून अमेरिकन कापूस ब्रिटनला मिळू लागल्यामुळे (ब्रिटन-अमेरिका अंतर कमी असल्यामुळे) वऱ्हाडच्या कापसाची मागणी व किंमत कमी झाल्यामुळे औटघटकेची सुबत्ता संपून वऱ्हाड (आणि नागपूर विभागामध्ये) दुष्काळ, बेरोजगारी, गरिबी, अनारोग्य, मृत्यू ह्यांचे थैमान पाहावयास मिळाले.[५]

वर नमूद केलेल्या त्यांच्या दुसऱ्या ग्रंथात डॉ. सत्या नोंदवितात की वने, गवताळ जमिनी आणि चाऱ्याची पिके ह्या सर्वांवर कापूस पिकाचे अतिक्रमण झाल्यामुळे वाढलेल्या पशुसंख्येला चारा व पाणी मिळणे दुरापास्त झाले. त्यामुळे पशुंची रोग-प्रवणता वाढली. जमीन उघडी झाल्यामुळे पावसाचे प्रमाण इतके कमी झाले की, हिवाळी पिकांना भूगर्भातून पुरेसा ओलावा मिळत नसल्यामुळे अर्थव्यवस्था एका पिकाची (खरीप) होऊन दैन्य वाढले. मात्र ब्रिटिश सरकारची कागदपत्रे हे मान्य करीत नव्हती की शासनाने कापूस लागवड वाढविल्यामुळे दुष्काळ वाढले होते. उदाहरण म्हणून, अकोला जिल्ह्यातील वाशिम तालुक्याच्या १८७२-७३ व १८९८-९९ ह्या रेव्हेन्यू सेटलमेंट अहवालानुसार, त्या २६ वर्षांत प्रतिव्यक्ती घर (हिस्सा) प्रतिव्यक्ती कृषि-गुरांची संख्या, प्रतिव्यक्ती गाई व म्हशींची संख्या, प्रतिव्यक्ती बैलगाड्यांची संख्या (हिस्सा), प्रतिव्यक्ती विहिरींची संख्या (हिस्सा), प्रतिव्यक्ती लागवडीखालील जमीन (एकर) हे सगळेच चल कमी झाले होते. म्हणजे प्रगतीच्याऐवजी अधोगती झाली होती.[६]

तिसऱ्या ग्रंथात डॉ. सत्या नजरेस आणून देतात की ब्रिटिश राजवटीने वऱ्हाडमधून रेल्वेच्या साहाय्याने कापूस व धान्य बाहेर नेऊन स्वस्त कारखानी वस्तू आतपर्यंत आणल्या. त्यामुळे स्थानिक उद्योग बंद पडले. धान्याचा तुटवडा जाणवू लागल्याचे जिल्हा अहवालांनीसुद्धा नमूद केले. शेतसाऱ्याच्या रूपाने ब्रिटिश साम्राज्यवादाने वऱ्हाडचे किती शोषण केले हे १९ व्या शतकाच्या तुलनात्मक आकडेवारीवरून कळून येते. १८८० च्या दुष्काळ अहवालात (रिपोर्ट ऑफ दि इंडियन फॅमिन कमिशन, लंडन, १८८०, प्रकरण III विभाग I) ब्रिटिश इंडियाच्या वेगवेगळ्या प्रांतांत शेतसाऱ्याचे ओझे सरासरी प्रतिव्यक्ती इंग्लिश पौंडाच्या दहाव्या भागात (इन डेसिमल्स ऑफ वन इंग्लिश पौंड) मोजून पुढीलप्रमाणे होते : पंजाब ०.११, वायव्य प्रांत व अवध ०.१४, बंगाल ०.०७, मध्यप्रदेश ०.०७, वऱ्हाड (बेरार) ०.२३, मुंबई ०.१९, मद्रास ०.१०, ह्यावरून दिसून येते की, वऱ्हाडचे शेतसाऱ्याच्या रूपाने शोषण देशात सर्वात जास्त होते. कापसाच्या लागवडीला मजूर सतत लागत असल्यामुळे जनगणनेनुसार वऱ्हाडमधील प्रति चौरस मैल (म्हणजे १.५ कि.मी.) लोकसंख्येची घनता १८५८ च्या ६५ वरून १९११ मध्ये १७२ पर्यंत वाढली. अमेरिकेच्या गृहयुद्धानंतर भारतीय कापसाच्या किमती घसरल्यामुळे वऱ्हाडमधील जनता बेरोजगार व गरीब झाली.

विविध प्रकारचे ताप आणि मृत्युच्या इतर सर्व कारणांनुसारही स्वच्छता आयुक्तांच्या १८९२ च्या अहवालानुसार दर हजार व्यक्तींमागे मृतांचा आकडा (मद्रास १०, पंजाब ८, मध्यप्रदेश ७, वऱ्हाड (बेरार)

११, सरासरी ९) देशभराच्या तुलनेत सर्वाधिक होता. दुष्काळी व इतर वर्षांत वऱ्हाडातील जास्त मृत्युंची कारणे समानच होती. ती म्हणजे अवाजवी किमती, अन्नधान्याची टंचाई, प्रदुषित पाणी, अस्वच्छ राहणीमान, गरिबी आणि दुर्लक्ष्य.[७]

वरील तीनही पुस्तकांच्या आढाव्यातून पुढील गोष्टी अधोरेखित होतात : (१) साम्राज्यवादाने देशात सगळ्यात जास्त शोषण वऱ्हाडच्या शेतकऱ्यांचे केले. (२) सगळ्या शोषणाचा अंतिम परिणाम दारिद्र्य व अपमृत्यूच असतो. आजही शेतकऱ्यांच्या आत्महत्या देशात सर्वात जास्त महाराष्ट्रात आहेत. पण त्यांचे मुख्य केंद्र वऱ्हाडात म्हणजे अमरावती विभागात आहे, हे समजावून घेणे आवश्यक आहे. (३) एकीकडून शेतमालाला किंमत जास्त मिळाली पण दुसरीकडून ती काढून घेतली तर शोषण चालूच राहते म्हणून किंमत जेवढी महत्त्वाची ठरते तेवढीच अशोषक प्रशासकीय व्यवस्था व किफायतशीर उत्पादन-व्यवस्था महत्त्वाची असते. (४) साम्राज्यवाद ही एकेकाळची घटना किंवा अपघात नसून ती भांडवली विकासप्रक्रियेची जैविक अवस्था आहे. (५) ज्या देशांना स्वत:च्या गरजापेक्षा जास्त उत्पादन करावयाचे आहे किंवा अधिक संपत्ती मिळवायची आहे त्यांना इतर देशांशी व्यापार करून स्वत:चे आधिक्य वाढवून घेणे ही महत्त्वाची पायरी मानली जाते. त्यासाठी जागतिक व्यापार संघटनासारखे व्यापार-करार हा महत्त्वाचा टप्पा असतो. दुसऱ्या देशांतील राजकारण, राज्यव्यवस्था, अर्थकारण, चलनव्यवस्था, औद्योगिकरण ह्यावर स्वत:चे किंवा देशातील कंपन्यांचे नियंत्रण प्रस्थापित करणे अत्यावश्यक बनून जाते. तो त्या काळाचा साम्राज्यवाद बनतो. ईस्ट इंडिया कंपनीची व्यापारातून राजकीय सत्तेची रणनीती ही सर्वकालीन असते का हे तपासून पाहावे लागेल.

### जागतिकीकरण व कृषी व्यापार

साम्राज्यवादाचे दुसरे पर्व १९९५ पासून जागतिक व्यापार संघटनाच्या स्थापनेपासून[८] सुरू झाले व अजून ते चालू आहे. हिंसात्मक पद्धतीने युद्धाच्या रूपाने प्रकट झाला म्हणजेच साम्राज्यवाद असतो असे नव्हे. त्याच्या लक्षणांवरून आर्थिक साम्राज्यवाद ओळखला गेला पाहिजे. जागतिक व्यापार संघटनामध्ये कराराच्या अटींनुसार विकसित देशांनी विकसनशील देशांकरता स्वत:चे बाजार जेवढे खुले करावयाचे ते न करता, विकसनशील देशांनी विकसित देशांच्या अधिकच्या कृषी मालाकरिता अटींपेक्षा जास्त स्वत:चे बाजार खुले करावेत असा दबाव आणणे सुरू केले. त्याकरिता त्यांनी दोहा येथे ठराव (दोहा ॲग्रीमेंट २००१) पारित करून घेतला. त्यानुसार अमेरिकन व्यापार प्रतिनिधीने बांगलादेश, श्रीलंका, भारत, पाकिस्तान दौरा करून आपला मुद्दा रेटला. पण विकसित राष्ट्रांची रणनीती लक्षात आल्यामुळे दोहा करार कोणी अंमलातच येऊ दिला नाही. शेतीच्या मुक्त व्यापारासंबंधी तेव्हापासून आतापर्यंत जागतिक व्यापार संघटनात एकही करार होऊ शकला नाही. आताच २०२० मध्ये भारत सरकारने आंतरराष्ट्रीय फूड चेन्सना मुक्त प्रवेश देण्याचे ठरविले आहे. त्याचा विरोध शेतकऱ्यांच्या संघटना करीत आहेत. एवढेच नव्हे तर शेती हा विषय राज्य सरकारांच्या अखत्यारित येत असल्यामुळे राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या विरोधातील गटबंधनाच्या राज्य सरकारांनी चर्चेत असलेल्या शेतमालाच्या केंद्रीय कायद्यांच्याविरुद्ध कायदे पारित करणे सुरू केले आहे. पंजाब व राजस्थान ह्यांनी तसे केले आहे व महाराष्ट्रातील महागटबंधन सरकारने (दि. १६ नोव्हेंबर २०२० च्या बातम्यांनुसार) किमान आधारभूत किमतीचा कायदा तयार करण्यासाठी समिती नेमण्याची घोषणा केली आहे. ह्या कायद्यांवर राज्यपाल सह्या

करतील का हा मोठाच प्रश्न आहे. पण त्यातून राज्यसंघ राजकारणाचा प्रश्न निर्माण होऊ शकतो.

अडते-दलाल, त्यांचे कमिशन वगैरे गौण मुद्दे असले तरी मुख्य मुद्दा भारतीय शेतमाल आणि शेतकऱ्यांना जागतिक कृषिव्यापाराचे एकाधिकारी नियंत्रण करणाऱ्या कॉर्पोरेट कंपन्यांच्या स्वाधीन करायचे का, हाच आहे. शेतकरी संघटनेसारख्या काही संघटनांनी वर्षानुवर्षे उत्पादन खर्चासह किफायतशीर किमतीचे 'एक कलमी' आंदोलन चालविले. त्याच संघटना आताच्या कायद्यांमध्ये किमान आधार किंमतची तरतूद नसताना सुद्धा ह्या कायद्यांचे उत्साहाने स्वागत करीत आहेत. त्यांच्या मतानुसार बाजार समितीच्या यार्डात माल विकण्याची अट म्हणजे बाजार समितीची, अडत्यांची मक्तेदारी आहे; मार्केट सेस (बाजार समिती व तेथील सुविधा चालविण्यासाठीचा उपकर) हे शोषण आहे; बाजार समित्यांमध्ये रुमालाखाली शेतकरी व व्यापारी प्रतिनिधी ह्यांच्यात ठरणारे भाव हे कत्तलखाने आहेत; शेतकऱ्याने त्या दिवशी माल न विकण्याचे ठरविले तर त्याला राहण्या-खाण्याचा खर्च येतो व नफा कमी होतो वगैरे. उलट त्यांच्या मते, नव्या स्वातंत्र्यात शेतकरी व्यापाऱ्यांच्या खासगी बाजारात, त्यांच्या दुकानावर किंवा स्वतःच्या घरून किंवा दूरच्या देशी-विदेशी कंपनीलाही माल विकू शकेल; आता पूर्ण स्वातंत्र्य मिळाले आहे. बाजार समिती नावाचे कत्तलखाने बंद करावे अशीच शेतकरी संघटनेची मागणी होती आणि आहे. जागतिक व्यापार संघटन म्हणजे जागतिक स्पर्धा, म्हणजे मागणीत वाढ, म्हणजे किमतींत वाढ, म्हणजे भारतीय शेतकऱ्यांचा फायदा, असा तर्क शेतकरी संघटनेकडून सध्या मांडला जात आहे.

पण बहुतांश एकाधिकारी कृषी-व्यापार कंपन्या अमेरिकेत आहेत. तेथे शेतकऱ्याला बाजारात किफायतशीर किंमत मिळते का हेहि तपासणे आवश्यक आहे. त्यासाठी नमुना म्हणून डेव्हिड सी. कॉर्टन ह्यांच्या 'व्हेन् कॉर्पोरेशन्स रुल द वर्ल्ड' (When Corporations Rule The World) ह्या ग्रंथात विशद केलेली प्रत्यक्ष स्थिती विचारात घेऊ. म्हणजे कृषी कायद्यांचे समर्थन करणाऱ्या संघटनांच्या बऱ्याच गृहीतकांची स्पष्टीकरणे मिळतील. ह्या पुस्तकाच्या २३ अभिप्रायांपैकी ४ महत्त्वाचे अभिप्राय असे : (अनुक्रमाचे आकडे माझे)

1) "Probably the most important economics book to come out since The Wealth of Nations."
2) "This book is about the most serious crises that mankind may ever have faced. It is a must for those who care."
3) "Never in history has there occurred the economic gamble that is taking place today in the form of economic globalization. Korten's important work begins the critical process of economic reformation..."
4) "...Spells out the reality and consequences of a corporate-dominated globalization process and how it is undermining democracy."

कॉर्टन अमेरिकेबद्दल आपली निरीक्षणे नोंदवितात:

(a) "...the systemic forces nurturing the growth and dominance of global corporations are at the heart of the current human dilemma." (p. 9)

सध्याच्या मानवी द्विविधेच्या मुळाशी जागतिक कॉर्पोरेशन्सची वाढ आणि अधिपत्य ह्यांचे संवर्धन करणाऱ्या व्यवस्थेच्या शक्ती आहेत.

(b) "...the population of the Netherlands... consumes the output equivalent of fourteen times as much productive land as is contained within its own borders. The deficits are made up through international trade." (p.33)

नेदरलँड्सची (श्रीमंत देशाची) लोकसंख्या स्वत:च्या देशातील उत्पादक जमिनीच्या चौदा पट कृषी वस्तुंचा उपभोग घेते. उपलब्धतेची दरी ते आंतरराष्ट्रीय व्यापारातून भरून काढतात.

(c) "...this is a government of the people, by the people and for the people no longer. It is a government of corporations, by corporations and for corporations." (p. 58)

आता हे सरकार लोकांचे, लोकांनी निवडून दिलेले आणि लोकांसाठी नाही. आता ते कॉर्पोरेशन्सचे, कॉर्पोरेशन्सनी निवडून दिलेले व कॉर्पोरेशन्स साठीचे सरकार आहे.

(d) "In October 1929, only a few months after Irving Fisher announced the end of business cycles, the highly leveraged financial system came crashing down. Financial fortunes evaporated almost overnight." (p. 61)

ऑक्टोबर १९२९ मध्ये, आयर्व्हिंग फिशर ह्यांनी व्यापार चक्रांचा शेवट झाला आहे असे जाहीर केल्यानंतर काही महिन्यांतच अतिप्रभावी झालेली वित्तीय व्यवस्था कोसळून पडली. वित्तीय संपत्तीचे इमले एका रात्रीत हवेत विरले.

(e) "The argument that globalization increases competition is simply false. To the contrary, it strengthens tendencies toward global-scale monopolization." (p. 223)

जागतिकीकरणाने स्पर्धा वाढते असा जो युक्तिवाद केला जातो, तो अजिबात खोटा आहे. त्या उलट, ते जागतिक-पातळीवर एकाधिकार प्रस्थापित करण्याच्या प्रवृत्तींना बळ देते.

आता ह्या क्षणी भारतात विदेशी कृषी-व्यापार कंपन्यांना व्यापार करण्याची व करार-शेती करण्याची परवानगी देण्यात आली आहे त्यासंबंधात अमेरिकन अनुभवाबद्दल कॉर्टन ह्यांनी काय निरीक्षण केले ते पाहू. जर आपण अमेरिकेतील कायद्यांप्रमाणे कृषिव्यापार कायदे भारतात पारित केले आहेत तर त्यांचे शेतकऱ्यांवर तसेच परिणाम होतील हे लक्षात घेणे आवश्यक आहे. कॉर्टन म्हणतात:

(f) "From 1935 to 1989, the number of small farms in the united states declined from 6.8 million to 2.8 million... As farmers have gone out of business, so too have the local suppliers, implement dealers, and other small businesses that supported them. Entire rural communities have disappeared. Meanwhile, the major agribusiness corporations have grown and consolidated their power."

"Often these core firms find that it is most profitable and least risky to contract out the actual production to small producers. These smaller producers hold the major capital investment and bear the risk inherent in agriculture. The large firms control the market and maintain control over the terms under which the producers operate... The only choice left to farmers is to accept the terms, go out of business, or find another crop whose market is not yet controlled by a core corporation. This restructuring of agriculture has contributed to decreasing the farmers' share of consumers' food dollars from 41 percent in 1910 to 9 percent in 1990." (p. 224)

"The farmer receives a lower price and the consumer pays a higher price than either would have obtained under conditions of true competition. this is the system that the dominant agribusiness companies hope to extend to the world." (p. 225)

म्हणजे -

१९३५ ते १९८९ दरम्यान अमेरिकेतील छोट्या

शेतांची संख्या ६.८ दशलक्षांवरून २.८ दशलक्षांपर्यंत कमी झाली... ज्याप्रमाणे शेतकरी शेतीव्यवसायातून गेले त्याचप्रमाणे त्यांना सहाय्यभूत होणारे स्थानिक पुरवठादार, औजारांचे व्यापारी व इतर छोटे व्यावसायिकही धंद्याबाहेर गेले. संपूर्ण ग्रामीण समुदाय लुप्त झाले. दरम्यान, मोठ्या ॲग्रीबिझिनेस कंपन्यांची वाढ झाली व त्यांनी आपली सत्ता मजबूत केली.

बरेच वेळा ह्या मोठ्या कंपन्यांना कळून येते की, प्रत्यक्ष उत्पादन ठेक्याने लहान उत्पादकांना देणे हे सगळ्यात कमी जोखमीचे आणि अत्युच्च नफ्याचे आहे. छोटे उत्पादक आवश्यक ते मुख्य भांडवल गुंतवितात आणि कृषी उत्पादनात जी निहित (नैसर्गिक) जोखीम असते ती सहन करतात. मोठ्या कंपन्या बाजारावर आणि (आदाने, यंत्रे, कीटकनाशके, तांत्रिक सल्ला इत्यादींसह) शेतकऱ्यांनी कोणत्या अटींच्या अधीन राहून उत्पादन करावे, ह्याचे नियंत्रण करतात. शेतकऱ्यांना जो एकमेव मार्ग उपलब्ध असतो तो असा की ह्या अटी स्वीकारणे (व तोटा आल्यावर) धंद्यातून बाहेर जाणे किंवा जे पीक अजूनपर्यंत महाकाय कंपनीच्या नियंत्रणात आलेले नाही असे पीक निवडणे. अमेरिकन शेतीच्या पुनर्रचनेमुळे अमेरिकन उपभोक्त्यांच्या अन्नावरील खर्चाच्या प्रत्येक डॉलरपैकी शेतकऱ्यांना १९१० मध्ये ४१% हिस्सा मिळत होता तो १९९० मध्ये केवळ १०% झाला.

शेतकऱ्याला स्पर्धेच्या बाजारापेक्षा कमी किंमत मिळते आणि उपभोक्त्याला स्पर्धेच्या बाजारापेक्षा जास्त किंमत द्यावी लागते. मोठ्या ॲग्रीबिझिनेस कंपन्या ही कृषी-व्यापार पद्धती सगळ्या जगाला लागू करण्याची इच्छा बाळगतात.[९]

**समारोप**

भारत सरकारने २०२० मध्ये कृषी-व्यापारविषयक व करार शेतीसंबंधी जे कायदे पारित केले त्या प्रकारचे स्वातंत्र्य ब्रिटिश सरकारने साम्राज्यवादाच्या काळात भारतात उपभोगले. त्याचे सर्वाधिक भयावह दुष्परिणाम (उदाहरणादाखल व मौल्यवान संशोधनाच्या आधारावर) विदर्भाचा एक भाग असलेल्या वऱ्हाडच्या अर्थव्यवस्थेप्रमाणेच देशातील इतर भागांत झालेले सर्वांना ज्ञात आहेत. तो इतिहास आहे. ह्याच प्रकारचे भांडवलशाही जागतिकीकरणाचे अमेरिकेतील व युरोपमधील शेतकऱ्यांवर परिणाम होत आहेत, तो वर्तमानकाळ आहे. आजही अमेरिका व युरोपचा शेतकरी उत्पादन खर्चावर आधारित किफायतशीर भाव मिळतो म्हणून जगू शकतो आहे असे नव्हे; तर विविध प्रकारची असंबंधित (डीकपल्ड : म्हणजे शेतीचा आकार, पीक प्रकार, उत्पादन खर्च इत्यादी कशाशीही न जोडलेली) अनुदाने दरवर्षी भरमसाठ वाढविली जात आहेत, त्यामुळे तो शेतकरी शेतीवर टिकून आहे. मग तिथे उत्पादन व्यय व उत्पादनाच्या किमती ह्यांचा सैद्धान्तिक संबंध कशा प्रकारचा आहे हे सांगण्याची जबाबदारी अर्थशास्त्र ह्या शास्त्रावर व त्याच्या अभ्यासकांवर आलेली आहे. अमेरिकेतील कॉर्पोरेट कृषिव्यापार कंपन्यांचे नफे वाढण्याच्या प्रक्रियेत जसे तेथील शेतकऱ्यांचे व उपभोक्त्यांचे शोषण सुरू आहे तसा भविष्यकाळ भारतात घडणार नाही ह्याची शाश्वती सरकारच्या आर्थिक संस्था, सत्ताधारी राजकीय पक्ष व त्यांची गटबंधने ह्यांचे आर्थिक चिंतक, शेतकऱ्यांच्या संघटना व अर्थशास्त्र अभ्यासक ह्या सगळ्यांनी मिळून समाजाला द्यावी लागेल.

हे सर्व करीत असताना भारताच्या शेतकऱ्याला इतिहास काळात त्याच्या झालेल्या लुटीची कल्याणात्मक नुकसान भरपाई (जी स्वातंत्र्यानंतर झाली नाही) कशी करून द्यावी म्हणजे त्याचा भविष्यकाळ हा साम्राज्यवादी इतिहासासारखा व कृषि-व्यापार कॉर्पोरेटच्या वर्तमान काळासारखा राहणार नाही, असे

आर्थिक प्रतिमान निर्माण करणे ही शेतकऱ्यांच्या संघटनांसहित सर्वांची जबाबदारी आहे. भारतात शेतजमीन कमी उपलब्ध आहे, छोट्या शेतकऱ्यांचे प्रमाण इतर देशांच्या तुलनेने अधिक आहे व कोरडवाहू जमीन अधिक आहे, ह्या मूलभूत मर्यादा नवे प्रतिमान विकसित करताना ध्यानात ठेवणे आवश्यक आहे.

खुली जागतिक बाजारव्यवस्था भारतीय शेतकऱ्यांना किमान आधारभूत किंमत देईल का? नाही. बाजार व्यवस्था आंतरराष्ट्रीय कृषि-व्यापार कंपन्यांनी ठरविलेली किंमत देईल. ती कधी फायद्याची असेल तर कधी तोट्याची. बाजारभावाचा तोच अर्थ आहे. त्या किमतींना ज्यांना उत्पादन करणे जमणार नाही त्यांनी व्यवसायातून बाहेर पडावे. ह्याच कारणास्तव जागतिक व्यापार करारात किंमत अनुदानाची तरतूद नाही. आधारभूत किमतीची तरतूद केल्यास जागतिक व्यापार संघटनात त्याला आव्हान दिले जाईल म्हणून भारत सरकारने सध्याच्या कायद्यात तिचा समावेश केला नाही. पंजाब-हरियाणाच्या शेतकऱ्यांना आधारभूत किमतीमुळे सुबत्ता मिळते ती सोडून ते देशी-विदेशी मोठ्या कंपन्यांच्या जाळ्यात शिरण्यास तयार नाहीत. पण सगळ्याच शेतकऱ्यांना आधारभूत किंमत हवी असेल तर जागतिक व्यापार संघटनाच्या नियमांमध्ये बदल करावा लागेल. तिथे तो बदल मान्य झाला नाही तर सैद्धान्तिक, व्यावहारिक, राजकीय पेच प्रसंग निर्माण होऊ शकतो. हे लक्षात घेतले पाहिजे की, शरद जोशींनी स्वामीनाथन आयोगाला नाकारले होते आणि आजही शेतकरी संघटना नवीन कृषी कायद्यांच्याविरुद्ध जो संघर्ष चालू आहे त्यात सहभागी नाही. कृषिमंत्र्यांनी जरी आंदोलक शेतकऱ्यांना बोलणी करण्यासाठी दि. ३ डिसेंबर २०२० रोजी निमंत्रित केले आहे तरी ते कायदे परत घेणार नाही असे प्रधानमंत्र्यांनी आधीच जाहीर केले आहे. ह्याचाच अर्थ असा की, भारतातील कृषिकरता येणारा काही काळ अनिश्चिततेचा राहील. नव्या स्वातंत्र्याचा प्रयोग म्हणून शेतकरी बाहेर माल विकून बाजार समितीकडे फिरकले नाही तर व्यवहार अति कमी होऊन प्रशासकीय खर्च भरून निघाला नाही तर बाजार समित्या बंद पडून शेतमाल व्यापाराचे पूर्णच खाजगीकरण होण्याची शक्यता आहे. तशा परिस्थितीत लहान शेतकऱ्यांची परिस्थिती बिकट होण्याची शक्यता आहे.

**संदर्भ व टीपा :**

१. खेड्यांना एकमेकांना जोडणारे रस्ते स्वातंत्र्यानंतर बांधणे सुरू झाले. त्या आधी बहुतांश खेडी पावसाळ्याच्या चार महिन्यांमध्ये विना-दळणवळण व विना-संपर्क एकमेकांपासून तुटलेली असत. त्यामुळे नाईलाजाने खेड्यातल्या सामान्य शेतकऱ्यांना, ज्या सुविधा नसतील त्यांच्या शिवायच शेती व्यवसाय करण्याच्या सवयी लावून घ्याव्या लागल्या. बलुतेदारी, पैशाचा वापर न करता सहकार्याने एकमेकांचे व बैलांचे श्रम वापरणे ह्या प्रणाली त्याचाच परिणाम आहेत.

२. केळकर, न. चिं., 'मराठे व इंग्रज (मराठेशाहीचे शतसांवत्सरिक वाङ्मयश्राद्ध)' प्रिंटिंग एजन्सी, पुणे शहर, द्वितीय मुद्रण, १९१८, पृ. १३२.

३. Huque, M. Azizul : 'The Man Behind The Plough', The Book Co. Ltd., Calcutta, 1939, pp. 211-16, मोगल महसुली पद्धती शेरशहा आणि अकबराचा मंत्री राजा तोडरमल ह्याने विकसित केली.

४. तत्रैव, पृ. २१२.

५. Satya, Laxman D. 'Cotton and Famine In Berar: 1850-1900', Manohar Publishers and Distributors, New Delhi, 1997, pp. 15-17, 75, 309.

"Berar alone supplied nearly a quarter of the total annual exports of cotton (equal to entire production of Egypt) fromn British India. (p. 180)

६. Satya, Laxman D., 'Ecology, Colonialism and Cattle : Central India in Nineteenth Century' Oxford University Press, New Delhi, 2004, pp. 4, 25-26, 103, 182.

७. Satya, Laxman D., 'Medicine, Desease and Ecology in Colonial India The Deccan Platean in the 19th Century,' Manohar Publishers and distributors, New Delhi, 2008, pp. 27, 34, 94-95, 110, 282.

८. १ एप्रिल १९९५ पासून हे संघटन कार्यरत झाले. सुमारे १९८६ पासून 'डंकेल प्रस्ताव' ह्या नावाने त्या मसुद्याची चर्चा जागतिक व्यापार संघटनाच्या आधी असलेल्या गॅट (Gatt = General Agreement on Tariff and Trade) ह्या संस्थेच्या सुमारे १४८ सदस्य राष्ट्रांमध्ये चालू होती. परंतु त्यात शेतमालाच्या मुक्त व्यापारासंबंधी ज्या तरतुदी सुचविल्या गेल्या होत्या, त्या विकसनशील राष्ट्रांच्या शेतीला घातक आहेत म्हणून सहमती झाली नाही. शेवटी तत्कालीन अमेरिकन राष्ट्राध्यक्ष क्लिंटन ह्यांनी जाहीर केले की, जी सदस्य राष्ट्रे १५ एप्रिल १९९४ पर्यंत डंकेल प्रस्तावावर सह्या करणार नाहीत त्यांच्यावर अमेरिका व्यापार प्रतिबंधक कारवाई करील! हा शेती व्यापार क्षेत्रातील आर्थिक साम्राज्यवाद नव्हे काय? त्यावेळी प्रस्तुत लेखकाने 'डंकेल प्रस्ताव : जगाच्या साम्राज्यवादी आर्थिक पुनर्रचनेचे एक अवजार' १५ जुलै १९९३ प्रकाशक : भारतीय कम्युनिस्ट पक्ष, मुंबई, ही पुस्तिका लिहिली होती.
Lori Wallach and Debora James, 'Why the WTO Doha Round Taks Have Collapsed', Common Dreams, globalpolicy, org, dated August 14, 2004.
"... the under-recognised, but extremely important story is that the underlying cause of the breakdown is the growing rejection of WTO, and the more broadly of the corporate-led globalization model, by many people worldwide, based on this model's effects on their lives... Instead of promised gains, during the WTO decade, economic conditions for the majority have deteriorated... number and percentage of people living on less than $ 1 a day has increased."

९. Korten, David C., 'When Corporations Rule The World', (Second Impression) The other India Press, Mapusa, Goa, 2000.

◆

कला म्हणजे काहीतरी करण्याचा सुंदर मार्ग,
विज्ञान म्हणजे काहीतरी करण्याचा प्रभावी मार्ग,
तर व्यवसाय म्हणजे काहीतरी करण्याचा आर्थिक मार्ग.

**- इलबर्ट हुब्बार्ड**

# अतिवृद्धी-अभिवृद्धी सहसंबंधातील पेचप्रसंग

**वसंतराव जुगळे** †
**योजना जुगळे** ††

**प्रस्तावना**

दुसऱ्या महायुद्धानंतर अतिवृद्धीची (inflation) समस्या चिंताजनक बनली होती. त्यामुळे अनेक देशांच्या समग्रलक्षी आर्थिक चलामध्ये निरूपण आणि विसंगती निर्माण झाली होती. अर्थव्यवस्थांची युद्धोतर पुनर्रचना आणि पुनर्बांधणी हीच बहुतेक राष्ट्रांची विकासनीती बनली होती. पण १९७० च्या शेवटच्या काही वर्षांमध्ये अतिवृद्धीचे व्यवस्थापन अवघड आणि अशक्य वाटू लागले होते. अर्थव्यवस्थांच्या विकासातील सातत्य टिकवून अतिवृद्धीच्या स्थितीवर नियंत्रण ठेवणे महत्त्वाचे होते. अर्थव्यवस्थांच्या अभिवृद्धी (growth) प्रक्रियेत अतिवृद्धीचे योगदान असते, हा पारंपरिक दृष्टिकोन फोल ठरला होता. त्यामुळे अर्थशास्त्रीय विचारधारामध्ये बरीच उलथापालथ सुरू झाली होती. अभिवृद्धी व अतिवृद्धी यांच्यातील सहसंबंधांमध्ये एक प्रकारची कोंडी अथवा पेचप्रसंग(dilemma) निर्माण झाल्याचे पाहायला मिळते. यासंबंधीचे विवेचन करणे हा या लेखाचा प्रमुख हेतू आहे.

**पेचप्रसंग** (dilemma)

सन १९७३-७४ आणि १९७९-१९८० या कालावधीतील तेल धक्क्यामुळे अतिवृद्धीची स्थिती पुन्हा बिकट झाली होती. स्थिर व विचलनविरहित विकासामध्ये अडथळे निर्माण होऊ लागले होते. अंतर्बाह्य विसंगतीमुळे अर्थव्यवस्थांचे व्यवस्थापन आव्हानात्मक बनले होते. युरो-डॉलर आणि पेट्रो-डॉलर यासारख्या अस्वस्थ करणाऱ्या घडामोडीमुळे अतिवृद्धीच्या समस्यांचा विस्तार जगभर पोहोचला.

विकसनशील देशांच्या दृष्टीने अतिवृद्धीची समस्या केवळ आर्थिक स्वरूपाची न राहता राजकीय अस्थिरता निर्माण करू लागली होती. सामाजिकदृष्ट्या विषमता आणि दारिद्र्य वृद्धिंगत होऊ लागले होते. त्यामुळे वृद्धी आणि दारिद्र्य निर्मूलन आभासी बनले. सामाजिक आणि आर्थिक विचारधारेमध्ये द्वंद्व निर्माण होऊ लागले. ओकूनच्या अभिवृद्धी-रोजगार या चलातील धनात्मक सहसंबंधामध्ये विसंगती आणि विकृती निर्माण होऊ लागल्या. या विसंगती जगभर विस्तारू लागल्याने जागतिक व्यापार आणि विदेशी

† अर्थशास्त्राचे वरिष्ठ प्राध्यापक (निवृत्त) तथा माजी अर्थशास्त्र विभाग प्रमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. आजीव सभासद क्र. ५६८, मो. ९४२२०४०६८४, ई-मेल : vbjugale@gmail.com

†† प्राचार्या, अण्णासाहेब डांगे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, हातकणंगले, जिल्हा. कोल्हापूर. मो. ९४२२०४०११४, ई-मेल : yojanajugale@gmail.com

विनिमय व्यवस्थापन खूप आव्हानात्मक आणि विघातक बनू लागले होते. भारतातील १९७७ चे सत्तांतर त्यामुळेच झाले. आर्थिक आणिबाणी जाहीर करून अर्थव्यवस्थांमध्ये दारिद्र्य निर्मूलन आणि विषमता दूर करणे हेच विकासाचे डावपेच बनले. वीस कलमी कार्यक्रम हा तत्कालीन परिस्थितीमध्ये विकासाचा स्त्रोत बनला होता.

**अभिवृद्धी आणि आर्थिक चल**

कालागणिक विकासाचा अर्थ आणि संदर्भ बदलत गेले. विकासाच्या प्रक्रियेतील नैतिकता, पर्यावरण समतोल, शाश्वत विकास, विकासाची शाश्वती, स्वातंत्र्याचे प्रमाण व प्रसंग यासारख्या बाबी विकासाचा अर्थ सांगून जातात. ज्ञानेश्वरीच्या पसायदानमध्ये अशाच स्वरूपाच्या सर्वंकष विकासाचे सूत्र मांडले आहे.

अभिवृद्धी ही संकल्पना उत्पन्न आणि उत्पादनाबरोबर अनेक आर्थिक चलासाठी वापरला जाणारा परवलीचा शब्द बनला. गतवर्षीच्या तुलनेने चालू काळातील वृद्धी किती टक्क्यांची आहे, हे यावरून लक्षात येते. या तुलनेत विकासाचा अर्थ व्यापक व सर्वांगीण स्वरूपाचा आहे. एका विशिष्ट काळातील चालू उत्पन्नातून गतकाळातील उत्पन्न वजा करून त्याची टक्केवारी काढली तर ती उत्पन्नाची अभिवृद्धी असते.

$$Gt - G_{t-1} \div G_{t-1} * 100$$

किंवा

$$[(Gt / - G_{t-1}) - 1] * 100$$

उत्पन्नाच्या वृद्धीबरोबर रोजगार वृद्धी होते, हा ओकूनचा नियम (१९६२) म्हणून ओळखला जातो. या दोन्ही चलातील सहसंबंध धनात्मक असल्याचे ओकून सांगतात. तसेच वृद्धीबरोबर दारिद्र्य कमी होते हाही एक दृष्टिकोन अर्थशास्त्रीय विचार म्हणून प्रसिद्ध आहे. अभिवृद्धी आणि आर्थिक विषमता यातील सहसंबंधाला उलटा 'यू' आकाराचा वक्र किंवा कुझनेट कर्व्ह म्हणून प्रचलित आहे. समग्रलक्षी आर्थिक चलातील असे अनेक सहसंबंध अर्थशास्त्रीय विचारधारांमध्ये चर्चिले गेले आहेत. अद्यापही अशा सहसंबंधावर गांभीर्याने चर्चा होत असते. अशीच एक चर्चा अतिवृद्धी आणि अभिवृद्धी या चलातील कोंडी अथवा पेचप्रसंग या प्रस्तुत लेखामध्ये चर्चिला गेला आहे.

**अतिवृद्धी म्हणजे काय?**

अतिवृद्धी म्हणजे काय? याची माहिती घेताना, ती कशी मोजली जाते, याला खूप महत्त्व आहे. अतिवृद्धीची मोजणी खूप तांत्रिक आणि गुंतागुंतीची आहे. किंमती कशा ठरतात? यावरील चर्चा अद्यापही चालू आहे. सापेक्ष किंमती, निरपेक्ष किंमती, घाऊक व किरकोळ किंमती, चालू किंमती, स्थिर किंमती, वास्तव किंमती अशा अनेक संकल्पना अस्तित्वात आहेत. प्रत्येकाचा इतर अनेक चलाशी संबंध असतो. उत्पन्न, रोजगार, व्याजदर, मागणी, पुरवठा आणि गुंतवणूक अशा चलांशी किंमतीचा थेट संबंध आहे. त्या आधारे सर्वसाधारण समतोलाची संकल्पना जॉन मेनार्ड केन्स (१९३६)यांनी मांडलेला आहे. विनिमय दर आणि जागतिक व्यवसायावर किंमत पातळीचा फार मोठा प्रभाव असतो. त्यामुळे अतिवृद्धी, अपवृद्धी आणि पुनरावृद्धी यांची स्थिती नेहमी चिंताजनक स्थिती निर्माण करून, अर्थव्यवस्थेत अनेक आर्थिक विसंगती निर्माण करीत असतात. संतुलनही अल्पकालीन स्थिती असते. अस्थिरता हीच दीर्घकालीन विकासनीती बनते. कारण, ती धोरणातून दुरुस्त करावी लागते. अर्थव्यवस्थेचा नेहमी आर्थिक संतुलनाकडेच कल असतो. खुल्या बाजार यंत्रणेमध्ये किंमत निर्धारणाची स्थिती अभ्यासकांच्या लक्षात येते. खुली बाजारयंत्रणा अदृश्य असते. ती कशी निर्धारित होते, हे एक

गौडबंगालच आहे. आर्थिक विसंगती कशा दूर कराव्यात? नियोजनाने की खुल्या बाजारयंत्रणेने? (Who clears the market?) याचे उत्तर अद्याप सापडलेले नाही. यामध्ये बरेच वैचारिक द्वंद्व पाहायला मिळतात.

प्रत्येक किंमत वाढ ही अतिवृद्धी अथवा भाववाढाअतिरेक नसते. ज्यावेळी सर्वसाधारण किंमती सातत्याने आणि चिकाटीने (इंद्रिय गोचर बदल) वाढतच राहतात, त्यावेळी अतिवृद्धीची परिस्थिती निर्माण होते. अर्थव्यवस्थेच्या सुदृढ आरोग्यासाठी किंमतवाढ आवश्यक असते. पण ती नियंत्रित असावी. अर्थव्यवस्थेला पोषक असावी. भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये ही पोषकता ५% च्या दरम्यानची आहे आणि ती नियंत्रित असते. पुरवठ्यापेक्षा नेहमी मागणी अधिक असेल तर किंमतवृद्धी शक्य होते.

$$P = P_t - P_{t-1} \div P_{t-1} * 100$$

किंवा

$$[(Pt \;/\; P_{t-1}) - 1] * 100$$

मागणी अनेक घटकांवर अवलंबून असल्यामुळे किंमतवाढीचे अनेक प्रकार सांगितले जातात. वेतन वृद्धीमुळे किंमती वाढतात. पण तुलनेने उत्पन्न वाढत नसेल तर त्याचे रूपांतर अतिवृद्धीमध्ये होण्यास प्रवृत्त होते. तसेच आर्थिक अभिवृद्धीतील वृद्धी दरापेक्षा किंमतवाढीचा दर अधिक असेल तर अतिवृद्धीची स्थिती निर्माण होते. अथवा पैशाला अधिक मागणी असेल तरीही अतिवृद्धीची स्थिती निर्माण होते. (फ्राईडमन,१९५९). सर्वसाधारण मागणी, सरासरी पुरवठ्यापेक्षा अधिक असल्याची लक्षणे, हे अतिवृद्धीची स्थिती दर्शवतात. उत्पन्नातील वाढीपेक्षा किंमत पातळीतील वाढ नेहमी अधिक असल्यास अतिवृद्धीची अवस्था निर्माण होते. तात्पर्य, आर्थिक अभिवृद्धीतील वाढीपेक्षा किंमत पातळीतील वृद्धी अधिक असेल, त्यावेळी अतिवृद्धीची लक्षणे आढळून येतात. ती मोजण्याच्या दोन पद्धती अस्तित्वात आहेत. साधी सरासरी पद्धती आणि भारमान पद्धती.

साध्या सरासरी पद्धतीमध्ये (सा.स.प.) आधार वर्षाची निवड महत्त्वाची असते. आधार वर्ष हे सर्वसाधारण वर्ष असावे. देशातील सकल उत्पन्न, व्यापार आणि किंमती यामध्ये कोणत्याही प्रकारच्या विसंगती आणि अपूर्णता त्या वर्षात अनुभवास येता कामा नये. तसेच त्या चलाची आकडेवारी सहज उपलब्ध असावी आणि ती राष्ट्रीय व राज्य पातळीवरच्या अभ्यासासाठी उपलब्ध असावी. राष्ट्रीय सांख्यिकीय आयोगाच्या निकषाप्रमाणे दर पाच वर्षांनी आधार वर्ष बदलावे, दर दहा वर्षांनी नव्हे.

सा.स.प. $= \sum P_1 .......n \quad \sum P_0 ........n * 100$

भारमान पद्धतीमध्ये दोन पद्धती आहेत. लेस्पियर पद्धती (ले. प.) (१८७१)आणि पाश्च पद्धती. लेस्पियर पद्धतीमध्ये नगसंख्येचा भार गृहीत धरलेला असतो. नगसंख्येच्या भाराद्वारे खालील प्रकारे अतिवृद्धी मोजली जाते.

ले.प. $= \sum P_1 (2008)\, Q_0 (2007)$

$\sum P_0 (2007)\, Q_0 (2007) * 100$

दुसऱ्या पद्धतीमध्ये किंमतीचा भार ग्राह्य धरून खालील प्रकारे अतिवृद्धीचे मापन होते.

पा.प. $= \sum P1 (2008)\, Q1 (2008)$

$\sum P0 (2007)\, P1 (2008) * 100$

$P$ = आधार वर्षांतील किंमत

$P_1$ = चालूवर्षांतील किंमत

$Q_0$ = आधार वर्षांतील नगसंख्या

$Q_1$ = चालू वर्षांतील नगसंख्या

भारतामध्ये घाऊक किंमतीचा निर्देशांक

मोजण्यासाठी मूल्यांचा भार गृहीत धरलेला असतो. नगसंख्येचा भार निर्धारित करणे अवघड असते. प्रत्येक नगांच्या भार निर्धारणाची वितरण सारणी तयार करणे आवश्यक असते. कमी महत्त्वाचे, अधिक महत्त्वाचे, अथवा सर्वसाधारण महत्त्वाचे नग परिस्थितीनुरूप (मागणी-पुरवठा आणि किंमत) बदलतात. त्याप्रमाणात भारदेखील बदलावे लागतात, त्यामुळे योग्य निर्देशांक प्राप्त होऊ शकतो. भारतामध्ये ग्राहकांच्या किंमतीचा निर्देशांक, ग्राहकांच्या व्यय पाहणीवरून निर्धारित केला जातो. विविध स्तरातील किंमत निर्देशांकाची वस्तुस्थिती लक्षात घेतली जाते. पहिल्या टप्प्यात विविध प्रकारची आकडेवारी संकलित केली जाते. त्यानंतर सापेक्ष किंमती पाहिल्या जातात. त्यासाठी आधार वर्षातील किंमती व चालू किंमतीचे प्रमाण पाहिले जाते. त्यासाठी $P_1 / P_0 * 100$ या सूत्राचा वापर केला जातो. अशा सर्व वस्तूंच्या सरासरी किंमत निर्देशांकानंतरची स्थिती पाहिली जाते. दोन्ही काळातील (आधार वर्ष व चालू वर्ष) उत्पादन मूल्य समान असावे, असे गृहीत धरून निर्देशांक मोजला जातो.

सेंट्रल स्टॅटिस्टिकल ऑर्गनायझेशन लेस्पियर पद्धतीचा अवलंब करते.

$$I = \sum(I_i * W_i) \quad \sum W_i$$

जिथे;

I = सर्व वस्तूगटांचा निर्देशांक (घाऊक किंमतीचा)

$\sum$ = बेरीज (सकल)

$I_i$= वस्तू अथवा वस्तूगटाचा निर्देशांक

$W_i$ = वस्तू अथवा वस्तूगटाचा भार (मूल्य भार)

पॅसिफिक बेसिनमधील विकसनशील अर्थव्यवस्थामध्ये (PBEC) अतिवृद्धी ही मुद्राजन्य स्थिती आहे, असे मानले जाते. त्यामुळे मुद्राबाजारातील स्थितीचा परिणाम अतिवृद्धीवर होतो. पणन क्षेत्रातील विसंगती दुरुस्त करणे अथवा समतोल साधण्यासाठी दरडोई नामित (nominal) चलन आणि चलनासाठीची वास्तव मागणी लक्षात घेऊन अतिवृद्धी मोजली जाते (मक्सवेल्ल ज. फ्राय, १९८१).

$$\triangle P = \triangle Ms \quad N - \triangle Md$$

जिथे;

$\triangle P$ = किंमतीतील बदल

$\triangle Ms$ = चलनपुरवठातील बदल

$\triangle Md$ = दरडोई पैशाची वास्तव मागणी [(Md/P)/N]

N = लोकसंख्या.

**अतिवृद्धीची निष्पत्ती**

अतिवृद्धीच्या विविध अवस्थांचा असर अर्थव्यवस्थेवर होत असतो. विशेषतः गरीब व स्थिर उत्पन्न कमविणाऱ्या घटकांवर अनिष्ट परिणाम होतात. ती अवस्था कायमस्वरूपी असेल तर त्याचे दूरगामी परिणाम संभवतात. अतिवृद्धीच्या अवस्थेमुळे आर्थिक वृद्धिदर वाढतो. ही वस्तुस्थिती पारंपरिक आर्थिक विचारांमध्ये आढळून येते. कायमच्या अतिवृद्धीचा आर्थिक अभिवृद्धीवर काय परिणाम होतात, याचा अभ्यास अनेक पातळीवर झालेला आहे. अतिवृद्धी जर अल्पकाळासाठी असेल तर, गरीब व स्थिर उत्पन्न गटातील लोकांच्या राहणीमानावर विपरित परिणाम होतात. तसेच समग्रलक्षी चलनातील घटक चल-बिचल बनतात. त्यामुळे मुद्रानीती व कल्याणकारी कार्यक्रमांमध्ये सरकार बदल करते. घरेलू उत्पन्नात व किंमतीतील वृद्धी ही मुद्रा पुरवठ्यामुळे प्रत्ययास येणारी बाब आहे.

आर्थिक अभिवृद्धी आणि अतिवृद्धी यांच्यातील सहसंबंध अनेक स्तरावरील अनुभव व सैद्धांतिक विवेचन अर्थशास्त्रीय साहित्यामध्ये झालेले आहेत. सौम्य स्थितीतील अतिवृद्धी अर्थव्यवस्थेला अनुकूल

असते. तसेच भविष्यकाळातील अपेक्षित आर्थिक अभिवृद्धीची जाणीव वर्तमान काळातील लोकांवर फारसा परिणाम घडवून आणत नाही. कारण, त्याची जाणीव झालेली असल्यामुळे लोक त्या अवस्थेचा स्वीकार करतात. सैद्धांतिकदृष्ट्या अभिवृद्धी आणि अतिवृद्धी यांच्यातील सहसंबंध धनात्मक आहे आणि ती अवस्था पैशाच्या पुरवठ्यावरून प्रत्ययास येते. पैशाचा पुरवठा जलद आणि गतिमान असेल तर अतिवृद्धी आणि अभिवृद्धीदेखील त्याच वेगाने गतिमान होतात (जोसेफ एच. हस्लोग, १९९७). आयर्विन फिशर यांच्या मते, पैशाच्या व्याजदरामधील वृद्धी अपेक्षित अतिवृद्धीमुळे वाढते आणि अपेक्षित अपवृद्धीमुळे घटते. समग्रलक्षी चलातील निष्पत्तीचे विवेचन खूप क्लिष्ट आणि अनुभवावर आधारित आहे. त्यामुळे कांहीवेळा सिद्धांत आणि प्रत्यक्ष अनुभव यांच्यामध्ये विसंगती आढळून येतात. कारण, विविध स्तरावरील परिणामांचा वेग अर्थव्यवस्थेतील अवस्थांवर अवलंबून असतो. त्यामुळे एखाद्या घटकातील बदल चटकन प्रत्ययास अथवा लक्षात येतो. त्यानंतरचा बद्दल मात्र लवकर लक्षात येत नाही. कारण, सामाजिक व अर्थव्यवस्थेतील अपूर्णता अस्तित्वात असतात किंवा काही घटक प्रबळ नसतात.

**समग्रलक्षी निष्पत्ती**

नामित व्याजदर (Nominal rate of interest) हा अनेक मध्यवर्ती बँकांचा नियंत्रित व नियामक समग्रलक्षी चल आहे. हा चल नियंत्रित ठेवल्यास सर्वच समग्रलक्षी चलामध्ये अपेक्षित धोरणात्मक बदल घडवून आणता येतात. म्हणून जगातील सर्वच मध्यवर्ती बँकांच्या अखत्यारित हा चल आहे. पण अलीकडच्या वित्तीय खुलेपणाच्या दृष्टिकोनामध्ये व्याजदराचे खुलेकरण अपेक्षित आहे. ताठर नामित व्याजदरामुळे वास्तव व्याजदर घटतो. परिणामी, पैशाला असलेली मागणी घटते आणि अतिवृद्धीची अवस्था विशिष्ट मर्यादेत बंदिस्त बनते. वास्तव ठेवी घटू लागतात. वास्तव ठेवीतील घसरणीमुळे अंतर्गत पतपुरवठा आकुंचित होतो. त्यामुळे वास्तव आर्थिक अभिवृद्धी घटण्यास सुरुवात होते. म्हणूनच वित्तीय नियंत्रणाखाली अथवा दबावाखाली असणाऱ्या अर्थव्यवस्थांमध्ये लवचिक व्याजदराचे धोरणात्मक सूत्र अवलंबिलेले असते. कारण, अतिवृद्धीचा धक्का सहन करण्याची कुवत अर्थव्यवस्थेमध्ये निर्माण होते आणि आर्थिक अभिवृद्धी कायम धनात्मक राहते. राजकीय आर्थिक धोरणाला यामुळे पुष्टी मिळते. ठेवीवरील वास्तव व्याजदरांमध्ये पणन स्थितीच्या दृष्टिकोनातून वास्तव पैशाला असलेली मागणी वाढू लागते आणि अतिवृद्धीचा दाब कमी होऊ लागतो. याच दरम्यान पतपुरवठा वास्तव दराशी मिळताजुळता घेतो म्हणून आर्थिक अभिवृद्धी दृष्टिपथास येते आणि पैशाची वास्तव मागणी वाढते. अतिवृद्धीचा दुष्टचक्र भेदणे शक्य होते (मक्सवेल्ल ज. फ्राय, १९८१).

मुद्रावादी अर्थशास्त्रज्ञांना नेहमी असे वाटायचे की, आर्थिक अभिवृद्धीच्या काळात अतिवृद्धी हे दीर्घकाळासाठी गृहीतच धरलेले असते. पण अतिवृद्धीमुळे आर्थिक संसाधने विस्कळित होतात. बऱ्याचवेळा अशा परिस्थितीत अनुत्पादक गुंतवणुकीसाठी बचतीचा वापर होतो. ठेवीदारांना आपल्या ठेवी वास्तव मत्तेमध्ये गुंतवावेसे वाटते. उदाहरणार्थ, घरकुल, वास्तव संपत्ती, संचित मालसाठ्यामध्ये आपल्या ठेवीचे रूपांतर केल्यास अतिवृद्धीचा फटका ठेवीदारांना बसणार नाही, अशी ठेवीदारांची समजूत असते. पण असे केल्याने देशाची उत्पादनक्षमता वाढू शकत नाही. उलट दीर्घकाळात देशाच्या विकासातील क्षमतेवर त्याचा प्रभाव पडतो. आदानांची व्ययसंरचना दृष्टिपथास येत नसल्यामुळे

दीर्घकालीन गुंतवणुकी कठीण होतात.

अतिवृद्धीचा प्रभाव आंतरराष्ट्रीय व्यवहार ताळेबंदावर सुद्धा होतो (वेर्नेर बायर, १९६७). अतिवृद्धीमुळे आयातीला प्राधान्य मिळते आणि निर्यातीला खीळ बसते. अतिवृद्धीच्या काळात विनिमय दराच्या विशिष्ट प्रभावातून आयातीचे आकर्षण वाढते, आणि अंतर्गत व्ययवृद्धीमुळे निर्यातीला अडथळे निर्माण होतात. या व्यवहारामुळे आंतरराष्ट्रीय व्यवहाराचा ताळेबंद बिघडतो. त्यातून उद्भवणाऱ्या अवमूल्यनाच्या दडपणामुळे व्यवहार तोलावर प्रभाव पडतो. अतिवृद्धीच्या वाढत्या दाबामुळे चलनाच्या अवमूल्यनाला पर्याय राहत नाही. पणअवमूल्यन लगेच होऊ शकत नाही. तथापि, आयातीवर बंधने लादून अथवा विनिमय दरात किफायतशीर बदल करून प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न होतो. त्यासाठी आंतरराष्ट्रीय आर्थिक आचारसंहिता लक्षात घ्यावी लागते. यातील आततायीपणाचा परिणाम थेट परकीय गुंतवणुकीवर प्रभाव टाकतो. थेट विदेशी गुंतवणुकीचे आकुंचन होऊ दिले जात नाही. त्याचा देशाच्या प्रतिष्ठेवरसुद्धा परिणाम होतो असे बायर यांचे मत आहे.

पैशातील परताव्याच्या प्रमाणात वर-खाली असे बदल संभवतात. यासाठी किंमत पातळीतील स्थिरता खूपच फलदायी असते. विकासाला ते पूरक ठरते. विशेषतः वास्तव राष्ट्रीय वृद्धिदर उच्चतम असतो. म्हणजे चार ते सहा टक्क्यांच्या आसपास असू शकतो (काल्डोर एन.१९६७). किंमत स्थैर्यामुळे विकासातील अचर गतिक अवस्था (Steady state) निर्माण होते. पण जर, उत्पादकता आणि श्रम-संख्या अनुकूल असेल तर. यासंबंधी सेंट लुईस यांच्या फेडरल रिझर्व सिस्टममधील स्थित्यंतराचा अभ्यास (१९१० ते २०१५) उल्लेखनीय आहे. त्यामध्ये १९१९ मधील स्थिती, त्यानंतरची १९२९ची स्थिती आणि १९७७ ते १९९५ची स्थैतिक अवस्था (stagnation) प्रमुख आहेत. त्यांच्या भाकिताप्रमाणे २०१५ नंतर महामंदी अथवा जागतिक युद्धाची स्थिती निर्माण होईल असे म्हटले होते. तश्या कांही बाबी त्या वर्षाच्या मागे-पुढे लक्षात आल्या आहेत.

अनेक राष्ट्रांच्या अभ्यासातून असे स्पष्ट झाले आहे की, मध्यम व निम्न उत्पन्न गटातील राष्ट्रांमध्ये अतिवृद्धी आणि अभिवृद्धी यांच्यातील सहसंबंध नकारात्मक असल्याचे म्हटले आहे (फिश्चर १९९३, ब्रुनो आणि एस्तर्ली १९९५,ज्युद्सोन आणि ओर्फानिदेस १९९६, सारेल १९९६, बारो १९९५). यांच्यातील अभ्यासामध्ये कांही अंशी अतिवृद्धी आणि जलद अभिवृद्धीचा प्रसंग अधोरेखित केलेला आहे. सर्वसाधारणपणे दोन प्रकारच्या अरेषीय (non-liniarity) संबंधांचे विवेचन त्यामध्ये आहे. एक, अत्यंत कमी अतिवृद्धीमुळे (उदा. २ - ३%) अतिवृद्धी-अभिवृद्धी यातील सहसंबंध धनात्मक दर्शवतात. इतर वेळी मात्र या दोन्ही चलामध्ये नकारात्मक दृष्टिकोनच मांडलेला दिसतो. पण हे सहसंबंध बहिर्वक्रिय अथवा उन्नतोदरिय स्वरूपाचे असतात, म्हणजे सुमारे दहा ते वीस टक्क्यांच्या अतिवृद्धीच्या काळात अभिवृद्धी घटते, असे दर्शविलेले आहे. अतिवृद्धीही ४०ते ५० टक्क्याच्या दरम्यानची असते, त्यावेळी अभिवृद्धी घटते, असे आतिश घोष आणि स्टिवन फिलिप्स (१९९८) यांना वाटते.

थोडक्यात अतिवृद्धी-अभिवृद्धीचा पेचप्रसंग (dilemma) हा दुसऱ्या महायुद्धानंतर जन्माला आलेला एक आर्थिक अभ्यास आहे. त्याची विविधांगी रूपे आहेत. मुद्रानीती, पैशाची मागणी आणि वित्तीय घटकांच्यातील सहसंबंधांचा अभ्यासदेखील झालेला आहे (सेंट लुईस, एफ.आर.एस. ऑफ सेंट लुईस, १९९६).

**मुंडेल,१९६३**

मुंडेल यांच्या १९६३ सालातील संशोधनाने असे सिद्ध केले होते की, अतिवृद्धी आणि उत्पादनातील अभिवृद्धी यांच्यामध्ये धनात्मक संबंध असतो. त्यामुळे वस्तूंच्या मागणीमध्ये सातत्याने वाढ होत राहते. अतिवृद्धीमुळे व्यक्तिगत मालमत्तेचे मूल्य घटते. त्याचे मूल्य पूर्वसंचित स्थितीला आणण्यासाठी बचत करणाऱ्या विवेकी लोकांकडून अधिक बचत होते. जेणेकरून वास्तव व्याजदर कमी होऊ नये. अधिक बचत म्हणजे अधिक भांडवल निर्मिती, ज्यामुळे अधिक उत्पादन सुलभ होते. अतिवृष्टीमुळे लोकांच्या संपत्तीचे मूल्य कमी झालेले असते. त्यामुळे भविष्यातील बचतीचा लाभ लोकांना मिळत नाही, म्हणून लोक पुन्हा आपल्या बचती वाढवून मूळच्या संपत्तीचे मूल्य अबाधित ठेवण्याचा प्रयत्न करीत असतात. कमी व्याजदराच्या काळातदेखील लोक बचत करणे पसंत करतात. अशा बचतींना मुंडेल सक्तीची बचत संबोधतात. बचतीमुळे भांडवल निर्मिती होते आणि त्यातून उत्पादनाची अभिवृद्धी होते. लोक सारासार विचार करून बचतीचा निर्णय घेत असतात. सामाजिक आर्थिक आणि राजकीय घटकांचा त्यावर प्रभाव पडतो. तात्पर्य, फिशरच्या निरीक्षणाप्रमाणे भविष्यातील वृद्धी अथवा अतिवृद्धीची अटकळ सद्यस्थितीतील मौद्रिक व्याजदर कमी अथवा अधिक होण्यावर होतो. पण तो अतिवृद्धीच्या काळात अथवा अपवृद्धीच्या प्रमाणापेक्षा कमी असतो.

केन्सवादी विचारवंतांनी यावर टीका केली. व्याजदर पैशाच्या मूल्यावर परिणाम घडवून आणतो, उपलब्ध भांडवलाच्या सीमान्त कार्यक्षमतेवर नाही. एखाद्या विशिष्ट जीवनशैलीसाठी जगण्याचा खर्च स्थिर असतो. किंमती ज्यावेळी वाढतात, त्यावेळी व्याजदर वाढत असतो; पण इतका नाही, जितका जगण्याच्या भरपाईपेक्षा तो अधिक असेल अथवा किंमती ज्यावेळी घटतात, त्यावेळी व्याजदर घटतो; पण तो जगण्याच्या हानीकारक भरपाईपेक्षा कमी असेल. पैशाच्या पुरवठ्यातील दरापेक्षा वास्तव व्याजदर जास्त विचलित असतो. पैशातील व्याजदर हा किंमत वाढीच्या दराबारोबर अचूक आणि आज्ञाधारकपणे बदलतोच असे नाही. वास्तव व्याजदराचा तो भ्रम असतो. पैशाच्या व्याजदरातील भ्रमाने नकळत अतिवृद्धी अथवा अपवृद्धीशी तडजोड क्रमप्राप्त असते. वास्तव आणि सिद्धांत यामध्ये तफावत निर्माण करणारी मांडणी मुंडेल यांनी केलेली आहे, अशी केन्सवादी अर्थशास्त्रज्ञांची मांडणी होती. त्यांच्या विचारांची चौकट मागणी-प्रणित आहे. तर फिशर आणि मुंडेल यांची मांडणी पुरवठा-प्रणित आहे. मुंडेल यांच्या मांडणीला निष्क्रिय बनविता येणार नसले तरी त्यातील वास्तव व विश्लेषण थक्क करणारे आहे म्हणून वस्तुस्थिती आणि सिद्धांत यामध्ये मेळ बसवता येत नाही.

**नवसनातनवादी अभिवृद्धी आणि अतिवृद्धी**

अभिवृद्धी आणि अतिवृद्धी यातील सहसंबंधाबाबत टोबिनचे (१९६५) योगदान सनातनवाद्यांच्या चौकटीत बसणारे विश्लेषण आहे. सोलो आणि स्वान (१९५६) यांच्या विचारांना पाठिंबा देऊन टोबिन, पैशाच्या मूल्यसंचय या कार्याला महत्त्व देतात. लोक भविष्यकाळासाठी बचत करतात. अशी बचत पैसा बाळगून अथवा भांडवल संपादुन करता येते. दैनंदिन व्यवहारासाठी लोक कमी पैसे बाळगत असतात, आणि उच्च परताव्यासाठी भांडवल स्वीकारणे अधिक पसंत करतात.

टोबिनच्या प्रारूपाचे विश्लेषण खालील दोनसूत्राने अधिक स्पष्ट होईल.

1. $k_{t+1} = (I - d)\, kt + it$
2. $it = sk\,(kt)$

जिथे;

k = t काळातील भांडवली साठा

i = t काळातील स्थूल गुंतवणूक खर्च

f(sk) = उत्पादन तंत्र, ज्यामध्ये फक्तभांडवलाचे विशिष्ट काळातील आदान दर्शविते.

d = भांडवलाच्या घसाऱ्याचा स्थिर दर

sk= आणखी भांडवल संचयासाठी उत्पादनातील एक विशिष्ट हिस्सा ज्याची बचत केली जाते.

वरील दोन्ही सूत्रांनी असे स्पष्ट होते की, बचत ही उत्पादनातील एक ज्ञात हिस्सा आहे आणि तो स्थूल गुंतवणुकी इतका असतो. म्हणजे;

st = sk f(kt) = it

असा असतो.

अचर अवस्थेतील (steady state) भांडवल संचय कालागणिक स्थिर असते. पहिल्या सूत्राच्या संक्षिप्त स्वरूपात मांडावयाचे झाल्यास;


dk = sk f(k)

असा होईल. म्हणजे आणखी भांडवल संचयासाठी उत्पादनातील एका विशिष्ट हिस्स्याची जी बचत केली जाते, ती भांडवलाच्या घसाऱ्याइतकी असते. आकृतीतील dk रेषा, sk रेषेला ज्यावेळी संयोगित होते, तिथे अचर अवस्थेतील वृद्धी निर्माण होते (आकृती १ पाहा).

अतिवृद्धीचा दर ज्यावेळी $P_0$ वरून $P_1$ ($P_1 > P_0$) कडे वाढतो, त्यावेळी पैशाच्या परताव्याचा दर घटतो. म्हणून लोक दुसऱ्या पर्यायाची निवड करतात. ज्यामध्ये पैशाचा परतावा दुसऱ्या पर्यायाने (भांडवलाचे) भरून निघतो, अशावेळी sk वक्र वर सरकतो. परिणामी, रोखासंग्रह यंत्रणा अचर अवस्थेच्या वृद्धीकडे म्हणजे $k_0$ ते $k_1$ कडे सरकतो. ज्यावेळी अचर अवस्था निर्माण होते, त्यावेळी अभिवृद्धी होत नाही. टोबिनच्या चौकटीतील हे विश्लेषण असे सांगते की, कायम स्वरूपाची अतिवृद्धी

दर कायमस्वरूपी उत्पादन निर्मिती करतो. पण उत्पादनातील अभिवृद्धी अल्पकालीन असते. कारण, भांडवल संचयाची अचर व्यवस्था $k_0$पासून $k_1$कडे सरकते. हाच तो नवसनातनवाद्यांचा अचर अवस्थेतील वृद्धिदर. हा वृद्धिदर अतिवृद्धीच्या प्रमाणात घटतो

**आकृती १ : टोबिन परिणाम**




संदर्भः http://www.good2use.com/knet/economic/tobin.htm भेट दिनांक १५ जानेवारी, २०२१ वेळ २.३७pm.

अथवा वाढतो. पण f(k)वक्र मात्र नेहमी वर स्थिर होतो. कारण, बाह्य घटकातील तांत्रिक बदलामुळे भांडवलाचे f(k) फलन नेहमी उच्च अवस्था गाठते.

थोडक्यात, अभिवृद्धी आणि अतिवृद्धी या दोहोंतील सहयोग पैशाच्या सहसंबंधाने बदलतो. दीर्घकालीन अभिवृद्धीवर तंत्रज्ञानातील प्रगतीचा प्रभाव पडत असतो. अतिवृद्धीमुळे भांडवल-श्रम प्रमाणावर कायमस्वरूपी बदल घडून येतात. अभिवृद्धीवर याचा परिणाम होतो. पण अभिवृद्धीच्या दरात मात्र कांही बदल होत नाही.

**मॅक्स गिल्लमन आणि मिचल केजक**

मॅक्स गिल्लमन आणि मिचल केजक (मार्च २१, २००२) यांच्या एका संशोधनातील सारांशानुसार अतिवृद्धीच्या प्रभावामुळे संतुलित अभिवृद्धीच्या मार्गामध्ये अचर अभिवृद्धी आणि त्याच्या परिणामांची पातळी दोन्ही संख्यात्मक आणि गुणात्मक भावाने व्यक्त होतात. परिणामांची तीन गटांमध्ये वर्गीकरण करता येईल;

एक, उत्पादन सदृश्य परिणाम.

दोन, टोबिन प्रकारातील आदानांचा पानांचा रिलायनमेंट.

तीन, बाऊमोल प्रकारचा विनिमय परिणाम.

वरील तिन्ही परिणाम एकत्रित केल्यास उच्चप्रतिची अतिवृद्धी प्रत्ययास येते. त्यासोबत कमी दाबाची अभिवृद्धी, कमी रोजगार निर्मितीच्या दराची स्थैतिक अथवा मंदीयुक्त स्थिती निर्माण होते. जी १९७० व १९८० च्या दशकात  प्रत्ययास आली होती. या प्रारूपामुळे कमी दाबाची अतिवृद्धी, उच्च स्थितीची अभिवृद्धी आणि मोठ्या रोजगारनिर्मितीची स्थिती, जी १९९० च्या दशकामध्ये प्रत्ययास आली होती. ती स्थिती कांही औद्योगिकदृष्ट्या पुढारलेल्या देशांमध्ये आढळून आली होती. याबरोबर अतिवृद्धी आणि गुंतवणूक/उत्पादन प्रमाणामध्ये विस्तारक परिणामांची अवस्था निर्माण होण्यास मदत होते. या सर्व प्रकारच्या बदलांचे मूळ अतिवृद्धीमध्ये असते. हे या शास्त्रज्ञांनी नमूद केले होते. भाववाढीच्या प्रक्रियेमध्ये माणूस फुरसतीच्या(leisure) व्यवस्थेकडे आकृष्ट होतो. अधिक फुरसतीच्यापर्यायाची स्थिती म्हणजे अभिवृद्धी असते. अशा काळात आधार किंमतीच्या प्रमाणात भांडवल-श्रम गुणोत्तर निश्चित होत असते. यातील चल अरेषीय स्थिती गाठतात; म्हणजेच तो अतिवृद्धी-अभिवृद्धी परिणाम असू शकतो. अतिवृद्धीच्या स्थितीमुळे आर्थिक चल कमकुवत होऊन, अरेषीय स्थितीकडे झुकतात. त्यामुळे फुरसतीची स्थिती देखील कमकुवत होते. अतिवृद्धी-अभिवृद्धीतील सहसंबंधामुळे अनेक आर्थिक चलामध्ये बदल होतो, म्हणून समग्रलक्षी समतोलाचे संवेदनशील परिणाम मानवी जीवनावर होणे साहाजिक आहे. त्यामुळे विविध चलांच्या सहसंबंधामधील बदलांच्या आणि परिणामांच्या प्रमाणामध्ये विविधता येते. या सहसंबंधातील महत्त्वाचा दुर्लक्षित घटक म्हणजे, पतपुरवठा आणि उत्पादन. वित्तीय उत्पादन फलन प्रक्रिया आणि अभिवृद्धी परिणामावर फारसे चिंतन झाले नाही. अतिवृद्धी आणि उत्पादनातील अभिवृद्धी नकारात्मक बनते, असे विधान अनेक विचारवंतांच्या गटाने केलेले आहे. मॅक्स गिल्लमन आणि मिचेल केजक यांनी टोबिन परिणामांची दुसरी आवृत्ती सादर केली असे म्हटले जाते. या दोहोतील (अतिवृद्धी-अभिवृद्धी) सहसंबंधांच्या परिणामांची पातळी वेगवेगळी राहते. उदाहरणार्थ, वास्तव वेतनाचा वास्तव व्याज दरावरील परिणाम, व्याजदराच्या लवचिकतेवरील मुद्रेच्या मागणीवर अवलंबून असतो. अतिवृद्धी हा एक प्रकारचा कर (tax) आहे. ज्यामुळे वास्तव वेतन वाढण्यास मदत होते. महागाई भत्ता

म्हणूनच दिला जातो. तसेच अशा परिस्थितीत बाजारातील कमाईवर बंधने येतात. व्याजदरातील लवचिकतेमुळे अभिवृद्धीदरामध्ये (वाढीमुळे) अडथळे निर्माण होतात, आणि भांडवल-श्रम प्रमाणामध्ये वाढ होऊ लागते. थोडक्यात, अनेक पुराव्यावरून हे स्पष्ट होते की, अतिवृद्धीमुळे दीर्घकालीन अभिवृद्धीवर नकारात्मक परिणाम दिसून येतात.

टोबिन (१९६५)आणि सोलो (१९५६) यांच्या विस्तारित विवेचनावरून असे लक्षात येते की, पैशाच्या मागणीच्या फलन प्रक्रियेमध्ये भौतिक भांडवल आणि पैसा हे जवळचे पर्याय असतात. दीर्घकाळामध्ये पैशापेक्षा भांडवलाचा पर्याय अनुकूल राहतो. त्यामुळे भांडवल-श्रम प्रमाणामध्ये वाढ होते. हा टोबिनचा धनात्मक परिणाम आहे. त्यामुळे भांडवलाची सीमांत उत्पादकता आणि वास्तव व्याजदर कमी होऊ लागतात. यामुळे अल्पकाळात उत्पादन वाढेल, पण ही वाढ दुसऱ्या टप्प्यातील अभिवृद्धीची नवीन अचर अवस्था निर्माण होईपर्यंतच असेल.

अतिवृद्धीमुळे ग्राहकांना एक प्रकारचा नवा कर द्यावा लागतो. त्यामुळे फुरसतीच्या जीवनातील तौलनिक उपभोगावरील परिणामामुळे वस्तू उत्पादनातील भौतिक आणि बौद्धिक भांडवलावरील परताव्याचा दर कमी होतो. त्यामुळे वास्तव व्याजदर कमी होतो. पण वास्तव वेतन व वास्तव व्याजदराच्या आदान-किंमत प्रमाणामध्ये वाढ होते आणि भांडवल-श्रम प्रमाणामध्ये देखील वाढ होते. भौतिक व बौद्धिक भांडवलाच्या परताव्यातील सामान्यीकरणासाठी फुरसतीच्या जीवनातील सुखासिनतेच्या स्थितीकडे दुर्लक्ष करावे लागते. पण ते एका विशिष्ट कालावधीसाठीच असू शकते. अतिवृद्धी करामुळे (inflation tax) अभिवृद्धी दर घटतो, ही वस्तुस्थिती आहे. असे अनेक परिणाम अनेक आर्थिक चलावर परिणाम करीत असतात. यातील परिणामांचे विश्लेषण मुख्यत्वे भौतिक व बौद्धिक भांडवलावर केंद्रित झाले आहे. म्हणजे, अतिवृद्धी कराचा भौतिक आणि बौद्धिक भांडवलावर परिणाम होऊ शकतो. त्यालाच आपण टोबिनचा उलटा अथवा सुलटा परिणाम म्हणतो.

**अहमद आणि रोजर्स (१९९८)**

अर्थव्यवस्था ज्यावेळी कमी अतिवृद्धीच्या अचर अवस्थेत असते, त्यावेळी अतिवृद्धी कायमस्वरूपी घटते, उदाहरणार्थ, २% बिंदूनी घटते. अशा परिस्थितीत दीर्घकाळातील आर्थिक चलांमध्ये काय व कसे बदल होतात? हे पाहणे उचित ठरेल. याला अहमद आणि रोजर्स यांचा 'मोठा अनुपात' (great ratios) असे म्हणतात. पण भविष्यकाळ वर्तविणे खूप कठीण आणि अवघड असते. युद्धोत्तर (१९५०-१९९५) आणि आंतरयुद्धाच्या काळात (१९१८-१९४१) टोबिनचा परिणाम अस्तित्वात आला होता. अशावेळी पूर्ण नमुना मोजणीमध्ये दोन दृष्टिकोन प्रत्ययास आले होते.

१. आंतरयुद्धाच्या कालावधीत उत्पादन गुंतवणूक आणि उपभोगामध्ये दीर्घकाळ मोठ्या प्रमाणातील परिणामांच्या प्रभावाखाली अर्थव्यवस्था राहिली होती. आणि युद्धोतर काळात अगदीच कमी पातळीवरच्या परिणामांची पातळी अनुभवास आली होती.

२. दुसऱ्या मोजणीच्या प्रकारांमध्ये आंतरयुद्धाच्या आणि युद्धोतरच्या काळात अतिवृद्धीचे महत्त्व अधिक असल्याचे आढळून आले होते. पण दुसऱ्या महायुद्धानंतर दीर्घकाळात असे आढळून येणे नित्याचीच बाब होती. पण त्याचे कमी पातळीचे धक्के व्यवस्थेला जाणवले, असे अहमद आणि रोजर्स सांगतात.

**सिद्राऊस्की(१९६७)**

नवसनातनवाद्यांच्या चौकटीतील अतिवृद्धी आणि अभिवृद्धीचा आणखी एक सहसंबंध सिद्राऊस्कीनी १९६७ साली मांडला. याला मुद्रानीतिचा आधि-

तटस्थतेचा (super-nutrality) परिणाम असे संबोधले जाते. या प्रारूपाला रामसेच्या(१९२८) पर्याप्त बचतीच्या अभिवृद्धी प्रारूपाची पार्श्वभूमी आहे. रोबिन्सन क्रुसोच्या बचत गुंतवणूक व उपभोगाच्या संदर्भातील तटस्थता याठिकाणी प्रत्ययास येते. काळ पसंतीच्या उत्पादकतेसाठीचे उपलब्ध तंत्रज्ञान उपभोगातील प्रवृत्ती सुनिश्चित करीत असतात. तसेच उपभोग-बचतीतील अवलंबित्व निश्चित करतात, अशी मांडणी सिद्राऊस्कींनी मांडलेली आहे. यामध्ये पैशाचा दुवा महत्त्वाचा असतो. उपभोक्ता स्वतः पैसे साठवायचे की त्याचा उपयोग घ्यावयाचा? की बचत करायची? की गुंतवणूक करायची? हे ठरवित असतो. पैसे स्वतःकडे बाळगण्याचे वास्तवमूल्य तो ओळखून असतो. उपभोग ही मुद्रावादी संकल्पना नाही. पैशाच्या वृद्धीचा उत्पादन अभिवृद्धीवर कांहीही परिणाम होत नाही. पैसा हा आधि-तटस्थ (super-nutral) घटक आहे. म्हणूनच अशा परिस्थितीत नवसनातनवादी द्वंद्व निर्माण होतो.

सिद्राऊस्कीच्या दृष्टिकोनानुसार बचत करणे आनंददायी असल्याने लोक त्याला पसंती देत असतात. टोबिन हे मान्य करीत नाहीत. त्यांच्या मते, बचत हे स्थिर उत्पादनाचे प्रमाण दर्शवते. याउलट पैसा हे अंतर्गत व्यवहार करणारे सुलभ साधन आहे, असे सिद्राऊस्कीला वाटते. म्हणूनच देशाच्या फुरसतीची स्थिती वास्तव पैशाच्या अधिग्रहणावर अवलंबून असते, असे त्यांना वाटते. अतिवृद्धीच्या अचर अवस्थेवर कांही परिणाम होत नाही. उत्पादन अथवा त्याच्या अभिवृद्धीवर अतिवृद्धीचा कांहीही परिणाम होत नाही.

टोबिनपेक्षा सिद्राऊस्कीचे मत वेगळे का बनले? अतिवृद्धीच्या काळात बचतीकडून भांडवलाकडे लोक वळतात असे टोबिनला वाटते, तर अतिवृद्धीच्या काळात लोक बचत कमी करतात. कारण, त्यांच्या बचतीचे वास्तवमूल्य अतिवृद्धीमुळे घटते, भांडवलाचा साठा मात्र त्यावेळी अचल असतो असे सिद्राऊस्की म्हणतात.

थोडक्यात, टोबिनची बचत ही उत्पादनासाठीची अचल घटक असू शकत नाही. पण लोक पर्याप्त बचत दर स्वीकारतात. अतिवृद्धीमुळे अभिवृद्धीचा मार्ग मोकळा सुकर होतो. नवसनातनवादी द्वंद्व मात्र यामुळे क्षीण होते. दीर्घकाळात उपभोगावर परिणाम दिसून येतात.

**चारी आणि मन्यूएल्लि (१९९६)**

अतिवृद्ध आणि अभिवृद्धी यातील सहसंबंध विसंगत स्वरूपाचे असतात. पण त्यामध्ये विनिमय तंत्रज्ञान खूप उपयुक्त आहे, असे चारी आणि मन्यूएल्लि (१९९६) यांचे विधान आहे. त्यांच्या विनिमय तंत्रज्ञानामध्ये पर्यायताची खूप आवश्यकता असते. अतिवृद्धी कर विनिमयाकडून वस्तूंच्या विनिमय तंत्राकडे जाण्याचा नेहमी कल असतो किंवा वस्तूकडून फुरसतीकडे जाण्याचा कलदेखील कांही शास्त्रज्ञांनी मांडलेला आहे. अतिवृद्धीमुळे अभिवृद्धीवर नकारात्मक परिणाम होतात. पण ते फार तीव्रतेचे नसतात. तथापि, त्याची तीव्रता मोजण्याच्या प्रक्रियेमध्ये अनेक विवाद आहेत. सर्वसाधारणपणे, सरासरी १० टक्क्याची अतिवृद्धी झाल्यास अभिवृद्धी ०.२ ते ०.७% नी घटते, असे या लेखकद्वयांचे मत आहे.

**स्टॉकमन परिणाम**

स्टॉकमन (१९८१) यांच्या मते, अतिवृद्धीतील वाढीमुळे कमी अचर अवस्थेतील उत्पादनाची अभिवृद्धी निर्माण होते आणि लोककल्याण मात्र घटक जाते. यामध्ये पैशाची भूमिका भांडवलाचीच असते. अतिवृद्धी-अभिवृद्धीतील सहसंबंध मात्र नकारात्मक असतो. उद्योगसंस्था नेहमी कांहीतरी पैसे खर्च करून

गुंतवणूक करीत असतात, त्यामुळे भांडवल निर्मिती होत असते. अशी पैशातील गुंतवणूक, उपभोग आणि भांडवलाच्या खरेदीवर मर्यादा आणते. बँका नेहमी उद्योगसंस्थांची मत्ता वाढविण्याच्या प्रक्रियेला महत्त्व देतात. अतिवृद्धीच्या काळात पैशाचे मूल्य कमी होत असल्यामुळे वस्तूंची आणि भांडवलाची खरेदी कमी होते. अतिवृद्धीमुळे अचर अवस्थेतील उत्पादन घटते. त्यालाच 'स्टॉकमनचा परिणाम' म्हणतात. भांडवल संचयासाठी पैशाची गरज असते. थोडक्यात, पैसा आणि भांडवल एकमेकाला पर्यायी आणि परस्परपूरक आहेत, असे स्टॉकमनला वाटते.

स्टॉकमनचा हा परिणाम पुरवठाप्रणित दृष्टिकोन आहे. गरीब आणि श्रीमंत देशांना निरहस्तक्षेपवादी (laissez faire) बाजारयंत्रणेचा फायदाच होतो, असे स्टॉकमन यांना वाटते. वास्तव राष्ट्रीय उत्पादनामध्ये वाढ होणे दोन्ही राष्ट्रांना (गरीब व श्रीमंत) पसंतीचे असते. अतिवृद्धी, विनिमय दर, आंतरराष्ट्रीय व्यापारातील प्रवृत्ती आणि छोट्या राष्ट्रांची देयके इत्यादी विनिमययोग्य पैशाच्या मागणीवर अवलंबून असतात. अतिवृद्धीमुळे पैशावर अथवा पैशाच्या व्यवहारावर कर लादलेल्यासारखी स्थिती निर्माण होते. पैशाच्या पुरवठ्यातील वाढीमुळे घरेलू उत्पादनाचे वास्तव मूल्य घटते. त्यामुळे ते (उत्पादन) बदलत राहते, पण आंतरराष्ट्रीय तौलनिक व्यापाराचे फायदे मात्र बदलतात. विनिमय दरातील घसरणीमुळे, मुद्रा-विस्तार मात्र वृद्धिंगत होतो, त्याचा परिणाम म्हणून अतिरिक्त व्यापारतोल निर्माण होऊन भांडवलाचे पलायन सुरू होते, परिणामी व्यापारामध्ये तूट निर्माण होते.

स्टॉकमन परिणामाचा दृष्टिकोन श्रम-फुरसत (labour-leisure) निर्णयालासुद्धा लागू होतो. ग्रीनवूड आणि आणि हाफमेन (१९८७) यांनी श्रम आणि फुरसत दृष्टिकोनाचा विचार मांडलेला आहे. कुलेय आणि हन्सेन(१९८९) यांनी भांडवल संचयाच्या परिणामांची चर्चा केलेली आहे. अभिवृद्धी आणि अतिवृद्धीच्या सहसंबंधांमध्ये अनेक समग्रलक्षी आर्थिक चलांचा समावेश झालेला असल्यामुळे प्रत्येक चलाशी संबंधित असलेले कार्य-विश्लेषण अनेक शास्त्रज्ञांनी मांडलेले आहे. असाच एक सहसंबंध अभिवृद्धी आणि श्रम यांचाही आहे.

**अतिवृद्धी आणि श्रम**

अतिवृद्धी-अभिवृद्धी सहसंबंधांचे कांही दृश्य परिणाम मनुष्यबळाच्या फुरसतीवर (घट) होतो. हा मनुष्यबळाच्या परतव्याचा परिणाम असतो. असे जर असेल तर, अतिवृद्धीच्या काळात रोजगार वृद्धी घटली पाहिजे आणि सातत्याने वाढत्या अतिवृद्धीच्या काळातही ती घटली पाहिजे. ओकूनच्या सिद्धांताच्या नेमकी उलटी स्थिती दिसायला पाहिजे. पण कुंठितावस्थाच्या काळात असे घडत नाही. वास्तवात मात्र भारतासारख्या देशांमध्ये गेल्या तीस वर्षांमध्ये ओकूनच्या तत्त्वाच्या नेमकी उलट स्थिती आढळून येते. म्हणजे वाढत्या अतिवृद्धीच्या काळात रोजगार कमी झाला आहे आणि घटत्या अतिवृद्धीमध्ये रोजगारवृद्धी घटलेली आढळते.

ल्युकास (१९९६)यांच्या प्रारूपामध्ये अतिवृद्धीमुळे व्यापारचक्राच्या संक्रमण परिणामाचा प्रभाव दिसून येतो. ल्युकासयांच्या प्रारूपामध्ये मनुष्यबळ हा वृद्धीच्या अंतर्गत येणारा घटक आहे. तो टोबिन परिणामाच्या विनिमय अवस्थेमध्ये भांडवलाची सखोलता वाढवितो आणि कमी वास्तव व्याजदराची स्थिती निर्माण करतो. तसेच नकारात्मक अतिवृद्धी-अभिवृद्धी परिणाम घडवून आणतो. अशावेळी विनिमय तंत्र मात्र स्वतंत्र राहते. अतिवृद्धीच्या काळात भांडवली आदानाची शक्ती वाढविली जाते.

**कुलेय आणि हन्सेन(१९८९)**

या लेखकद्वयांनी दर्शवल्याप्रमाणे अतिवृद्धीच्या काळात उत्पादन पातळी कायमचीच कमी होते. श्रमाच्या (जबाबदारी) भूमिकेमुळे उत्पादन अतिवृद्धीच्या अवस्थेत राहते. अतिवृद्धीच्या कल्याण खर्चाची मोजणी सनातनवादी चौकटीत बसून हिशोब करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. रोखीच्या स्वरुपात पैसे ठेवणे म्हणजे एक अडथळा असतो, असे त्यांचे म्हणणे आहे. पण कल्याणकारी स्थिती अनेक घटकांवर अवलंबून असते. केवळ ते पैशावर निर्धारित होत नाही. पण अतिवृद्धी करामुळे कल्याण खर्च वाढतो, ही वस्तुस्थिती आहे. अतिवृद्धी कमी करून, अतिवृद्धी करांनी महसूल वाढवून परिस्थितीवर मात करण्याऐवजी श्रम व भांडवलावरच या कर दरामध्ये वाढ करून परिस्थितीवर मात करण्याची धोरणे आखावित, असे कुलेय आणि हन्सेन यांनी सुचविलेले आहे. असे केल्याने अतिवृद्धी अल्पकाळात का होईना शून्यावर येईल. तथापि, हा कायमचा उपाय नाही. खर्च कमी करणाऱ्या अतिवृद्धीमुळे मात्र लाभता वाढत राहते हे निश्चित.

**आईनारस्सौन आणि मोक्यूईस (१९९७)**

अमेरिकेतील घरगुती व व्यावसायिक गुंतवणुकीच्या चक्रीय प्रक्रियेमध्ये कसा बदल घडवून आणला गेला? याच्या कांही वैशिष्ट्यांचे विश्लेषण या लेखकद्वयांनी केलेले आहे. या दोन क्षेत्रातील गुंतवणुकीमुळे अर्थव्यवस्थेत चक्रीय हालचालीद्वारे बदल होतात. यावर आणखी संशोधन होणे अगत्याचे आहे. घरांच्या किंमतीत एका विशिष्ट परिस्थितीमध्ये चढ-उतार होतात, ते लवकर स्थिरावत नाहीत. अतिवृद्धीमुळे मानवी भांडवल उत्पादन प्रमाणात मात्र वाढ होत असते. अलीकडच्या काळात ही परिस्थिती भारतामध्ये पाहायला मिळते. अतिवृद्धी आणि अभिवृद्धीतील सहसंबंध धनात्मक असल्याचे विश्लेषण या लेखकांनी केले आहे.

**गोमे पौल(१९९३)**

गोमे पाऊल(१९९३)यांनी अंतर्जात (endogeneous) अभिवृद्धीचा दृष्टिकोन स्वीकारलेला आहे. त्या चौकटीतील सिद्धांतानुसार मुद्रावृद्धी- म्हणजे-अतिवृद्धीमुळे उपभोग कमी होतो. वास्तव वृद्धी घटते आणि श्रमाचे प्रयत्न फोल ठरतात. कुलेय हन्सेनच्या (१९८९) दृष्टिकोनापेक्षा कल्याणकारी व्यय, अल्पप्रमाणात व्यक्त होतात म्हणून अतिवृद्धीचा दर शून्यावर आणला जावा, अशी सूचना अमेरिकेच्या प्रशासनाला त्यांनी केलेली होती. कुलेय-हन्सेनच्या दृष्टिकोनानुसार सरकारी तिजोरीत महसुली भर टाकायचे झाल्यास भांडवली करापेक्षा अतिवृद्धी करप्रणाली योग्य आहे, असे त्यांचे मत होते. उपभोग-परिणाम आणि श्रमाच्या फुरसतीचे महत्त्व वाढल्याचा प्रत्यय आल्याचे निदर्शनास येते. कल्याणकारी व्ययामुळे अर्थव्यवस्थेतील उपभोग प्रमाण तीन पटींनी घटते. भांडवल संचयाच्या निर्णयावर अतिवृद्धीचा परिणाम होतो.

**आयर्लंड (१९९४)**

आयर्लंड यांच्या मते, रोखारूपी पर्यायता यंत्रणेपेक्षा उपभोग-बचतीसंबंधीचे निर्णय अधिक महत्त्वाचे आहेत. सकल उत्पादन फलनामध्ये भौतिक भांडवलाचे महत्त्व अधिक आहे. तसेच भांडवलाच्या सीमांत स्थिर उत्पादनाचाही प्रभाव अस्तित्वात येतो. कोणत्याही देयकाच्या प्रक्रियेमध्ये सरकारी पैसा आणि पत यांचा वापर होत असतो. उपभोक्त्याला अतिवृद्धी नको असते. तथापि, वस्तूंच्या खरेदीसाठी रोख पैशाऐवजी पतपुरवठा झाल्यास उपभोक्ता क्रय-विक्रय प्रक्रिया अस्तित्वात आणतो. म्हणूनच अनेक विक्रीय संस्थांमध्ये पतपुरवठा करण्याची सोय निर्माण केलेली असते. अतिवृद्धीबरोबर पतपुरवठ्याचे व्यवहार

वाढतात, ही वस्तुस्थिती आहे. पतपुरवठ्याच्या वाढत्या सीमांत व्ययाबारोबर पतपुरवठ्याचे प्रमाण वाढवून असे अतिवृद्धीचा प्रभाव कमकुवत करण्याचा प्रयत्न केला जातो. अशा आशयाचे विश्लेषण गिल्मन (१९९३, २०००) आईयागरी आणि इतर (१९९८) आणि वेंचुरा (२०००) यांच्या लिखाणामध्ये आढळून येते. या सर्व प्रारूपामध्ये पतपुरवठा हा एक महत्त्वाचा घटक असल्याचे निदर्शनास येते. आयर्लंड (१९९४) यांच्या विश्लेषणामध्ये देखील नवसनातनवादी अभिवृद्धी आणि व्यापारचक्राच्या सिद्धांतातील साम्य दिसून येते. पतपुरवठ्याच्या उत्पादन फलन प्रक्रियेमध्ये वाढता सीमांत व्यय प्रत्ययास येतो. कारण, आयर्लंडच्या अर्थव्यवस्थेमध्ये वस्तुंचे रूपांतर भांडवलात होते. पतपुरवठ्याच्या उत्पादन फलनामध्ये वस्तूऐवजी भांडवलाचा वापर अभिप्रेत असतो.

**आतिश घोष आणि स्टिवन फिलिप्स (१९९८)**

निम्नस्तरावरची अतिवृद्धी असावी, असे सर्वच शासन व्यवस्थेला अभिप्रेत असते. यामुळे अधिक उत्पादनाची अभिवृद्धी साध्य करता येते. अभिवृद्धीवर अनेक घटकांचा प्रभाव असतो. अल्पकाळासाठी कोणीही अतिवृद्धी स्वीकारतो. अगदी ४०% च्या अतिवृद्धीमुळे नकारात्मक स्थिती निर्माण होते. पण अशी स्थिती क्वचितच निर्माण होते. अशा बाबी नियमित नसतात. सर्वसाधारणपणे ५ ते ३० टक्क्याची वार्षिक अतिवृद्धी सर्वच राष्ट्रांना पसंत असते. घोष आणि फिलिप्स यांच्यामते अति वृद्धी-अभिवृद्धी यांच्यातील सहसंबंध ऋणात्मक आहेत. अशी स्थिती संख्याशास्त्रीय व अर्थशास्त्रीयदृष्ट्या अधिक महत्त्वाची असते. त्यामध्ये अरेषीय सहसंबंध दोन कारणांनी तयार होतात;

एक, अगदी कमी प्रमाणातील अतिवृद्धीच्या काळात अभिवृद्धी-अतिवृद्धी यातील सहसंबंध धनात्मक असतात.

दोन, अधिक प्रमाणातील अतिवृद्धीच्या परिस्थितीत, अतिवृद्धीचा अभिवृद्धीवरील परिणाम सीमांतकीय स्वरूपाचा असतो. या दोहोंतील अरेषीय परिस्थितीमध्ये अत्यंत कमी प्रमाणात परिणाम होतात. पण अतिवृद्धी वाढावी असे अनेकांना वाटत राहते. म्हणूनच अतिवृद्धीमुळे अभिवृद्धी कमी होते, हे सांगणे अवघड अथवा कठीण आहे. ब्रुनो आणि इस्टरलि (१९९५) यांच्यामध्ये अभिवृद्धीची सुरुवात अतिवृद्धीच्या मंदन प्रक्रियेनंतर होते. साधारणतः आठ टक्क्याच्या खाली घसरणारी अतिवृद्धी आणि सात टक्क्यापेक्षा अधिक वास्तव मुद्रा पुरवठा यामुळे अभिवृद्धी कमी होते. त्यामुळे परिणामांचा प्रभाव संख्याशास्त्रीयदृष्ट्या महत्त्वाचा नसतो (टी-स्टॅटिस्टिक्सः १.०१). ज्यावेळी अतिवृद्धीची सुरुवात आठ टक्क्यांवरून होते आणि मुद्रेचा पुरवठा बारा टक्क्यांच्यावर असतो, त्यावेळी घरेलू उत्पादनाची अभिवृद्धी कमी होते. पण हे संख्याशास्त्रीयदृष्ट्या महत्त्वाचे नसते (घोष आणि फिलिप्स, १९९८).

अतिवृद्धीमुळे अभिवृद्धीवर परिणाम होऊ शकतात. पण अतिवृद्धी रोखण्याच्या थेट धोरणाचा प्रभाव कमकुवत असतो. विशेषतः अल्पकाळात समग्रलक्षी धोरण आणि बाह्य धक्क्याच्या परिणामामुळे त्याचा प्रभाव कमकुवत असतो. धोरण निर्धारित करण्याची संधी अतिवृद्धी देत असते. अतिवृद्धी-अभिवृद्धी या दोहोंतील सहसंबंध अल्पकाळातच प्रभावित होतात, हे काही आकडेवारीवरून सिद्ध झाले आहे. प्रशासकीय निर्णयाने अतिवृद्धी कमी करता येते. अभिवृद्धीला महत्तम स्थितीला पोहोचविणारी अतिवृद्धी निश्चित करणे अवघड असते. अलीकडे अतिवृद्धीचे लक्ष (inflation targeting)निर्धारित करण्याची सुलभता निर्माण करता आले आहे. केवळ

उच्च दाबाच्या अतिवृद्धीमध्ये अतिवृद्धी-अभिवृद्धी यातील पेचप्रसंग नकारात्मक बनतात.

**ग्रीनवूड आणि हुप्पमन**

ग्रीनवूड आणि हुप्पमन या लेखकद्वयांनी आपल्या संशोधनामध्ये असे सिद्ध केले आहे की, लोक उपभोगासाठी पैसा बाळगतात. त्या पैशातून खरीदल्या जाणाऱ्या वस्तुपासून उपयोगिता आणि फुरसत दोन्ही बाबी साध्य करता येतात. अतिवृद्धीमुळे जास्त पैसे खर्च करावे लागतात. त्यामुळे श्रमाचा परतावा कमी होतो. कुलेय आणि हन्सेन यांनी ही यंत्रणा सोप्या शब्दात मांडलेली आहे. पैशातून वस्तू खरेदी खरीदण्यापेक्षा लोक फुरसत मिळविण्याचा प्रयत्न करतात. लोक रोख पैसे बाळगण्याचा परतावा, संपत्ती आणि भांडवलापेक्षा अधिक असतो. छोटे लोक पैसा बाळगणे हिताचे आहे असे समजतात. पण संपत्ती अथवा भांडवलाची दीर्घकालीन स्वीकार्यता अतिवृद्धीच्या काळात लाभदायक ठरते.

**इतर सकल दृष्टिकोन**

अनेकांच्या अनुभवजन्य संशोधनातून विविध रूपे पाहावयास मिळतात. अर्थात, विविध प्रकारच्या संशोधन पद्धतीचा त्यांनी स्वीकार केलेला आहे. प्रत्येकाच्या संशोधनामध्ये अतिवृद्धी-अभिवृद्धी याच्यातील सहसंबंध आतील पेचप्रसंग विविध प्रमाणातील सहसंबंध दर्शवितात. खाली दिलेल्या सारणी क्रमांक १ मध्ये संशोधकांच्या पद्धती आणि त्यांचे निष्कर्ष दर्शविले आहेत. त्यावरून अतिवृद्धी-अभिवृद्धी यांच्यातील सहसंबंधांचे विविध प्रमाण निदर्शनास येतात.

थोडक्यात, अतिवृद्धी-अभिवृद्धी यातील पेचप्रसंग नकारात्मक आणि धनात्मक असल्याचे निदर्शनास येते. काही देशांच्या आर्थिक स्थितीचे अवलोकन करून संबधित निष्कर्ष काढलेले आहेत. बहुतेकांच्या अभ्यासामध्ये नकारात्मक सहसंबंध आढळून आल्याचे दिसते. जी राष्ट्रे अतिवेगवान अभिवृद्धी घडवून आणतात, त्या देशांमध्ये सरासरी १२.३४ टक्क्यांची अतिवृद्धी आढळून येते (लेविन आणि रेनेन्त,१९९१). आणि जी राष्ट्रे मंदगतीची अभिवृद्धी साध्य करतात, त्या देशातील अतिवृद्धी सरासरी ३१.१३% असल्याचे आढळून आले आहे.

अशाच स्वरूपाचा अभ्यास ईस्टर्ली आणि इतरांनी (१९९४) केला आहे. अतिवेगवान अभिवृद्धी साध्य करणाऱ्या राष्ट्रांचा एकक, प्रमाणित विचलन सरासरीपेक्षा जास्त असतो (म्हणजे सरासरी ४%), आणि अतिवृद्धी ८.४२ टक्क्यांची असते. याउलट मंदगतीच्या अर्थव्यवस्थांच्या अभिवृद्धीचे एकक, प्रमाणित विचलन सरासरीपेक्षा कमी असते (म्हणजे ०.२ टक्के), आणि अतिवृद्धी १६.५१ टक्के राहते. लेविन आणि रेनेल्ट आणि ईस्टर्ली व इतरांनी केलेल्या संशोधनानुसार ज्यावेळी अतिवृद्धीमध्ये १० टक्क्यांनी वाढ होते, त्यावेळी ५.२ टक्क्यांनी अभिवृद्धी घटते. अशी स्थिती इतर अनेक राष्ट्रांच्या समूहामध्ये आढळून आलेली आहे. अति-वेगवान अभिवृद्धीच्या राष्ट्रांमध्ये सरकारी उपभोगावर कमी खर्च होतो, गुंतवणुकीचे घरेलू उत्पादन प्रमाण अधिक राहते आणि काळाबाजारचे प्रमाण कमी राहते. अभिवृद्धी-अतिवृद्धी या सहसंबंधात मुद्रानीतिची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते.

फिश्चर(१९९१,१९९३) यांनी समर्स आणि हेस्टॉन(१९९१) यांच्या आकडेवारीचा संदर्भ देऊन परस्पर आणि गटपरागमन (panel regression) पद्धतीचा दृष्टिकोन अवलंबून, कांही राष्ट्र-समूहाचा अभ्यास केलेला आहे. त्यांच्या मते १० टक्क्यांच्या अतिवृद्धीमुळे अभिवृद्धी ०.३% ते ०.४ टक्क्याच्या दरम्यान घटते. त्यासाठी सकल उत्पन्न, माध्यमिक

**सारणी क्रमांक १ - अतिवृद्धी-अभिवृद्धी याच्यातील सहसंबंध**

| लेखक | नमुना निवड | पद्धती | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| कोरेमेंडी आणि मेग्युयर | ४६ राष्ट्रांचा, १९४७-१९७७या काळातील स्फुटक माहितीच्या आधारे | देशांतर्गत परागमन नमुना मध्य | नकारात्मक आणि लक्षणीय सहसंबध |
| फिश्चर | ७३ राष्ट्रे | नमुना मध्यांची तुलना-अतिवेगवान व मंद वृद्धीचा संदर्भ | अतिवेगवान वृधीमध्ये अतिवृद्धी मंद वृद्धीच्या अवस्थेपेक्षा अधिक मंद असते |
| देग्रगरिओ | १२ लाटिन अमेरिकन राष्ट्रे - १९५०-१९८५ | देशांतर्गत परागमन सहा वर्षांची सरासरी अ-परस्परव्यापी | नकारात्मक आणि लक्षणीय सहसंबध |
| गोम्मे | ८२ राष्ट्रे १९४८-१९८९ काळातील स्फुटक माहितीच्या आधारे | देशांतर्गत सहसंबंध वार्षिक आकडेवारी | नकारात्म सहसंबंध क |
| बलार्डे आणि किटिंग | ५८ राष्ट्रे | प्रत्येक देशासाठीची वेगवेगळी परागमन | अतिवृधीचा अ-लक्षणीय दीर्घकालीन उत्पादनावर परिणाम |
| एरिकसन आयर्ण आणि ट्रायन | जी-७ राष्ट्रे | प्रत्येक देशासाठीची वेगवेगळी परागमन | अतिवृद्धीचा अ-लक्षणीय दीर्घकालीन उत्पादनावर परिणाम |

संदर्भ: International Financial Statistics, Published by: Palgrave Macmillan Journals on behalf of the International Monetary Fund.

शाळांच्या पटनोंदणीचे प्रमाण आणि तुटीचा अर्थभरणा यासारख्या समग्रलक्षी आर्थिक चलांचा त्यांनी अभ्यास करून वरील निष्कर्ष काढलेले आहेत.

अशाच पद्धतीच्या बारो (Baro) यांच्या अभ्यासामध्ये (१९९२) १० टक्क्यांच्या अतिवृद्धीच्या काळात अभिवृद्धी ०.२ ते ०.३ टक्क्यांनी घटते. राऊबिनी आणि सला-ई-मार्टिन (१९९२) यांच्या मते, १० टक्क्यांच्या अतिवृद्धीमुळे ०.५ ते ०.७ टक्क्यांनी अभिवृद्धी घटते. असे विविध अनुभव विविध राष्ट्रसमूहांच्या अभ्यासामध्ये आढळून आलेले आहेत.

मोहसिन एस. खान आणि अबडेल्लहकएस.

सेनहाडजी (२००१) यांच्या१४० विकसनशील व औद्योगिकदृष्ट्या पुढारलेल्या राष्ट्रांचा,१९६० ते १९९८ या काळातील पुनरावलोकन अभ्यासानुसार, अतिवृद्धीमुळे अभिवृद्धीच्या प्रमाणात घट होते, असा निष्कर्ष काढलेला आहे. विशेषतः औद्योगिकदृष्ट्या पुढारलेल्या देशांमध्ये अशी स्थिती प्रत्ययास येते. औद्योगिक आणि विकसनशील देशांमध्ये अनुक्रमे ११ ते १२ टक्क्यांच्या अतिवृद्धीमुळे १ - ३ टक्क्यांची अभिवृद्धी अनुक्रमे घटते. या प्रमाणातील विविधता आकडेवारीच्या अवलोकन पद्धतीतील विविधतेमुळे निर्माण झालेली दिसते. विशेषतः गुंतवणूक आणि रोजगारातील बदल आणि उत्पादकतेतील बदलामुळे अतिवृद्धी-अभिवृद्धीतील सहसंबंध अरेषीय होतात असे दिसते.

**उपसंहार**

अतिवृद्धी हा बाह्य घटक नाही, म्हणूनच अतिवृद्धीमुळे अभिवृद्धी बदलते आणि अभिवृद्धीतील बदलाबारोबर इतर अनेक सामाजिक व आर्थिक घटकांवर त्याचे परिणाम दिसून येतात, त्याकडे धोरण कर्त्याला दुर्लक्ष करून चालणार नाही.

जगातील अनेक अर्थशास्त्रज्ञांच्या निष्कर्षानुसार नियंत्रित अतिवृद्धीमुळे अभिवृद्धीमध्ये अनुकूल परिणाम होतो असे दिसते. म्हणून एक अंकी अतिवृद्धी अर्थव्यवस्थेला पोषक अवस्थेला पोचविते.

जर पैसा भांडवलाला परस्परपूरक असेल तर, अतिवृद्धी आणि उत्पादन यामध्ये नकारात्मक सहसंबंध प्रस्थापित होतात, आणि जर पैसा आणि भांडवल एकमेकांना पर्यायी असतील तर अतिवृद्धी-अभिवृद्धी यातील सहसंबंध धनात्मक राहतात.

अतिवृद्धी-अभिवृद्धी या दोहोतील सहसंबंधांमध्ये पैशाची भूमिका मात्र महत्त्वाची ठरते. शिवाय या दोहोतील पेचप्रसंगांमध्ये धनात्मक संबंध असतो असे मात्र कुठे आढळून आलेले नाही. अतिवृद्धीमुळे नागरिकांचे व्यक्तिगत नुकसान मात्र होते. मुद्रा धोरणामुळे अतिवृद्धीवर प्रभाव पडतो, तसाच अभिवृद्धीवरदेखील प्रभाव पडतो असे दिसते. त्याहीपेक्षा जनकल्याणात घट होते ही बाब अधिक गंभीर आहे.

**संदर्भ :**


- Ahmed S. and Rogers, J. H. (2000). Inflation and the great ratios: Long termevidence from the US. Journal of Monetary Economics 45(1): 3–36.
- Baumol, W. (1952) The transactions demand for cash: An inventory – theoretic approach. Quarterly Journal of Economics 66: 545–566.
- Bruno, Michael, and William Easterly, (1995), Inflation crises and long-run growth, NBER Working Paper No. 5209 (Cambridge, Massachusetts: National Bureau of Economic Research).
- Chari, V. V. Jones Larry E. and Manuelli Rodolfo E. (1996), Inflation, Growth, and Financial Intermediation, Review, Federal Reserve System of St. Luis
- Chari, V., Jones L. E. and Manuelli R. E. (1996) Inflation, growth, and financial intermediation Federal Reserve Bank of St. Louis, Review 78(3): 41–58.
- Cooley Thomas F. and Hansen Gary D. (Aug., 1991), The welfare costs of moderate inflations, Journal of Money, Credit and Banking, Vol. 23, No. 3, Part 2: Price Stability. pp. 483-503.
- Cooley, Thomas F. and Hansen Gary D., (l989b), Some welfare costs of monetary and fiscal policy, Paper prepared for 1989 Fall Academic Conference sponsored by the Federal

Reserve Bank of San Francisco.
- Cooley, Thomas F. and Hansen Gary D. (1989a), The inflation tax in a real business cycle model, American Economic Review, 79, 733-748.
- Crowder, W. J. (1998),The long-run link between money growth and inflation. Economic Inquiry, 36(2): 229–243.
- Dotsey, M. and Sarte, P. D. (2000), Inflation uncertainty and growth in a cash-in-advance economy, Journal of Monetary Economics 45(3): 631–655.
- Einarsson, Tor and Marquis, Milton H., (1997),Home production with endogenous growth, Journal of Monetary Economics, Elsevier, vol. 39(3), pages 551-569, August.
- Fischer, Stanley, (1993), Therole of macroeconomic factors in growth, Journal of Monetary Economics, Vol. 32 (December), pp. 485-512.
- Ghosh, A. and Phillips, S. (1998) Inflation, disinflation and growth, IMF Working Paper WP/98/68.
- Ghosh Atish and Phillips Steven (1998), Warning: inflation may be harmful to your growth, Staff Papers - International Monetary Fund, Vol. 45, No. 4 (Dec., 1998), pp. 672-710 Published by: Palgrave Macmillan Journals on behalf of the International Monetary Fund.
- Gillman Max and Kejak Michal (2005), Contrasting models of the effect of inflation on growth, Journal of Economic Surveys Vol. 19, No. 1 Blackwell Publishing Ltd., 9600 Garsington Road, Oxford OX4 2DQ, UK and 350 Main St., Malden, MA 02148, USA.
- Gillman, M. (1993), Welfare cost of inflation in a cash-in-advance economy with costly credit, Journal of Monetary Economics 31: 22–42.
- Gillman, M. and Kejak (2002), Modeling the effect of inflation: Growth, levels, and Tobin, in D. Levine (ed.), Proceedings of the 2002 North American Summer Meetings of the Econometric Society: Money.
- Gillman, M. and Kejak, M. (2005), Inflation and balanced-path growth with alternative payment mechanisms, Economic Journal 115: 1–25.
- Gillman, M. and Nakov, A. (2003),A revised Tobin effect from inflation: Relative input price and capital ratio realignments, US and UK, 1959–99. Economica 70(279): 439–450.
- Gillman, M., Harris, M. and Matyas, L. (2003), Inflation and growth: Explaining a negative effect, Empirical Economics 29(1): 149–167.
- Gillman, M., Kejak, M. and Valentinyi, A. (1999),Inflation and growth: Non-linearities and financial development, Transition Economics Series 13, Vienna: Institute of Advanced Studies, Blackwell Publishing Ltd. 2005.
- Gomme Poul (1993),Money and growth revisited: measuring the costs of inflation in an endogenous growth model,''Journal of Monetary Economics, 32 (1), August 1993, pp. 51-77.
- Gomme, P. (1993). Money and growth: Revisited. Journal of Monetary Economics 32: 51–77.
- GOI, Office of Economic Adviser, Deptt of Industrial Policy and Promotion, Ministry of Commerce and Industry, (2015) Manual on Wholesale Price Index (Base: 2011-12 = 100).
- Ireland, P. (1994), Money and growth: An alternative approach. American Economic Review, 55: 1–14.

- Joseph H. Haslag (second quarter 1997), Output, growth, welfare, and inflation: A survey, Federal Reserve Bank Economic Review, Federal Reserve Bank of Dallas.
- Judson, R. and Orphanides, A. (1999), Inflation, volatility and growth, International Finance, 2(1): 117–138.
- Judson, Ruth and Orphanides Athanasios, (1996), Inflation, volatility and growth, finance and economics, Discussion Paper No. 96-19 (Washington: Board of Governors of the Federal Reserve System).
- Khan, S. and Senhadji A. (2001), Threshold effects in the relationship between inflation and growth, IMF Staff Papers 48(1): 1–21.
- King, R. G. and Rebelo, S. (1990), Public policy and economic growth: Deriving neoclassical implications. Journal of Political Economy, 98(2): S126–S150.
- Laspeyres Etienne (1871), Die Berechnung einer mittleleren warenpreissteigerung in Jahrbucher Fur Nationalokonomie und statistic, (German).
- Lucas R. E. and Stokey N. L. Jr (1983), Optimal fiscal and monetary policy in an economy without capital, Journal of Monetary Economics 12: 55–93.
- Lucas, R. E. Jr (1967), Adjustment costs and the theory of supply Journal of Political Economy 75(4): 321–334.
- Lucas, R. E. Jr (1980), Equilibrium in a pure currency economy. Economic Inquiry 43: 203–220.
- Lucas, R. E. Jr (1988),On the mechanics of economic development. Journal of Monetary Economics 22: 3–42.
- Lucas, R. E. Jr (2000), Inflation and welfare, Econometrica, 68(2): 247–275.
- Luce, R. D. and Raiffa, H. (1957), Games and decisions: Introduction and critical survey, New York: Wiley.
- Luis St. (1996), FRS of St. Luis.
- Mark, N. and Sul, D. (2002), Cointegration vector estimation by panel DOLS and long run money demand, Technical Working Paper 287, NBER, Cambridge, MA.
- Max Gillman and Michal Kejak (March 21, 2002), Modeling the effect of inflation: Growth, levels, and Tobin
- Max Gillman and Michal Kejak (September 17, 2009), Inflation, investment and growth: A money and banking approach.
- Maxwell J. Fry (1981) Inflation, Growth in Pacific Basin Developing Countries, inInflation, Growth and Exchange Rate, FRS, San Francisco, Economic Review.
- Mohsin S. Khan and Abdelhak S. Senhadji (2001), Threshold effects in the relationship between inflation and growth, IMF Staff Papers, Vol. 48, No. 1
- Nicholas Kaldor (Aug., 1959), Economic Growth and the Problem of Inflation Economica, New Series, Vol. 26, No. 103 pp. 212-226 Published by: Blackwell Publishing on behalf of The London School of Economics and Political Science and The Suntory and Toyota International Centres for Economics and Related Disciplines.
- Niehans, J. (1969), Efficient monetary and fiscal policies in balanced growth. Journal of Money, Credit and Banking 1(2): 228–251.
- Okun Arthur M. (1962), Potential GDP, its measurement and significance, Cowles Foundation, Yale University.
- Otto, G. and Crosby, M. (2000). Inflation and the capital stock, Journal of Money, Credit and Banking 32(2): 236–253.
- Paasche Herman (1874), Uber die

preisentwicklung der letzen Jahre nach den Hamburger Boresen – notirungen Johrb Natl Stat. 23, 168-178.

- -”- (2008), The concise encyclopedia of statistics, Springler, Newyork, NY.
- PBEC for orderly conduct of business (Initially funded by USA, Canada, Australia, New Zealand and Japan, later joined South Koria, Mexico, Hongkong, Malaysia, Phillipines)
- Rapach, D. (2003), International evidence on the long-run impact of inflation, Journal of Money, Credit and Banking 35 (1): 23–48.
- Shaghil Ahmed and John H. Rogers (1998), Inflation and the great ratios: long-term evidence from the US.International Discussion Papers, Board of Governors of the Federal Reserve System (U.S.) 20th Street and Constitution Avenue, NW, Washington, DC 20551S
- Shlomo Maital and Yael Benjamini (Summer, 1980), Inflation as Prisoner's Dilemma, Journal of Post Keynesian Economics, Vol. 2, No. 4 pp. 459-481 Published by: M.E. Sharpe, Inc.
- Sidrauski, M. (1967), Inflation and economic growth, Journal of Political Economy 75: 796–810.
- Stockman, A. (1981),Anticipated inflation and the capital stock in a cash-in-advance economy, Journal of Monetary Economics 8(3): 387–393.
- Tobin, J. (1965), Money and economic growth, Econometrica, 33(4): 671–684.
- Werner Baer (spring, 1967), The Inflation Controversy in Latin America: A Survey, Latin American Research Review, Vol. 2, No. 2 pp. 3-25, the Latin American Studies Association.

◆

---

व्यक्तीचे सक्षमीकरण म्हणजे देशाला सक्षम बनविणे. जलद सामाजिक बदल आणि जलद आर्थिक वाढ हा सबलीकरणाचा सर्वोत्तम मार्ग आहे.

**- अटल बिहारी वाजपेयी**

---

# अर्थशास्त्राचे २०२० चे नोबेल स्मृती पारितोषिक : लिलाव सिद्धांत व संबंधित प्रारूपांना

**प्रशांत हरमकर** †

## प्रास्ताविक

अर्थशास्त्राचे २०२० चे नोबेल स्मृती पारितोषिक लिलाव सिद्धांत व नव्याने विकसित केलेल्या प्रारूपांना जाहीर झाले आहे. लिलाव सिद्धांत व नव्याने विकसित केलेल्या प्रारूपाची मांडणी पॉल आर. मिलग्रोम आणि रॉबर्ट बी. विल्सन यांनी केलेली आहे. म्हणून रॉयल स्वीडिश अकॅडमीने अर्थशास्त्राच्या नोबेल पारितोषिकाचे मानकरी मिलग्रोम आणि विल्सन यांना ठरविले आहे. दोन्ही पारितोषिक विजेते कॅलिफोर्नियातील स्टेनफोर्ड विद्यापीठात अध्यापन आणि संशोधनाचे काम करतात. मिलग्रोम मानव्यशास्त्रे आणि विज्ञान विभागामध्ये प्रोफेसर आहे तर विल्सन व्यवस्थापन विभागात प्रोफेसर म्हणून कार्यरत आहे. लिलावाच्या प्रारूपात सुधारणा करण्यामध्ये दोघांनीही मोलाची कामगिरी केली आहे.

लिलाव सिद्धांत अर्थशास्त्रामध्ये प्रत्यक्ष व्यवहारात लागू होतात. बोली लावणारे (bidders) प्रत्यक्ष कृती लिलाव बाजारामध्ये विक्रेत्यासह कशा प्रकारे करतात. लिलाव बाजाराची कोणती वैशिष्ट्ये आहे. लिलावासंदर्भातील भाकिते याबाबतची मांडणी लिलाव सिद्धांतामध्ये असते. लिलाव सिद्धांत म्हणजे वस्तू किंवा सेवाविषयी माहितीचा उपयोग वास्तव जगातील लिलाव रचना तयार करण्याकरिता केला जातो. विक्रेते लिलाव सिद्धांताचा उपयोग उच्चतम उत्पन्न प्राप्तीकरिता करतात. तर खरेदीदार न्यूनतम उत्पादन व्ययाला ही प्रक्रिया पार पाडण्याचा प्रयत्न करतो. खरेदीदार आणि विक्रेते यांच्यामधील किंमत ठरण्याच्या प्रक्रियेचे हे संमेलन असते. अंतिमत: लिलावाद्वारे आर्थिक संतुलन घडून येते.

पारंपरिक लिलाव सिद्धांत व प्रारूपाद्वारे नितंतू वारंवारता (Radio frequency) वस्तूची विक्री करणे कठीण आहे. अशा वस्तू व सेवांकरिता लिलावाच्या प्रारूपाची नव्याने रचना तयार करण्यात आली आहे. ही प्रारूपे लिलावाचे नियम तयार करून वादप्रश्नांना संबोधत असतात. यामध्ये प्रामुख्याने बाजार अपयशाचा वादप्रश्न असतो. माहितीचा आधार घेऊन विविध पर्याप्त व्यूहरचना तयार केल्या जातात. लिलावाच्या प्रारूपाची व्यूहरचना तयार करताना उच्चतम किंमत आणि समाजहित यांना मध्यवर्ती स्थान दिले आहे. उच्चतम लिलाव किंमत आणि समाजहित यांच्या परस्परसंबंधातून

† विभाग प्रमुख, पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग, या.द.व. देशमुख कला व वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, तिवसा, जि.अमरावती.
आजीव सभासद क्र.-१३७९ भ्रमणध्वनी - ९४२०६३३१२८, ई-मेल: haramkarp@yahoo.com

नवीन लिलाव प्रारूपे मिलग्रोम आणि विल्सन यांनी विकसित केलेली आहे.

**मिलग्रोम आणि विल्सन यांचे योगदान**

लिलाव सिद्धांत आणि प्रत्यक्षात लिलाव प्रारूपामध्ये सुधारणा करण्याकरिता मिलग्रोम आणि विल्सन यांना नोबेल स्मृती पारितोषिक देण्यात आले आहे. प्रत्यक्ष लिलाव बाजारामध्ये लिलावाचे कार्य कशा प्रकारे चालते याचे अध्ययन त्यांनी केले आहे. नितंतू वारंवारता, दूरध्वनी यंत्रचालक (Telecom Operator) यासारख्या वस्तू व सेवांचा पारंपरिक पद्धतीने लिलाव करणे कठीण आहे. याकरिता अशा वस्तूंच्या अंतरंगाचा (Insight) वापर लिलाव प्रारूपे विकसित करण्याकरिता केला आहे. नितंतू वारंवारता यांच्या लिलाव प्रक्रियेतील संशोधन क्रेते, विक्रेते आणि करदाते यांना लाभ प्राप्त करून देणारे आहे. सामान्यपणे अशी प्रवृत्ती असते की, विक्रेता लिलावामध्ये त्यांची वस्तू उच्चतम किंमतीला विक्री करण्याचा प्रयत्न करतो तर खरेदीदार ती वस्तू स्वस्तात कशी प्राप्त होईल, याची संधी शोधत असतो. अलीकडच्या काळात संपत्तीचे उद्दिष्ट म्हणजे पैशाची खगोलशास्त्रीय बेरीज (Astronomical Sum) असते. लिलावामध्ये प्रत्येक दिवशी त्यामध्ये बदल घडून येतो. हा बदल केवळ कला व पुरातन वस्तूच्या कौटुंबिक किंवा वैयक्तिक उद्दिष्टापर्यंतच मर्यादित नसतो तर रोखे, खनिजे आणि ऊर्जास्त्रोत यापर्यंत तो विस्तारत जातो. अशा सार्वजनिक संपत्ती (Public Procurement) लिलावांतर्गत हाताळल्या जातात.

लिलाव सिद्धांताचा प्रत्यक्ष उपयोग करताना संशोधक भिन्न नियमाच्या परिणामांना लिलाव किंमत आणि अंतिम किंमतीच्या संदर्भात समजावून घेत असतो. यावरून लिलाव पद्धती ठरत असते. लिलाव पद्धतीचे विश्लेषण करणे कठीण आहे. कारण उच्चतम किंमतीच्या निविदा प्राप्त करणे ही व्यूहरचना आहे. ज्याचा आधार त्या विक्री वस्तू किंवा सेवा याची उपलब्ध माहिती असते. त्यांना स्वत:ला काय माहीत आहे आणि इतर बोली लावणाऱ्यावर (Bidders) विश्वास करतात का या दोन बाबींशी ते संबंधित असते. या दोन्हीचा निश्चित अंदाज असेल तरच उच्चतम किंमत मिळण्याची संभाव्यता असते.

रॉबर्ट विल्सन यांनी लिलाव सिद्धांत विकसित केला आहे. ज्याचे उद्दिष्ट सामान्य मूल्य आहे. सामान्य मूल्यामध्ये अनिश्चितता असते. दुसऱ्याच्या ताब्यात ती वस्तू व सेवा जाण्यापूर्वी सामान्य मूल्यामध्ये अनिश्चितता असते. मात्र अंतिमत: सामान्य मूल्य प्रत्येकासाठी समान असते. उदा. नितंतू वारंवारतेचे भविष्यकालीन मूल्य यामध्ये समाविष्ट असते, विशिष्ट क्षेत्रातील खनिजाचा आकार यामध्ये समाविष्ट असतो. विल्सनने दर्शविले की, का बर बोली लावणाऱ्या मध्ये सामान्य मूल्याच्या अंदाजापेक्षा कमी किंमत ठेवण्याची प्रवृत्ती असते. विवेकी बोली लावणारे आपला विजय घडून येण्याबाबत काळजी घेत असतात. प्रामुख्याने कमी किंमत द्यावी लागेल व आपण हानीच्या बाहेर कसे राहू यावर त्यांनी लक्ष केंद्रित केले असते.

पॉल मिलग्रोमने लिलावाच्या सामान्य सिद्धांताची मांडणी केलेली आहे. यामध्ये केवळ सामान्य मूल्याचाच विचार केला नाही तर खाजगी मूल्याचा देखील विचार केला आहे. यामुळे लिलावाची किंमत उच्चतम ते अति उच्चतम पातळीपर्यंत जाऊन पोहोचते. त्यांनी प्रारूपामध्ये किंमतीच्या व्यूहरचनेचे विश्लेषण केले आहे. या प्रारूपाचे विश्लेषण करताना विक्रेत्यांना उच्चतम किंमत मिळणे अपेक्षित असते तर अंदाजित मूल्यापेक्षा किंमती जास्त राहतात.

दीर्घकाळात लिलावाच्या माध्यमातून वस्तू व

सेवांचे आवंटन कशा पद्धतीने होईल याबाबत बोली लावणाऱ्यांच्या उद्दिष्टामध्ये आधिक्याने गुंतागुंत असते. विशेषत: ही गुंतागुंत भूमी व नितंतू वारंवारतेच्या लिलावामध्ये दिसून येते. अशा गुंतागुंतीच्या उद्दिष्टाकरिता मिलग्रोम आणि विल्सन यांनी नवीन प्रारूपे शोधून काढली. या प्रारूपामध्ये अनेक आंतरसंबंधित उद्दिष्ट आहेत म्हणून महत्तम उत्पन्न प्राप्तीबरोबरच विस्तृत सामाजिक लाभांना प्रोत्साहन समातंरपणे या प्रारूपामध्ये दिलेले आहे. पहिल्यांदा, अमेरिकेमध्ये १९९४ ला नितंतू वारंवारता ते दूरध्वनी यंत्रचालक यांच्या लिलावाकरिता या प्रारूपाचा उपयोग केला आहे. या प्रारूपाचे यश लक्षात घेऊन पुढे इतर देशांनी वर्णपट (स्पेक्ट्रम) लिलावामध्ये त्याचा उपयोग केला आहे. अर्थशास्त्राच्या नोबेल स्मृती पारितोषिक समितीचे अध्यक्ष पिटर फ्रेडरिकसन होते. त्यांनी असे म्हटले की, यावर्षीचे अर्थशास्त्राचे नोबेल स्मृती पारितोषिक मूलभूत सिद्धांत व त्याचा व्यवहारात प्रत्यक्ष उपयोगाकरिता देण्यात आले आहे. त्याचा विस्तार जागतिक पातळीवर झाला असून समाजाला फार मोठा लाभ मिळवून देणारा आहे.

**परिपूर्ण लिलावासाठी संशोधन**

लिलावाच्या वितरणाचे खगोलशास्त्रीय मूल्य क्रेते आणि विक्रेते आहे. पॉल मिलग्रोम आणि रॉबर्ट विल्सन यांनी लिलाव सिद्धांतामध्ये सुधारणा केल्या व नवीन लिलाव प्रारूपे शोधून काढली आहे. परिपूर्ण लिलावाचा शोध घेऊन त्याचा लाभ क्रेते, विक्रेते आणि जगभरातील करदात्यांना झाला आहे. लिलावाला दीर्घ असा इतिहास आहे. प्राचीन रोममध्ये ऋणदाते (Lender) लिलावांद्वारे संपत्तीची विक्री करीत होते. जर ऋणको त्याचे कर्ज परत करण्यास असमर्थ असेल तर त्याची संपत्ती जप्त करीत होते. जगातील सर्वात प्राचीन लिलावाचे ठिकाण रोममधील स्टॉकहोम ऑर्किटनोव्हर्स्क होते. या लिलाव घराची (Auction House) स्थापना १६७४ मध्ये झाली होती. ज्याचे उद्दिष्ट संपत्तीचे सुयोग्य पद्धतीने विक्री करणे होते.

अलीकडच्या काळात जागतिक पातळीवर लिलाव होतात. याकरिता पारंपरिक लिलाव पद्धती किंवा अति-उच्च लिलाव पद्धतीचा (High-End Art Auction) वापर केला जातो. सध्या आंतरजाल (इंटरनेट) किंवा संपत्तीची विक्री संपत्तीच्या प्रतिनिधी (Estate Agent) मार्फत केल्या जाते. लिलावाचा परिणाम हा करदाते आणि नागरिकांसाठी फार महत्त्वाचा असतो. शिवाय कंपन्या व्यवस्थापन करीत असताना आपल्या स्थानाला सोडून लिलावामार्फत संपत्तीची खरेदी-विक्री करीत असतात. कंपन्या लिलावामध्ये न्यूनतम किंमतीमध्ये सार्वजनिक संपत्ती मिळवण्यामध्ये यशस्वी ठरतात. भ्रमणध्वनीची व्याप्ती (Mobile Phone Coverage) नितंतू वारंवारतेवर (Radio Frequency) अवलंबून असते. नितंतू वारंवारता वाढावी याकरिता दूरसंचार यंत्रचालका (Telecom Operator) कडून वर्णपट (स्पेक्ट्रम) लिलाव केले जातात. याकरिता शासनाच्या रोख्याची विक्री केल्या जाते. वीज लिलावामध्ये दररोज किंमत ठरवाव्या लागतात. कारण विजेच्या किंमती लवचिक असतात. युरोपियन संघाच्या औद्योगिक लिलावाचे उद्दिष्ट कार्बन उत्सर्जन कमी करून जागतिक तापमान वाढ सौम्य करणे आहे.

लिलावाचा परिणाम सर्वांवर आणि प्रत्येक पातळीवर होणारा आहे. येणाऱ्या काळात हा परिणाम वाढत जाणारा व गुंतागुंत वाढविणारा आहे. लिलावाचा परिणाम व त्यामधील गुंतागुंत सोडविण्यामध्ये यावर्षीच्या नोबेल स्मृती पारितोषिक विजेत्याचे मोठे योगदान आहे. त्यांनी केवळ लिलावाचे कार्यच स्पष्ट केले नाही तर स्वीकारलेल्या पद्धतीद्वारे उच्चतम लिलाव किंमत कशी प्राप्त होईल यावर प्रकाश टाकलेला

आहे. त्यांच्या या सैद्धांतिक संशोधनाचा उपयोग प्रत्यक्ष लिलावामध्ये करण्यात आला आहे. यामुळे आंतरजाल (इंटरनेट) सारख्या वस्तू व सेवांची खरेदी-विक्री करणे सोयीचे झाले आहे. या प्रारूपाचा जगभरातील लिलावामध्ये स्वीकार झालेला आहे.

**लिलावाचे घटक-नियम, उद्दिष्ट व अनिश्चितता**

मिलग्रोम आणि विल्सन यांनी लिलाव सिद्धांताचे प्रमुख तीन घटक सांगितले आहे. हे तीन घटक लिलावांना प्रभावित करीत असतात. यामधील पहिला घटक लिलावाचे नियम (Auction Rules) आहे. यांतर्गत लिलावाची किंमत सुरू किंवा बंद केल्या जाऊ शकते. किती वेळा लिलावामध्ये सदस्य लिलाव किंमत बोलण्याबाबत सहभागी होऊ शकतात. लिलाव विजेता कोणती किंमत देतो. लिलाव किंमत विजेता व त्यानंतरची दुसरी किंमत कोणती असते. हे सर्व लिलाव नियमानुसार ठरते.

लिलावाचा दुसरा महत्त्वाचा घटक म्हणजे लिलावाचे उद्दिष्ट होय. प्रत्येक लिलाव किंमतीचे भिन्न मूल्य राहील का? उद्दिष्ट मूल्य (Object value) सर्वांकरिता समान राहील का? याबाबतचा विचार लिलाव उद्दिष्टांतर्गत होतो. तर लिलावाचा तिसरा महत्त्वाचा घटक म्हणजे अनिश्चितता (Uncertainty) होय. उद्दिष्ट मूल्याबाबत उच्चतम लिलाव किंमतीमध्ये भिन्नता असते. लिलाव किंमतीतील भिन्नतेमुळे अनिश्चितता घटक लिलावामध्ये प्रभावी ठरतो.

लिलाव सिद्धांताचा प्रत्यक्ष उपयोग होत असताना लिलावाचे नियम, उद्दिष्ट व अनिश्चिता हे तीन घटक उच्चतम लिलाव किंमतीच्या व्यूहरचनात्मक वर्तणुकीवर अंकुश ठेवतात. यामधून लिलावाचे परिणाम दिसून येतात. यामधून लिलावाची रचना कशा प्रकारची आहे. संभाव्य किंमत कशा प्रकारची राहील याचा निश्चित अंदाज येतो. लिलावाच्या उद्दिष्टामध्ये बहुविध (Multiple) संबंध असतो. उद्दिष्टामधील बहुविध संबंध लिलावावर परिणाम करतो. पारितोषिक विजेत्यांची ही नवनिर्मिती असून प्रत्यक्ष उपयोगात आणल्या जाणारे प्रारूप आहे.

**लिलावाचे विविध प्रकार**

सर्व जगभर लिलाव घर आहेत. या लिलाव घराचा उपयोग वस्तू व सेवांच्या विक्रीकरिता करून वैयक्तिक उद्दिष्ट्ये पूर्ण केल्या जातात. अशा प्रकारची विक्री इंग्लिश लिलावामध्ये होते. इंग्लिश लिलावामध्ये प्रथमतः लिलाव किंमत कमी ठेवल्या जाते. सल्ल्यानुसार हळूहळू लिलाव किंमती उच्चतम पातळीपर्यंत वाढविल्या जातात. लिलावामध्ये सर्व सहभागी सदस्य लिलाव किंमतींना पाहू शकतात. यामधूनच लिलाव किंमतीची निवड करू शकतात. शिवाय लिलाव किंमती उच्चतम पातळीपर्यंत जाऊ शकतात. अंतिमतः उच्चतम लिलाव किंमतीवर लिलाव यशस्वी ठरून वस्तू व सेवाची खरेदी-विक्री होते. लिलाव ज्या किंमतीवर यशस्वी ठरतो ती किंमत द्यावी लागते. मात्र काही लिलावामध्ये संपूर्ण नियमामध्येच भिन्नता असते. लिलावाची सुरुवात उच्चतम किंमतीपासून होते. लिलावाचे उद्दिष्ट साध्य होईपर्यंत किंमत घसरण घडून येते. उद्दिष्ट साध्य झाल्यानंतर किंमत घसरून न्यूनतम किंमतीला वस्तूची विक्री होते.

इंग्लिश लिलाव आणि उच्च किंमत लिलाव (High price auction) सर्वांकरिता खुले असतात. या दोन्ही लिलावामध्ये सदस्य सहभागी होऊन लिलाव किंमती पाहू शकतात. काही लिलाव प्रकारामध्ये लिलाव किंमती मोहोरबंद (Sealed) करून ठेवल्या जातात. सार्वजनिक संपदा (Public procurement) विक्रीबाबत या लिलाव प्रकाराचा उपयोग होतो. अशा लिलाव प्रकारामध्ये निवड पुरवठादारांना करावी लागते.

लिलावामध्ये संपत्तीची विक्री किंमत प्रतिसादावर अवलंबून असते. अशा लिलाव प्रकारामध्ये किंमत प्रतिसादाशी बांधिलकी असते. काही लिलाव प्रकारामध्ये अंतिम किंमत ही उच्चत्तम लिलाव किंमत असते. याला प्रथम लिलाव किंमत (First price auction) असे म्हणतात. मात्र इतर प्रारूपामध्ये लिलाव विजेते द्वितीय लिलाव किंमत (Second price auction) देय करतात.

कोणते लिलाव प्रारूप लिलावाकरिता योग्य राहील हे केवळ परिणामावर अवलंबून असू शकत नाही. तर त्याकरिता ते सर्वोत्तम (Best) असावे लागते. लिलावामध्ये खाजगी क्षेत्रातील विक्रेते उच्चतम लिलाव किंमत प्राप्त होण्याला महत्त्व देतात तर सार्वजनिक क्षेत्रातील विक्रेते दीर्घकाळात समाजाला लाभ प्राप्त होण्याला सर्वोच्च स्थान देतात. सर्वोत्तम लिलाव म्हणून परिपूर्णता आणण्याकरिता समस्यावर युक्त्या शोधाव्या लागतात. या युक्त्या दीर्घकाळात लाभ देणाऱ्या असाव्या लागतात.

लिलावाचे विश्लेषण करताना काही समस्यांचा सामना करावा लागतो. उद्दिष्टांवर विश्वास ठेवून इतरांपेक्षा संपत्ती कमी किंवा जास्त होऊ शकते का? भिन्न मूल्यांकनाचे प्रतिबिंब लिलावाच्या उच्चतम किंमतीमध्ये दिसते का? वस्तूची वैशिष्ट्ये आणि मूल्य याबाबत योग्य माहिती असते का? बोली लावणारे सहकारी असू शकतात का? लिलाव योग्यरित्या हाताळून अंतिम किंमत खाली आणू शकतात का? अशा प्रकारच्या समस्या लिलावा दरम्यान निर्माण होतात. लिलाव यशस्वी ठरून उच्चतम लिलाव किंमत प्राप्त होण्याकरिता उच्चतम व्यूहरचना असावी लागते. याकरिता सहभागी सदस्यांना लिलाव किंमतीवर विश्वास ठेवावा लागतो.

**खाजगी मूल्य**

सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ विल्यम व्हिक्रे यांनी १९६० च्या दशकामध्ये लिलाव सिद्धांताची मांडणी केली होती. त्यांनी विशेष संदर्भ घेऊन अध्ययन केले होते. वस्तू आणि सेवा यांच्या खाजगी मूल्यासाठी बोली लावणारे लिलाव बंद (Auctioned off) करतात. याचा अर्थ असा होतो की, बोली लावणाऱ्यांचे मूल्य स्वतंत्र असते. ते इतरांवर अवलंबून नसते. समजा, सार्वजनिक संस्थेचा लिलाव आहे. हा लिलाव सुप्रसिद्ध व्यक्तीसोबत रात्रीचे जेवण घेण्याचा आहे. वस्तुनिष्ठपणे याकरिता तुम्ही किती पैसे देऊ शकता? याकरिता तुमचे स्वत:चे मूल्यांकन प्रभावी ठरू शकत नाही तर त्याच रात्रीच्या जेवणाकरिता इतर बोली लावणाऱ्यांनी कसे मूल्य ठेवले आहे ते जास्त प्रभावी ठरते. म्हणून अशा लिलावामध्ये लिलाव किंमत कशी ठरते? अर्थातच रात्रीच्या जेवणाच्या किंमतीपेक्षा तुम्ही जास्त किंमत देणार नाही. मात्र तुमची लिलाव किंमत कमी असेल तर तुम्हाला कमी किंमतीमध्ये रात्रीचे जेवण मिळेल का? याकरिता व्हिक्रे यांनी सर्वोत्तम लिलाव प्रारूपाची मांडणी केली आहे. ज्यामध्ये इंग्लिश आणि डच प्रारूपाचा समावेश आहे. जर विक्रेत्यांना अपेक्षित उत्पन्न प्राप्ती करायची असेल तर बोली लावणारे विवेकी आणि जोखीमरहित असावे लागतात.

**सामान्य मूल्य**

अतिशय जास्त प्रमाणात लिलावामध्ये खाजगी मूल्य वापरले जाते. लिलावाचे महत्त्वाचे उद्दिष्ट म्हणजे सुरक्षितता, संपत्ती आणि स्वाधीन अधिकार (Extraction right) आहे. या उद्दिष्टांचा संबंध सामान्य मूल्याशी आहे. याचा अर्थ असा की, सर्व बोली लावणाऱ्यांच्या अंतर्गत क्षमतेच्या समान मूल्य असते. मालकीच्या उद्दिष्टाबाबत खाजगी माहितीचे विविध मूल्य प्रत्यक्षात असते.

समजा, तुम्ही हिऱ्याचे व्यापारी आहात. तसेच इतर काही हिऱ्याचे व्यापारी आहेत. कच्चा हिऱ्याच्या बाबत लिलाव किंमत ठरविण्याचा सखोल विचार सुरू आहे. अंतिमत: असे ठरते की, हिऱ्यांना पैलू देऊन त्याची विक्री करायची आहे. यावरून स्पष्ट होते की, पैलू दिलेल्या हिऱ्यांचे पुनर्विक्री मूल्य (Resale value) हे केवळ विक्रेत्याच्या इच्छेवर अवलंबून आहे. सोबतच संख्यात्मकता आणि गुणात्मकतेवर देखील अवलंबून असतात. या सामान्य मूल्याबाबत भिन्न विक्रेत्यांना विविध पर्याय आहेत. हे पर्याय विशेषज्ञता, अनुभव आणि कालावधीवर अवलंबून राहील. या पर्यायावर हिऱ्याचे परीक्षण होते. योग्य मूल्य प्राप्त होण्याकरिता इतर बोली लावणाऱ्यांच्या प्रवेशाचा अंदाज घ्यावा लागतो. मात्र प्रत्येक बोली लावणारा आपली माहिती गोपनीय ठेवत असतो.

वास्तव मूल्य (True value) प्राप्त होण्याकरिता सहभागी सदस्यांची योग्य माहिती असणे आवश्यक असते कारण लिलावामध्ये सामान्य मूल्याबाबत जोखमी असतात. प्रत्यक्षात लिलावामध्ये न्यूनतम लिलाव किंमती पुढाकार घेतात. ते यामधून विजेते ठरू शकतात. समजा, तुम्ही कच्चा हिऱ्याचा लिलाव जिंकला तर त्याचा अर्थ असा होतो की, इतर बोली लावणाऱ्यांच्या किंमती तुमच्या किंमतीपेक्षा कमी होत्या. त्यामुळे तुम्ही व्यवहार करताना फार कौशल्याने मांडणी केली होती व तुम्हाला हानीदेखील पोहचली नाही.

रॉबर्ट विल्सन यांनी पहिल्यांदा लिलावामध्ये सामान्य मूल्याचे विश्लेषण करण्याकरिता चौकट (Framework) निर्माण केली आहे. समजा, तुम्ही अपार्टमेंट किंवा घर लिलावांतर्गत खरेदी करण्याचा विचार करीत असाल तर तुमच्या इच्छेवर तुमच्या देय किंमतीचे खाजगी मूल्य अवलंबून राहील. यासंदर्भात विल्सन यांनी तीन संशोधन पेपर १९६० आणि १९७० च्या दशकामध्ये प्रसिद्ध केले. प्रथमत: किंमत लिलावासाठी त्यांनी पर्याप्त किंमत व्यूहरचनेचे विश्लेषण केले आहे. कारण वास्तव मूल्य अनिश्चित असते. जेव्हा मूल्याचा योग्य अंदाज बांधला जाईल तेव्हा सहभागी सदस्याची किंमत न्यूनतम राहील. अयोग्य व्यवहार टाळले जाईल आणि विजेत्यांच्या बाजूने संलग्नीकरण होईल. विल्सन यांचे विश्लेषण दर्शविते की, यामध्ये अनिश्चितता मोठ्या प्रमाणात आहे. बोली लावणारे जागरूक असून त्यांची अंतिम किंमत न्यूनतम पातळीला राहील. विल्सनने दर्शविले की, विजेते इतर बोली लावणाऱ्यांच्या तुलनेत चांगली माहिती बाळगून असतो. जर लिलावा दरम्यान माहितीला पुढाकार दिला नाही अथवा तिचे महत्त्व लक्षात घेतले नाही तर तुम्ही सहभागीदार असून देखील लिलावापासून अलिप्त राहणार व लिलाव न्यूनतम किंमत पातळीला जाईल.

**खाजगी आणि सामान्य मूल्य**

लिलावामध्ये बोली लावणाऱ्यांना दोन्ही खाजगी व सामान्य मूल्य असते. समजा, तुम्ही घर किंवा अपार्टमेंटसाठी लिलाव किंमतीचा विचार करीत आहात. तर तुमची त्याकरिता किती किंमत देण्याची इच्छा आहे. यावर खाजगी मूल्य अवलंबून असते. तसेच तुम्हाला सामान्य मूल्याचा अंदाज येतो. ऊर्जास्रोत कंपन्यांचे लिलाव करताना नैसर्गिक वायू काढण्याचा संबंध राखीव वायूचे आकारमान (सामान्य मूल्य) आणि नैसर्गिक वायू काढण्याचा खर्च (खाजगी मूल्य) यावर अवलंबून असतो. खाजगी मूल्य हे नैसर्गिक वायू काढण्याकरिता कोणते तंत्रज्ञान उपलब्ध झाले आहे यावर देखील अवलंबून असते. बँका शासनाचे रोखे प्राप्त होण्यासाठी लिलावामध्ये सहभागी होतात. याचा संबंध भविष्यातील व्याज दरावर

(सामान्य मूल्यावर) अवलंबून असतो. त्यांचे अनेक ग्राहक रोखे खरेदी करू पाहतात (खाजगी मूल्य). लिलावामधील लिलाव किंमतीचे विश्लेषण करताना खाजगी आणि सामान्य मूल्य वगळून बाह्य भागात फसवणुकीच्या समस्या असतात. याबाबत व्हिक्रे आणि विल्सन यांनी विश्लेषण केले आहे. १९८० च्या दशकामध्ये पॉल मिलग्रोम यांनी संशोधन करून फसवणुकीच्या समस्यावर मात केलेली आहे.

मिलग्रोमच्या विश्लेषणामध्ये रॉबर्ट वेबरचा सहभाग आहे. त्यांनी लिलावाचे नवीन आणि महत्त्वाचे अंतरंग स्पष्ट केले आहे. विजेत्याच्या बाजूने समस्या असल्या तरी प्रत्यक्ष विक्री करताना लिलावाचे प्रारूप कसे भिन्न राहील याच्याशी त्याचा संबंध आहे. इंग्लिश लिलावामध्ये लिलाव न्यूनतम किंमतीला सुरू होऊन किंमती वाढत जातात. बोली लावणारे निरीक्षणातून मूल्यांकन करीत असतात. लिलावाला सुरुवात करताना बोली लावणाऱ्याकडे आधिक्याने माहिती उपलब्ध असणे आवश्यक असते. जर ती उपलब्ध नसेल तर अंदाजित किंमतीपेक्षा कमी किंमत होण्याची प्रवृत्ती दिसून येते. दुसऱ्या बाजूला, डच लिलावामध्ये बोली लावणारे उच्चतम किंमतीला लिलाव सुरू करतात आणि नंतर उद्दिष्ट साध्य होईपर्यंत किंमती घसरत जातात. कारण यामधून कोणतीच नवीन माहिती उपलब्ध होत नाही. डच लिलावामध्ये इंग्लिश लिलावाच्या तुलनेत किंमती जास्त असतात. याचा परिणाम अंतिम किंमती न्यूनतम पातळीला जातात.

लिलावाच्या निकालाचे प्रतिबिंब म्हणजे सामान्य तत्त्व आहे. लिलाव प्रारूपामध्ये लिलाव किंमती आणि बोली लावणाऱ्याची खाजगी माहिती यांच्यामधील जोडणीचा संबंध उच्चतम किंमत प्राप्तीसाठी असतो. विक्रेत्याचे हित सहभागी सदस्याच्या माहितीच्या तरतुदीवर अवलंबून असते. त्यामुळे उद्दिष्ट मूल्यापूर्वीच लिलाव सुरू होण्याची संभाव्यता असते. लिलाव किंमत सुरू होण्यापूर्वीच तज्ज्ञ मूल्यांकन करून प्रवेश (स्वतंत्रपणे) दिला तर अपेक्षित उच्चतम किंमत प्राप्त होऊ शकते.

**सुयोग्यपणे लिलाव सिद्धांताचा उपयोग**

मिलग्रोम आणि विल्सन यांनी केवळ मूलभूत सिद्धांताची मांडणी केली नाही तर प्रत्यक्ष व्यवहारामध्ये त्याचा उपयोग झाला आहे. याकरिता नवीन लिलाव प्रारूपे शोधून काढण्यात आली आहे. गुंतागुंतीच्या स्थितीकरिता सुयोग्य लिलाव प्रारूपाची मांडणी करण्यात आली आहे. यामुळे पूर्वी अस्तित्वात असणाऱ्या प्रारूपाचा सहज त्याग करून नवीन प्रारूपाचा स्वीकार करणे सहज शक्य झाले आहे. याचे सर्व योगदान मिलग्रोम आणि विल्सन यांना जाते. त्यांनी उत्तम लिलाव प्रारूपे तयार केली. या नवीन लिलाव प्रारूपाचा सर्व प्रथम उपयोग अमेरिकेमध्ये नितंतू वारंवारता ते दूरसंचार यंत्रचालकाच्या विक्रीकरिता करण्यात आला आहे.

नितंतू वारंवारता म्हणजे विनातार (Wireless) संदेशवहन आहे. भ्रमणध्वनी वरील संदेश (Call), इंटरनेटद्वारे पैसे पाठविणे, चलचित्र संमेलन (व्हिडीओ कॉन्फरन्स) यांचा समावेश यामध्ये होतो. यामुळे व्यावसायिक, उपभोक्ते व समाजाला मर्यादित संसाधनामध्ये फार मोठे लाभ प्राप्त झाले आहे. वारंवारता (Frequency) ही शासनाच्या मालकीची असते. मात्र खाजगी कृतिकर्ते (Actors) याचा अधिक कार्यक्षमपणे उपयोग करू शकतात. शासकीय अधिकारीवर्ग वारंवारता पट्टीचे (Frequency bands) आवंटन खाजगी कृतिकर्त्याकडे (Private actor) करतात. या वारंवारता पट्टीची विक्री करण्याकरिता स्पर्धा ठेवली जाते. या स्पर्धेमध्ये अशाच कंपन्या सहभागी होऊ शकतात ज्यांच्याकडे पूर्वीपासून नितंतू

वारंवारतेचे परवाने शासनाने दिलेले आहे. ही प्रक्रिया म्हणजे दूरध्वनी आणि माध्यमे (Media) कंपन्या यांनी मोठ्या प्रमाणात खर्च करून समुदाय (Lobby) निर्माण केले असतात. मात्र या प्रक्रियेतून उत्पन्न प्राप्ती मर्यादित होते.

१९९० च्या दशकामध्ये भ्रमणध्वनी बाजाराचा (Mobile market) विस्तार घडून आला. भ्रमणध्वनी बाजाराचा विस्तार लक्षात घेता अमेरिकेतील फेडरल कम्युनिकेशन कमिशन (FCC) या सार्वजनिक संस्थेने स्पर्धा ठेवली. यामधून भ्रमणध्वनी कंपन्यांचा जलद गतीने विस्तार घडून आला. प्रत्यक्षात FCC ने नितंतू वारंवारतेच्या विक्रीकरिता निविदा मागितली होती. FCC च्या दबावामुळे अमेरिकन काँग्रेसने वारंवारता पट्टीच्या आवंटनाकरिता सोडत पद्धतीला (Lottery) परवानगी दिली. मात्र याबाबत भ्रमणध्वनी चालक (Mobile operator) नाखूश होते. सोडत पद्धत ही केवळ स्थानिक पातळीवर लागू होती. मात्र राष्ट्रीय पातळीवर भ्रमणध्वनी चालकाची अखंड व्याप्ती (Coverage) राहण्याकरिता ही पद्धती पुरेशी नव्हती. कारण विविध प्रदेशामध्ये विविध वारंवारता पट्टी होत्या. यामुळे चालकांना (Operators) स्वत: मध्येच वारंवारतेची खरेदी-विक्री करावी लागत होती. परवान्यासाठी जुन्या वस्तूंचा किंवा वापरलेल्या वस्तूंच्या बाजाराचा (Second hand market) उदय होऊन या बाजाराने पुढाकार घेतला होता. अमेरिकेचे राष्ट्रीय कर्जाचे प्रमाण वाढून मुक्तपणे परवान्याचे वितरण करण्याकरिता सातत्याचे राजकीय अडचणी वाढत होत्या. परवान्यांचे बाजार मूल्य अब्जो डॉलरमध्ये होते. वारंवारतेकरिता सट्टेबाजी होऊ लागली होती. अंतिमत: वारंवारता पट्टीचे लिलाव पद्धतीने आवंटन करण्याचे ठरले होते.

**नवीन लिलाव पद्धती**

नितंतू वारंवारतेचे लिलाव करताना नवीन समस्या दिसू लागल्या. लिलावाची रचना कशा प्रकारे तयार करायची? नितंतू वारंवारतेचे आवंटन कार्यक्षमपणे कसे होईल? याचा लाभ करदेयकांना कसा मिळेल? याचा विचार नवीन प्रारूपांना करावा लागला. वारंवारता पट्टींना खाजगी आणि सामान्य दोन्ही मूल्य आहेत. तरी सुद्धा वारंवारता पट्टीचे मूल्य विशिष्ट प्रदेशावर अवलंबून असते.

अमेरिकेने एकाचवेळी बहुविध फेरी लिलाव (Simultanous multiple round auction - SMRA) प्रारूपाचा स्वीकार करून सर्व भौगोलिक क्षेत्रामध्ये नितंतू वर्णपटाचे (Radio Spectrum) आवंटन केले आहे. SMRA प्रारूपाने अनेक उच्चतम लिलाव किंमती व्यवस्थापित केल्या आहे. निर्माण झालेल्या समस्या स्पष्टपणे बाहेर काढल्या आहेत. समस्या या प्रामुख्याने अनिश्चिततेच्या संदर्भात होत्या. या लिलाव प्रारूपाने सर्व उद्दिष्टांना समान संधी दिली आहे. FCC ने SMRA प्रारूपाचा सर्व प्रथम उपयोग १९९४ मध्ये करून १० परवान्याची विक्री, ४७ व्या लिलाव फेरीला ६१७ दशलक्ष डॉलरला नितंतू वारंवारतेची विक्री करण्यात आली आहे.

अमेरिकेमधील पहिल्या वर्णपट (स्पेक्ट्रम) लिलावाला मोठे यश SMRA प्रारूपाद्वारे प्राप्त झाले. यानंतर अनेक देशांमध्ये वर्णपट विक्रीकरिता SMRA प्रारूपाचा उपयोग करण्यात आला. यामध्ये प्रामुख्याने फिनलँड, भारत, कॅनडा, नॉर्वे, पोलंड, स्पेन, इंग्लंड, स्वीडन आणि जर्मनी देशांचा समावेश होता. FCC ने SMRA लिलाव प्रारूपाचा उपयोग करून १९९४ ते २०१४ या वीस वर्षांच्या कालावधीमध्ये १२० अब्ज डॉलरची विक्री केली आहे. जागतिक पातळीवर SMRA प्रारूपाचा उपयोग करून वर्णपट लिलावामधून २००

अब्ज डॉलरची विक्री झालेली आहे.

**बहुउद्दिष्ट प्रारूपे : कार्यक्षमता आणि सामाजिक मूल्य -**

वास्तवात बहुउद्दिष्ट लिलाव प्रारूपाचा उपयोग करणे वाढत चालले आहे. बहुउद्दिष्ट लिलाव (Multiple -objective auction) प्रारूपे याची उद्दिष्ट विभाज्य आहे. शिवाय ही उद्दिष्ट्ये पर्यायी आणि पूरक आहेत. नितंतू वारंवारता सेवांमध्ये ओळखता येणारे (Identical) आणि ओळखता न येणारे (Non-identical) उद्दिष्टाचे वर्गीकरण अस्पष्ट आहे. उद्दिष्ट विभाज्य असून ते आंतरसंबंधित आहे. वर्णपट लिलावामध्ये जास्त मूल्य आणि अपस्करण (Trade-off) ही आव्हाने आहेत. सोबतच उत्पन्न प्राप्तीमध्ये वाढ आणि वर्णपटाचे कार्यक्षम आवंटन घडून येणे आवश्यक आहे.

बहुउद्दिष्ट प्रारूपे समस्याची सोडवणूक करतात, प्रत्यक्षातील वादप्रश्नांना संबोधतात व त्याचा प्रत्यक्षात उपयोग होतो. याचा परिणाम बहुउद्दिष्ट प्रारूपे अडथळ्यावर मात करून उद्दिष्ट्ये साध्य करतात. बहुउद्दिष्ट प्रारूपे FCC ने धोरणामध्ये लागू केली आहे. यामुळे प्रतिस्थापन (Shift) घडून आले आहे. बहुउद्दिष्ट प्रारूपे हा गूढ विषय आहे. व्यष्टी अर्थशास्त्राचे ते शिखर आहे. बहुउद्दिष्ट प्रारूपांनी राज्याच्या धोरणामध्ये पुढाकार घेऊन विद्युत चुंबकीय वर्णपटाच्या (Electromagnetic spectrum) कार्यक्षम व प्रोत्साहात्मक उपयोग उत्पन्न प्राप्तीकरिता केला आहे. लिलावाचा संबंध दोन प्रकारच्या कार्यक्षमताशी असतो. एक, उत्पादकाच्या पुरवठ्याची बचत करणे आणि दोन, बाजारातून निधी निर्माण करणे. सोबतच कर विरूपणांना (Tax distortions) टाळणे. या दोन प्रकारच्या कार्यक्षमताचा संबंध विविध देश आणि कालावधीशी आहे.

वास्तवामध्ये शासन हा नियंत्रणे आणि कर विरूपणे यांना दुर्लक्षित करू शकतो. यामुळे महत्तम उत्पन्न प्राप्ती होऊ शकत नाही. वर्णपट लिलावामध्ये उद्दिष्ट महत्तम उत्पन्न प्राप्ती आहे. यशाचे मापन यावर अवलंबून असते. याकडून एकाधिकार बाजार पुढाकार घेऊ शकतो. स्पर्धेचे उच्चतम प्रमाण दीर्घकाळात शासनाला उच्चतम प्राप्ती करून देते. बहुउद्दिष्ट प्रारूपाद्वारे उच्चतम दीर्घकालीन कल्याण घडून स्वस्तात सेवा प्रदान करता येतात.

**बहुविध फेरी लिलाव**

बहुविध फेरी लिलाव (Multiple round Auction) हा बहुउद्दिष्ट प्रारूपाचा उपविभाग आहे. १९९० च्या दशकानंतर नितंतू वारंवारतेच्या मागणीचा उद्रेक झाला. यामुळे FCC ला आपल्या धोरणामध्ये मूलभूत बदल करून वर्णपटाची विक्री करावी लागली. याकरिता तीन नवीन लिलाव प्रारूपाचा उपयोग करण्यात आला.

**एकाचवेळी बहुविध लिलाव फेरी (SMRA)**

FCC च्या वर्णपट लिलावासाठी नव्याने रचित लिलाव प्रारूपाची अंतिम आवृत्ती म्हणजे एकाचवेळी बहुविध लिलाव फेरी (Simultaneous Multiple Round Auction-SMRA) प्रारूप होय. काही संदर्भात याला एकाचवेळी चढता लिलाव (Simultaneous ascending auction - SAA) प्रारूप म्हणून देखील संबोधले गेले आहे. याची रचना दोन विस्तृत प्रस्तावाच्या आधारावर झालेली आहे. एक प्रस्ताव मिलग्रोम व विल्सनचा आहे. तर दुसरा प्रस्ताव प्रिंटसन मॅकफिईचा आहे. जास्त बहुविध फेऱ्या उद्दिष्टाची लहरी क्रमवारिता आहे. यावर लिलाव किंमती व बोली लावणाऱ्यांचे SMRA प्रारूप लागू होते. विजेत्याच्या वैशिष्ट्यामध्ये कपात बहु-फेरीमध्ये घडून येते. कारण लिलावाच्या दरम्यान माहितीचे

अविष्करण (Revealed) घडून येते.

सर्वत्र बोली लावणारे इतर लिलाव किंमतीसाठी अक्रियाशील प्रतिक्षा करू शकतात. याकरिता SMRA प्रारूपामध्ये रचना तयार करताना कृतिशील नियम समाविष्ट केले आहे. प्रत्येक फेरीला अंतिम उद्दिष्टापर्यंत पोहचण्यासाठी, उच्चतम किंमत प्राप्तीसाठी कृतिशील नियम प्रत्येक बोली लावणाऱ्याला सन्मानपूर्वक करावे लागतात. विशेषत: पहिल्या फेरीमध्ये किंमती पर्याप्त प्रमाणात न्यूनतम पातळीला असतात. त्यावेळी सर्व उद्दिष्टामध्ये आधिक्य मागणी असते. प्रत्येक फेरीला बोली लावणारे त्याची लिलाव किंमत वाढवितात. याद्वारे कोणत्याही उद्दिष्टावर बढतीचा पूर्णांक राहून खरेदी केल्या जाऊ शकतो. प्रत्येक फेरीच्या शेवटी प्रत्येक उद्दिष्टासाठी तात्पुरते विजेते ठरविले जातात. ही प्रक्रिया तोपर्यंत राबवली जाते. जोपर्यंत आधिक्य मागणी होत नाही. त्यानंतर सर्व उद्दिष्टांसाठी लिलाव किंमती थांबवल्या जातात. ज्या बिंदूला लिलाव किंमत बंद होते आणि अंतिम फेरीकरिता उद्दिष्ट लक्षात घेऊन तात्पुरता विजेता नेमून दिला जातो. त्याप्रमाणे त्यांच्यासाठी चालू किंमत देय ठरते.

सामान्यपणे SMRA प्रारूप योग्य प्रकारे कार्यरत आहे. यामध्ये फार कमी प्रमाणात दुर्बलता आहे. SMRA प्रारूप समस्यांना उघड करतात. मात्र पॅकेज लिलाव किंमती (Package bid) यामध्ये लागू होत नाही. ही या प्रारूपामधील कमतरता आहे.

**संयोग घड्याळ प्रारूप (CCA)**

नवीन लिलाव प्रारूप रचना म्हणून SMRA चा जागतिक पातळीवर स्वीकार झाला. मात्र या प्रारूपाच्या काही कमतरता होत्या. विशेषत: पॅकेज लिलाव किमतींना समाविष्ट करून घेता येत नव्हते. म्हणून संयोग घड्याळ प्रारूप (Combinatial clock auction - CCA) विकसित करण्यात आले. याची सर्वात प्रथम मांडणी मिलग्रोम यांनी केली. त्यानंतर त्याचा विकास लॉरेन्स, एस्युबेल, पिटर कॅमटन यांनी केला. CAA च्या प्रामुख्याने दोन अवस्था आहेत.

१) यामध्ये आवंटनाच्या दोन उप-अवस्था आहेत. एक म्हणजे घड्याळ अवस्था (Clock-stage) आणि दुसरी पुरवणी अवस्था (Supplementary stage) आहे. घड्याळ अवस्था बहुफेरीशी संबंधित आहे. यामधील लिलाव करणारे (Auctioner) प्रत्येक फेरीला किंमती सर्व वैयक्तिक उद्दिष्टाकरिता घोषित करतात. उद्दिष्टाच्या एका पॅकेजसाठी एकेरी लिलाव किंमतीसह प्रतिक्रिया दिली जाते. कोणत्याही उद्दिष्टासाठी आधिक्य मागणी राहणार नाही तोपर्यंत किंमती वाढत राहतात. पुरवणी अवस्था म्हणजे मोहोरबंद लिलाव किंमत (Sealed bid) लिलाव प्रक्रिया आहे. घड्याळ अवस्थेमध्ये बोली लावणारे त्यांच्या किंमती सुधारू शकतात. उद्दिष्टामध्ये संयोग घडून येण्यासाठी ज्यादा लिलाव किंमती दाखल करू शकतात. यामुळे आवंटनाच्या अवस्थेत केवळ पॅकेज किंमतीच नाही तर सर्वांसाठी लिलाव किंमती असतात.

२) नेमून दिलेली अवस्था (Assignment Stage) - जर घड्याळ आणि पुरवणी अवस्थेमध्ये सर्व लिलाव किंमती दाखल केल्या असेल तर विजेता ठरविण्याची समस्या विजेते आणि देयके ठरविताना निर्माण होते. या समस्येवरचा उपाय म्हणजे मूल्य-कमालीकरणाच्या संयोगाची (Value maximizing combination) निवड करणे होय. यामुळे वस्तुनिष्ठपणे सुसाध्यता निर्माण होते. किंमतीचे मापन होऊन प्रत्येक बोली लावणारे विजेते द्वितीय किंमत नियमाचा (Second price rule) उपयोग करतात.

CAA हा SMRA पेक्षा दोन प्रमुख बाबतीत भिन्न आहे. CAA हा संयोग लिलाव आहे. यामध्ये बोली लावणाऱ्यांना पॅकेज किंमती (Package price)

ठरविता येतात. प्रत्येक फेरीला तात्पुरत्या विजेत्यांची ओळख ठरविता येत नाही. याचा एकूणच परिणाम असा घडून येतो की, समग्र माहितीच्या आधारावरच उच्चतम किमतीबाबत पवित्रा घेतला जातो. प्रत्येक फेरीनंतर आधिक्य मागणीचे अविष्करण होते. माहितीची आवश्यकता आणि अपेक्षित किंमतीच्याद्वारे सामान्य मूल्याबाबतची अनिश्चितता सोडवली जाते.

क्रॅम्टनच्या नुसार SMRA च्या तुलनेत CCA पुढारलेला आहे. CCA समस्या दूर करतो, उद्दिष्टाचा संयोग घडवून आणतो, पर्याय म्हणून वापरला जाऊ शकतो, मागणी कपातीच्या प्रोत्साहनांना दूर करतो, खिलाडूवृत्ती ठेवतो, कार्यक्षम किंमतीपर्यंत तडीस नेतो, कृतिशील रचनाची मांडणी केली जाते आणि बोली लावणाऱ्यांच्या समग्र माहितीचे अविष्करण केले जाते.

CCA मध्ये समस्या सोडविण्याच्या क्षमता असल्या तरी या प्रारूपाच्या काही कमतरता आहेत. लहान बोली लावणारे व पुरवठादारांना लिलाव प्रवेशापासून प्रतिबंधित केले जाते. लिलाव किंमती बोली लावणाऱ्यांच्या परिणामांना प्रभावित करतात. किंमत विस्तार घडून येत नाही. याचा परिणाम सहभागी सदस्य लिलाव किंमत ठरविण्यापासून परावृत्त होऊ शकतात. शिवाय इतर बोली लावणाऱ्यांना जास्त किंमत द्यावी लागू शकते. यामधून एकेरी उद्दिष्ट असलेल्या द्वितीय किंमत प्रारूपांना प्रोत्साहन मिळू शकते. CCA विश्वासार्ह लिलाव किंमती सांगू शकत नाही. यामध्ये आधिक्याने बहुविध संतुलन असून ते अकार्यक्षम आहे. २००८ मध्ये इंग्लंडमध्ये नितंतू-वर्णपट (Radio Spectrum) परवान्याच्या विक्रीकरिता या प्रारूपाचा उपयोग केला होता. त्यानंतर या प्रारूपाचा उपयोग ऑस्ट्रिया, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, डेन्मार्क, आर्यलँड, नेदरलँड, रोमानिया, सोलव्हेस्का आणि स्वित्झर्लंड या देशांनी केला आहे.

**कार्यप्रवृत्त लिलाव**

मिलग्रोम आणि त्याच्या सहकाऱ्यांनी FCC ला नितंतू वर्णपट, दूरचित्रवाणी प्रसारण (Broadcast television) आणि विनातार प्रसारण (Wireless broadcast) यांच्या लिलावाकरिता कार्यप्रवृत्त लिलाव प्रारूपाची (Incentive auction) रचना तयार करून दिली. FCC ने या प्रारूपाचा स्वीकार २०१७ मध्ये केला होता. दोन स्वतंत्र रचनाचा संयोग करून स्वतंत्र प्रारूप तयार केले होते. पहिली रचना पश्चगामी लिलावाची (Reverse Auction) आहे. यामध्ये किंमती ठरविल्या जातात. स्वयं प्रक्षेपणाचा त्याग करून अस्तित्वातील वर्णपट उपयोगाचे अधिकार दिले जातात. दुसरी रचना पुरोगामी लिलावची (Forward Auction) आहे. यामध्ये वर्णपट मुक्त केला जातो. २०१७ मध्ये FCC ने पश्चगामी लिलावाचा उपयोग करून १४ वाहिन्यांना प्रसारणासाठी (Broadcast) मान्यता दिली होती. याचा व्यय १०.१ अब्ज डॉलर होता. पुरोगामी लिलावाद्वारे ७० MHz विनातार आंतरजाल परवान्याची विक्री १९.८ अब्ज डॉलरला करण्यात आली होती. तर १४ MHz आधिक्याने वर्णपट निर्माण झाले होते.

**लिलाव प्रारूप अंमलबजावणीतील समस्या**

SMRA व CCA प्रारूपाचा स्वीकार जागतिक पातळीवर झाला आहे. पण त्याची अंमलबजावणी करताना काही समस्या उद्‌भवत असतात. उच्चतम राखीव किंमत, दुर्बळ लिलाव रचना, ऋणयोजना, अलवचिक पॅकेज यामुळे वर्णपट लिलाव अपयशी ठरू शकतात. लिलाव प्रारूपाच्या अंतर्गत बाबी परिपूर्ण नसतील तर अयोग्य भाकिते व कालावधीबाबत विविध वादप्रश्न निर्माण होतात.

समाज आणि राजकीय विरोधी हित यामुळे लिलावामध्ये अडथळे निर्माण होतात. एका बाजूला

प्राधिकरणे (Agency) यांची सबळ नियंत्रणे तर दुसऱ्या बाजूला राज्यकर्ते असतात. राज्यकर्ते त्यांच्या खाजगी हिताकरिता कृतिशील असतात. खाजगी हितापेक्षा सार्वजनिक हिताकरिता तडजोड होण्याची आवश्यकता असते. या समस्यामुळे प्रत्यक्षात सामाजिक लाभ प्राप्त होण्याला मर्यादा आहे. त्याकरिता सबळ आवंटन पद्धतीचा उपयोग होण्याची आवश्यकता आहे.

**समारोप**

SMRA, CCA व कार्यप्रवृत्त लिलाव प्रारूप व्यतिरिक्त उत्पादक-मिश्र लिलाव (Product Mix Auction) याचा उपयोग वित्तीय बाजारामध्ये विक्री करण्याकरिता केला जातो. बँक ऑफ इंग्लंडने या प्रारूपाचा उपयोग अडथळ्याच्या कर्जाच्या जुडीची (Batches of trouble debt) विक्री करण्याकरिता केला होता. स्थिती लिलाव (Position auction) प्रारूप आंतरसंबंधित उद्दिष्टासाठी तयार केले आहे. गुगल कंपनीने आंतरजाल शोध (Internet searcher) मधील गाभाशब्द (Keyword) विक्रीकरिता या प्रारूपाचा उपयोग केला होता.

खाजगी माहितीच्या आधारावर लिलाव बाजाराचे कार्य कशा प्रकारे चालते हे समजून घेण्याचे सामर्थ्य मिलग्रोम व विल्सन यांच्या संशोधनामध्ये आहे. त्यांनी प्रारूपाद्वारे अनेक नवीन रचना मांडल्या आहे. त्यापैकी योग्य त्या प्रारूपाची निवड करून उत्पादक आपल्या वस्तू किंवा सेवाची विक्री या प्रारूपाद्वारे करू शकतो. नोबेल पारितोषिक विजेत्यांनी सिद्धांतन आणि प्रत्यक्ष उपयोग यांचा सुसंयोग घडवून आणला आहे. चूक नाहीशी होईपर्यंत चाचणी घेण्याची पद्धती त्यांच्या लिलाव रचनेच्या साधनामधून वैज्ञानिक पद्धतीने विकसित केली आहे.

**संदर्भ :**


१) Milgrome P. (1979) : A convergence theorem for competitive bidding with differential information, Econometrica.

२) Milgrome P.(1981) : Rational expectation information acquisition and competitive bidding, Econometrica.

३) Milgrome P. (1982) : A Theory of Auction and competitive bidding, Econometrica.

४) Macmillion P. (1994) : Selling spectrum right, Journal of Economic Perspective.

५) Milgrome P. (2004) : Putting Auction Theory Work, Cambridge University Press.

६) Milgrome P. and Segal I. (2017) : Designing the US incentive auction, Cambridge University Press.

७) Milgrome P. and Mullner J. (2018) : Equilibrium Selection in auction and high stake games, Econometrica.

८) The Royal Swedish Academy of Science (2020) : Improvement To auction Theory and Inventions of new Auction format, Oct. 12.

९) The Royal Swedish Academy of Science (2020) : The price in Economic Science 2020, Press Released, Oct. 12.

१०) Vickery W. (1961) : Counerspeculation, auctions and competitive sealed - tenders, Journal of Finance.

११) Vickery W. (1962) : Auction and bidding games, recent advances in

game theory, Princention University.

१२) Wilson R.B. (1979) : A bidding Model of Perfect competition, The review of Economic Studies.

१३) Wilson R.B. (1985) : Incentive Efficiency of double auction, Quartly Journal of Economics.

१४) Wilson R.B. (1993) : Non-linear priceing, Oxford University Press.

१५) Wilson R.B. (2002) : Architecture of Power Market, Econometrica.

१६) Wilson R.B. (2008) : Supply function equilibrum in a constrained transmission system, Operation Research.

१७) हरमकर प्रशांत (२०२०) : अर्थशास्त्राचे २०२० चे नोबेल पारितोषिक लिलाव सिद्धांत त्याच्या उपयोजनाला, हिंदुस्थान, नोव्हेंबर २०१४.

◆

अर्थशास्त्राचा अंतिम हेतू हा कल्याण वाढीला समजून घेणे आणि त्याचा प्रचार करणे हा आहे.

**- बेन बर्नांके**

जो देश औद्योगिकरित्या अधिक विकसित आहे, तो केवळ विकसित झालेल्या, त्याच्या स्वत:च्या भविष्याची प्रतिमा आहे.

**- कार्ल मार्क्स**

# महिला आणि स्थलांतर

**वंदना उत्तम कटारे** †

**प्रस्तावना**

स्थलांतर हे मानवी जीवनात अतिशय प्रभावी आणि महत्त्वाची भूमिका पार पाडते. स्थलांतरामुळे मानवाचे आयुष्य बदलण्यास मदत होते. मानव जेव्हा रानटी अवस्थेत होता तेव्हा देखील तो आपल्या उदरनिर्वाह आणि संरक्षणासाठी सुरक्षित आणि चांगल्या जागेवर स्थलांतर करत असे. जसजशी मानवाची प्रगती होऊ लागली तसतसे त्याचे स्थलांतर करण्याची कारणे बदलत गेली. स्थलांतराचे आर्थिक महत्त्व फार पूर्वीपासून मान्य केले जाते. अलीकडच्या काही वर्षांपासून जगभरात लोकांचे आंतरराष्ट्रीय स्थलांतराच्या लाटेमुळे 'स्थलांतर' विषयाकडे विशेष लक्ष वेधले गेलेले आहे.

महाराष्ट्र राज्याच्या आर्थिक पाहणी अहवालातून असा ट्रेंड पाहायला मिळाला की, पूर्वीच्या ट्रेंडप्रमाणे फक्त एक व्यक्ती व्यवसाय किंवा रोजगारासाठी स्थलांतर करत नाही तर आज संपूर्ण कुटुबांच्या कुटुंबच स्थलांतर करते. महाराष्ट्रात जेव्हा संपूर्ण कुटुंब स्थलांतर करते तेव्हा महिला स्थलांतराचे प्रमाण पुरुषांच्या स्थलांतराच्या प्रमाणपेक्षा अधिक असल्याचा निष्कर्ष अहवालातून समोर आला आहे. जनगणना २०११ नुसार मागील वास्तव्याच्या ठिकाणानुसार सुमारे ९४.०७ लाख व्यक्तींनी जिल्ह्यातील एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर केले.

**स्थलांतराचा ट्रेंड (लाखात)**

| स्थलांतराचा प्रकार | १९९१ | २००१ | २०११ |
|---|---|---|---|
| जिल्ह्यांतर्गत | ४८.६५ | ७४.५१ | ९४.०७ |
| इतर राज्यांतून | १६.१३ | ३२.६२ | ३८.१३ |
| इतर देशांतून | ०.३० | ०.४८ | १.२० |
| राज्याबाहेर गेलेले | ७.७० | ८.९७ | १२.५२ |

आजचा विचार केला तर कोरोना महामारीमुळे हजारो-लाखों लोक स्थलांतरित झाले. परंतु हे स्थलांतर जे झाले त्याला उलटे स्थलांतर म्हणतात. म्हणजेच उद्योग क्षेत्र, विकसित व प्रगत क्षेत्र सोडून आपल्या अविकसित व अप्रगत मूळ गावाकडे येणे, म्हणजेच उलटे स्थलांतर होय.

अर्थशास्त्राचे जनक ॲडम स्मिथ यांनी मानवाच्या

† पोस्ट डॉक्टरल रिसर्च स्कॉलर डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल सेंटर, सामाजिक न्याय आणि अधिकारिता मंत्रालय, १५ जनपथ, नवी दिल्ली - ११००१
आजीव सभासद क्र. १६१५, भ्रमणध्वनी : ९७६४८४३११५, ईमेल : vandanaakataare2@gmail.com

गतिक्षमतेविषयी असे म्हटले आहे की, उत्पादनाच्या भूमी, श्रम, भांडवल व संयोजक या चार घटकांपैकी श्रमशक्ती या घटकाची गतिशीलता जास्त आहे. श्रमशक्ती ही सहजपणे पृथ्वीच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत जाऊ शकते. स्थलांतर हा घटक लोकसंख्येची रचना व परिवर्तन, संतुलन दारिद्र्य, बेरोजगारी इ. घटकांवर महत्त्वपूर्ण प्रभाव टाकणारा घटक आहे.

पूर्वीच्या काळी घरातील पुरुष व्यक्ती उद्योग, व्यापार, व्यवहार इ. कारणांसाठी स्थलांतर करत असे. कुटुंबप्रमुख म्हणून परिवाराची सर्व जबाबदारी त्यांची होती. परंतु आज बऱ्याच गोष्टींमुळे आमूलाग्र बदल झालेले आहेत. आज व्यक्ती एकटा स्थलांतर करत नाही तर बऱ्याच वेळा संपूर्ण कुटुंब स्थलांतर करतात.

प्रस्तुत संशोधन लेखात केवळ महिला स्थलांतरावर भर देण्यात आलेला आहे.

**उद्दिष्ट्ये**

१. लिंगभाव संकल्पना समजूण घेणे.

२. महिला स्थलांतराची कारणे समजूण घेणे.

३. महिला स्थलांतराच्या वैशिष्ट्यांचा आढावा घेणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधन लेख, दुय्यम साधनसामग्रीवर आधारित आहे. यासाठी संदर्भग्रंथ, मासिके, वृत्तपत्रे, अहवाल, संशोधन लेख इ. साधनांचा आधार घेण्यात आलेला आहे.

**जेंडर (लिंगभाव)**

इंग्रजी भाषेच्या व्याकरणात जेंडर म्हणजे 'लिंग' हा शब्द वापरण्यात येतो. मराठी भाषेत याला 'लिंगभाव' असा शब्दप्रयोग वापरला जातो. सामाजिक विज्ञानशास्त्रात जेंडर हा शब्दप्रयोग संकल्पनात्मक वर्गीकरणासाठी किंवा समाजशास्त्रीय अर्थाने केला जातो.

या नवीन अर्थानुसार जेंडर या संज्ञेचा उपयोग महिला आणि पुरुष यांच्या सामाजिक-सांस्कृतिक व्याख्या स्पष्ट करण्यासाठी करण्यात येतो. जेंडर या संकल्पनेमुळे लिंग आणि लिंगभाव या दोन गोष्टी वेगवेगळ्या आहेत हे स्पष्ट करण्यात मदत होते.

जेंडर ही संकल्पना सर्वप्रथम ज्येष्ठ ब्रिटिश समाजशास्त्रज्ञ व फेमिनिस्ट ॲन रॉसमण्ड ओकले (Ann Rasmund Oakley) यांनी २० व्या शतकात मांडली. त्यांच्या मते, लिंगभाव ही एक सांस्कृतिक बाब आहे. यातून महिलांची बाईपणात पुरुषांची पुरुषपणात सामाजिक वर्गवारी होते. जेंडर हे स्थळ, काळ, संस्कृती यानुसार बदलत असते. यात केव्हाही, कोठेही, कसाही व कोणताही बदल करणे शक्य आहे. ॲन ओकलेंच्या मते, लिंगभावाला जैविक मूळ नसते. म्हणजेच लिंग आणि लिंगभावातील संबंध नैसर्गिक अजिबात नाही तर ते सामाजिक आहेत.

लिंगभाव हे मनुष्यानिर्मित, सामाजिक व सांस्कृतिक आहे. यात समाजाने महिलांसाठी व पुरुषासाठी वेगवेगळे गुण, कार्य व जबाबदारी यांची विभागणी केलेली आहे. लिंगभाव हा आपल्या कुटुंबात, समाजात आणि संस्कृतीत निर्माण होतो.

कमला भसिनच्या मते, जेंडर सामाजिक-सांस्कृतिक रूपात स्त्री-पुरुषांना देण्यात आलेली परिभाषा आहे. ज्याच्या माध्यमाद्वारे समाज स्त्री आणि पुरुष दोघांचीही सामाजिक भूमिका वेगवेगळी करते. हे समाजाची वास्तविकता मोजण्याचे एक विश्लेषणात्मक साधन आहे.

**स्थलांतर** (Migration)

स्थलांतरास अनेक बहुपर्यायी शब्द आहेत. जसे की, Migrant, Immigrant, Non-Native, Foreigner, Alien, Outsider, New Comer, Stranger, Incomers, Expatriate, New Arival, Settler etc.

स्थलांतराचे अनेक प्रकार आहेत. काही वेळा स्थलांतर अल्पकाळासाठी, दीर्घकाळासाठी तर कधी

कायमस्वरूपी करण्यात येते. व्यक्ती आपले वास्तव्याचे एक ठिकाण सोडून दुसऱ्या ठिकाणी वास्तव्यास जातो त्यास 'मानवी स्थलांतर' (ह्युमन मायग्रेशन) असे म्हणतात. थोडक्यात स्थलांतर म्हणजे व्यक्तीच्या वास्तव्याच्या ठिकाणात काही काळासाठी करण्यात आलेला बदल होय.

आजच्या आधुनिक युगात उद्योग, व्यापार, नोकरी, शिक्षण, जीवनमान उंचावणे, पैसा कमावणे इ. कारणांसाठी पुरुषांप्रमाणे महिला देखील स्थलांतर करत आहेत. इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशनच्या अंदाजानुसार महिलांची निम्मी लोकसंख्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर स्थलांतरित होते. तसेच काही देशात महिलांच्या स्थलांतराची टक्केवारी ही ७०-८०% इतकी जास्त आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्थलांतरितांच्या आकडेवारीचा अभ्यास केला तर असे लक्षात येते की, महिलांचा स्थलांतरण दर पुरुषांच्या स्थलांतरण दरापेक्षा जास्त आहे, या प्रवृत्तीस सामान्यतः 'स्थलांतरणाचे स्त्रित्व' (Feminization of Migration) असे म्हणतात. मागील तीन दशकांची आकडेवारी बघितली तर महिलांचे स्थलांतराचे प्रमाण पुरुषांच्या स्थलांतराच्या प्रमाणाच्या बरोबर येत असल्याचे दिसते. १९९० मध्ये महिलांच्या स्थलांतराची टक्केवारी ४९% होती ती थोडी कमी होऊन २०१७ मध्ये ४७% एवढी झाली.

महिलांच्या स्थलांतरामुळे बरेच सकारात्मक बदल घडून येण्यास मदत होते. जसे की, स्थलांतर हे महिलांची स्वायतत्ता, मानवी भांडवल, स्वाभिमान, हक्क, अधिकार आणि महिलांची कुटुंबात आणि समाजात असणारी पत आणि योग्यता सुधारू शकते. स्थलांतरामुळे नवीन प्रदेशातील नवीन गोष्टी, शिक्षण, अनुभव, कला-कौशल्य यामुळे महिलांच्या ज्ञानात भर पडते. त्यांच्याकडे पूर्वीचे असलेले ज्ञान, शिक्षण, अनुभव आणि नवीन मिळालेले ज्ञान, शिक्षण, अनुभव यामुळे त्यांच्या आयुष्यात आमूलाग्र बदल होण्यास मदत होते. या ज्ञानामुळे व आर्थिक स्वावलंबित्वामुळे कुटुंबातील व समाजातील चुकीच्या व पारंपरिक पद्धती व निकष बदलण्यास मदत होते.

स्थलांतर हे अधिक प्रमाणात लैंगिक समानता आणून त्याचे निकष बदलण्यासाठी प्रभावशाली ठरतात. जेव्हा महिला स्वतः इतर ठिकाणी स्थलांतरित होतात तेव्हा त्या अनेक बाबतीत खंबीर व स्वावलंबी होतात. तसेच घरातील कुटुंबप्रमुख पुरुष जर स्थलांतरित झाला तर घराची सर्व जबाबदारी महिलेवर येऊन पडते तेव्हा देखील ती बऱ्याच प्रमाणात खंबीर होऊन स्वावलंबी होऊ शकते. कारण कुटुंबप्रमुख इतर ठिकाणी गेल्यावर कुटुंबाची सर्व जबाबदारी तिच्यावर येते, तेव्हा ती कुटुंबप्रमुख बनून घराची व परिवाराची सर्व जबाबदारी व कर्तव्ये पार पाडते.

स्थलांतरित झालेला पती मूळगावी पत्नीला पैसे पाठवतो तेव्हा ती त्या पैशातून कुटुंबाचा विकास व कल्याण करते. मिळालेले पैसे ती मुलांचे शिक्षण, परिवारातील सदस्यांचे आरोग्य, सकस आहार, दैनंदिन गरजेचा खर्च यावर खर्च करून आपला परिवार सुस्थितीत ठेवण्याचा प्रयत्न करते. महिला शक्यतो अधिक रोख रक्कम जवळ ठेवत नाही किंवा अनावश्यक गोष्टींवर खर्च करत नाही याउलट जर महिला स्थालांतरित झाली आणि तिने पतीला पैसे पाठवले तर तो त्या पैशातून आपल्या परिवारासाठी अधिक टिकाऊ संपत्ती तयार करण्याचा प्रयत्न करतो. बऱ्याचदा स्थलांतरित झालेल्या महिला आपल्या उत्पन्नातील गरजेपुरता पैसा स्वतः जवळ ठेवून उर्वरित रक्कम घरी परिवारासाठी पाठवते. याउलट पुरुष आपल्या उत्पन्नातील मोठा हिस्सा जवळ ठेवून गरजेपुरता पैसा परिवारास पाठवितो. स्थलांतरित

झालेल्या महिला जेव्हा पैसे पाठवतात तेव्हा त्यात सातत्य आणि वारंवारिता असते.

स्थलांतर हे महिला सबलीकरणाचे एक महत्त्वाचे कारण आणि परिणाम असू शकते. (Graeme Huge). स्थलांतरामुळे महिलांना स्वत:चा शारीरिक, मानसिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय विकास करण्यास अनेक संधी प्राप्त होऊ शकतात. स्थलांतरामुळे लैंगिक भेदभाव कमी होण्यास मदत होते. स्थलांतर ही एक सतत आणि दीर्घकालीन प्रक्रिया आहे. पुरुषांच्या स्थलांतराचे पारंपरिक स्पष्टीकरण बऱ्याच बाबतीत महिलांना लागू करता येत नाही. (Shawn Malia Kanaiaupuri-2005)

**महिला स्थलांतरितांची वैशिष्ट्ये**

स्थलांतर करणाऱ्या महिलांची अभ्यासांती पुढीलप्रमाणे काही वैशिष्ट्ये आढळली.

**१. गरीब स्त्रिया स्थलांतर जास्त करतात**

सर्वसाधारणपणे व्यक्ती अविकसित भागाकडून विकसित किंवा प्रगत भागाकडे स्थलांतर जास्त प्रमाणात करतात. कारण प्रगत भागात उत्पन्नाची अनेक साधने उपलब्ध असतात. स्थलांतर करणाऱ्या बहुतेक महिलांकडे कसल्याही प्रकारची संपत्ती, नोकरी किंवा पुरेसा पैसा नसतो. दैनंदिन गरजा भागवणे त्यांना कठीण जाते म्हणून ज्या ठिकाणी काम करून पैसे मिळेल अशा ठिकाणी या गरीब महिला स्थलांतर करतात. ग्रामीण तसेच शहरी भागातील महिला जेव्हा स्थलांतर करतात तेव्हा त्या कुठल्याही जमिनीचे, घराचे किंवा अचल संपत्तीचे मालक नसतात, कोणत्याही संघटित क्षेत्रात कायमस्वरूपी कामगार नसतात, ते पूर्णत: बेरोजगार असतात किंवा असंघटित क्षेत्रात तात्पुरत्या कामावर असतात. तेथे त्यांना कसल्याही प्रकारच्या सोयी-सवलती उपलब्ध नसतात. म्हणून असे गरीब महिला व पुरुष विकसित भागाकडे चांगल्या जीवनमानासाठी स्थलांतर करतात.

Donate (1993), Cerrutli & Massey (2002). Kanaiaupani (2000), यांना देखील त्यांच्या अभ्यासातून असे आढळले की, जमिनीची मालकी, घर नोकरी, स्वत:च्या गावात उपलब्ध असेल तर शक्यतो महिला इतर ठिकाणी स्थलांतर करत नाही पण हे सर्व असून पुरुष स्थलांतर करण्याची शक्यता जास्त असते.

Afsar यांना असे आढळले की, बांगलादेश, व श्रीलंकेमध्ये पुरुषांपेक्षा गरीब महिला स्थलांतर करण्याची शक्यता अधिक आहे. बांगलादेशात घरकाम करणाऱ्या ८०% महिला गरीब आणि भूमिहिन परिवारातून आलेल्या आहेत. तसेच ५४% महिला व पुरुष कापड उद्योगात काम करतात ते देखील अतिशय गरीब घरातील व घरकाम करणारे आहेत. (Afsar 2006 as cited by afsar 2011).

बांगलादेशात घरगुती काम करणाऱ्या बहुतांश महिला या निरक्षर आहेत किंवा प्राथमिक आणि ज्युनिअर सेंकेडरी पर्यंत शिक्षण झालेल्या आहेत.

Shaw's च्या अभ्यासानुसार ग्रामीण श्रीलंकेतील महिला या नेहमीच दारिद्र्यरेषेच्या अगदीच जवळ किंवा दारिद्र्यरेषेच्या खालील असतात. त्यांच्याकडे कसल्याही प्रकारचे शिक्षण, संपत्तीचे मालकी हक्क नसतात. जवळपास सर्वच घरगुती काम करणाऱ्या महिला आर्थिक अडचणीमुळेच स्थलांतरित होतात (Afsar - 2017).

**२. स्वाभिमान, अपेक्षा आणि लिंग निकष इत्यादी घटक स्थलांतराच्या निर्णयावर प्रभाव पाडतात :**

व्यक्तीचा स्वाभिमान, अपेक्षा आणि लिंग निकष या गोष्टी महिलांच्या स्थलांतर करण्याच्या निर्णयावर महत्त्वपूर्ण प्रभाव पाडणाऱ्या आहेत. काही वेळा वैयक्तिक कारणांपेक्षा कुटुंबाकडून प्रेरित झाल्यामुळे

महिला स्थलांतर करतात. IOM च्या अभ्यासातील Moldova and Guatemala यांच्या निष्कर्षामध्ये असे आढळून आले की, सिंगल, विधवा, घटस्फोटित महिला या अनेकदा कुटुंबातील, नातेसंबंधातील तसेच समाजातील व्यक्तीकडून कोणत्या न कोणत्या भेदभावास बळी पडत असते. हे भेदभाव टाळण्यासाठी व आपले आयुष्य सुकर बनवण्यासाठी महिला स्थलांतर करतात. (IOM 2004, 2005, as cited by UNFPA 2006). यांच्या अभ्यासानुसार अनेकवेळा महिला घरगुती हिंसाचार, शिवीगाळ, वैवाहिक जीवनातील असमाधान, कुटुंबातील सदस्यांकडून अस्वीकार्यता, नोकरीच्या अपूर्ण संधी, मनाविरुद्ध काम करण्यास भाग पाडणे इत्यादी कारणांमुळे महिला स्थलांतर करण्यास प्रवृत्त होतात.

काही महिला इतर महिलांची स्वतंत्र जीवनशैली, स्वातंत्र्य, राहणीमान, साहस, भौतिक साधनसंपत्ती, शहर किंवा प्रगत भागातील स्वच्छंद जीवन जगण्याच्या प्रेरणेने महिला स्थलांतर करतात व आपल्या मनाप्रमाणे जीवन जगण्याचा प्रयत्न करतात. (O Cennar 1995, as cited by Curran & Saguy 2001).

**३. प्रगत आणि औद्योगिक क्षेत्रातील श्रमबाजारात महिलांना अधिक मागणी असते**

श्रमबाजारात स्त्री-पुरुष असा भेद करणे सामान्य आहे. श्रमबाजारात जेव्हा महिलांना मागणी येते तेव्हा त्या 'फेमिनाईन पोझीशन' मध्येच काम करतात. महिलांकडून कमी वेतनामध्ये अधिक वेळ श्रमाची कामे करून घेता येतात म्हणून महिलांना श्रमबाजारात जास्त मागणी आहे. महिलांकडे जास्त वेळ कष्टाची कामे करण्याची शारीरिक व मानसिक शक्ती असते. या शक्तीचा पुरेपूर फायदा करून घेण्याचे काम भांडवलदार करत असतात. महिलांच्या कामात स्थिरता व सातत्य असल्याने प्रगत व औद्योगिक क्षेत्रात पुरुषांपेक्षा महिलांना अधिक मागणी असते.

**४. संपूर्ण जगभरात बहुतांश महिला या घरगुती कामगार आहेत**

अशिक्षित आणि अकुशल महिलांना सहज सोपे वाटणारे व तेवढेच लीलया करता येणारे काम म्हणजे घरकाम होय. घरातील सर्व कामे महिला कुठल्याही औपचारिक शिक्षणाशिवाय करू शकतात. म्हणून महिला जेव्हा घराबाहेर काम करण्यास जातात तेव्हा त्या घरकाम करणे पसंत करतात. इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायशेझन (ILO) ने सन २०११ मध्ये केलेल्या सर्वेक्षणानुसार जगातील जवळपास ४३.६ दशलक्ष महिला या घरगुती कामगार आहेत. सन २००३ मध्ये मलेशियामध्ये स्थलांतरित झालेल्या १,५५,००० महिला घरकामात मदत करण्याचे काम करत होत्या तर हाँगकाँगमध्ये, २,००,००० महिला हेच काम करत होत्या. (ILO 2003. as cited by UNFPA 2006). लॅटिन अमेरिकन स्थलांतरित झालेल्या ६०% महिला या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर घरगुती कामे करतात. (Mareno Fontes Chanmartin 2005, as cited by UNFPA 2006) स्पेनमध्ये स्थलांतरित झालेल्या एकूण महिलांपैकी ५०% स्त्रिया घरगुती कामगार असतात. इटलीमध्ये अंदाजे १.२ दशलक्ष महिला कामगार या घरगुती कामगार आहेत. यातील जास्तीत जास्त महिला युरोपमधून आलेल्या असतात. युनायटेड स्टेटमध्ये घरगुती काम करणाऱ्या महिला या लॅटिन अमेरिकेवरून स्थलांतरित झालेल्या असतात. (WIEGOND, as cited by Petroziello 2013).

**५. महिला स्थलांतरासाठी त्यांची शैक्षणिक पातळी आणि सद्य:स्थितीतील रोजगार जबाबदार असतो**

सर्वसाधारण व्यक्ती आपल्याकडे असलेल्या शिक्षण, नोकरी, पैसा यापेक्षा अधिक मिळण्याच्या

अपेक्षेने स्थलांतर करतात. काही संशोधनातून असे निदर्शनात आले की, शैक्षणिक पातळी आणि सद्य:स्थितीतील रोजगार यांचा सकारात्मक संबंध स्थलांतरांशी आहे. व्यक्तीचे शिक्षण जेवढे कमी आणि अस्थिर नोकरी तेवढे स्थलांतराचे प्रमाण अधिक असते.

मॅक्सिकोमधील ४३ गावातील १४००० स्थलांतरित व्यक्तींचा अभ्यास करण्यात आला. त्यात असे आढळून आले की, रोजगारीचा दर आणि शिक्षण यामुळे महिलांमधील स्थलांतरांचे प्रमाण वाढले (Kanaiaupuni 2000).

Richter & Toalor's यांच्या संशोधनातून असा निष्कर्ष निघाला की, ग्रामीण मॅक्सिकोमधील महिलांचे शिक्षण हे आंतरराष्ट्रीय स्थलांतराशी संबंधित आहे.

अशा प्रकारे महिला स्थलांतरितांची वैशिष्ट्ये सांगता येतील. महिला अनेक कारणांमुळे स्थलांतर करतात. महिला स्थलांतराच्या कारणांची थोडक्यात चर्चा करण्यात आली आहे.

**महिला स्थलांतराची कारणे**

**१) काम आणि पैसा या घटकामुळे महिला स्थलांतर करतात**

IOM च्या अहवालानुसार संपूर्ण जगातील अर्ध्यापेक्षा जास्त महिला आर्थिक संधीचा फायदा घेऊन जीवनमान सुखकर करण्यासाठी एकट्या किंवा कुटुंबप्रमुख म्हणून स्थलांतर करतात (IOM 2008, as cited by Ghosh 2009).

इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशन (ILO)च्या अहवालानुसार संपूर्ण जगात अर्ध्यापेक्षा जास्त महिला आर्थिक संधीचा फायदा घेण्यासाठी स्थलांतर करत असल्या तरीही काही देशांमध्ये स्थलांतर करणाऱ्या महिलांची टक्केवारी ७० ते ८०% आहे. अहवालानुसार महिलांचा स्थलांतर दर पुरुषांच्या स्थलांतर दरापेक्षा जास्त आहे.

**२) विवाह आणि कौटुंबिक पुनर्भेटीसाठी स्थलांतर**

संपूर्ण जगात विवाह आणि कुटुंब यांना मानवी जीवनात अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. भारतात विवाह हा एक संस्कार मानण्यात येतो. महिलांच्या बाबतीत तर विवाह अतिशय महत्त्वाची गोष्ट आहे. विवाहानंतर तिच्या आयुष्याची पुन्हा नव्याने सुरुवात होते. विवाहित महिला आपल्या आईवडिलांचे घर सोडून पतीच्या घरी राहण्यास जाते. महिलांचे स्थलांतर होण्यास हे एक सर्वात मोठे प्राथमिक व महत्त्वाचे कारण आहे. महिला विवाह किंवा कौटुंबिक पुनर्भेटीसाठी स्थानिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर स्थलांतर करत असतात.

भारतात करण्यात आलेल्या एका सर्वेक्षणानुसार ८९% ग्रामीण महिला तर ५९% शहरी महिला केवळ विवाहामुळे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरित झालेल्या आहेत. National Sample Survey Organization 2005, as cited in Ghosh 2009). हाच सर्व्हे पुढे २००७-०८ मध्ये पुन्हा करण्यात आला. त्यात असे निदर्शनास आले की, विवाहामुळे महिलांचे स्थलांतराचे प्रमाण फार वाढले आहे. ९१% ग्रामीण महिला आणि ६१% शहरी महिला केवळ विवाहामुळे एक ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरित झालेल्या आहेत (NSSO 2010).

महिला स्थलांतरासाठी विवाह हे सर्वात मोठे कारण आहे असे २०११ च्या जनगणनेतील निष्कर्ष सांगतात. २०११ च्या जनगणनेनुसार भारतात जवळपास २.५८ कोटी महिला विवाहामुळे स्थलांतरित होतात.

नेपाळमध्ये ४२% महिला विवाहामुळे स्थलांतरित झालेल्या आहेत. ६६% स्त्रिया बाहेरील देशातून स्थलांतरित होऊन नेपाळमध्ये आलेल्या आहेत.

United Nations Population Fund

(UNFPA) & The United Status Department of Justice ने अशी नोंद केली की, १९९५ ते २००५ पर्यंत अंदाजे ८०,००० रशियन महिला लग्न करून युनायटेड स्टेटमध्ये स्थलांतरित झाल्या आणि यापेक्षा अधिक पश्चिम युरोपमध्ये स्थलांतरित झाल्या.

### ३. लिंगभेद व लिंगभाव यापासून संरक्षण

संपूर्ण जगातील प्रत्येक महिला कोणत्या न् कोणत्या तरी छळास व भेदभावास बळी पडत असते. हा छळ आणि भेदभाव कधी-कधी टोकाचा होतो तेव्हा महिला ते ठिकाण सोडून इतरत्र स्थलांतर करण्याचा निर्णय घेते. जसे की, घरातील मुलगा-मुलगी भेद, मुलगी म्हणून त्यांना देण्यात येणारी हीन वागणूक, शिक्षण बंद करणे, जबरदस्ती विवाह करणे, मनाविरुद्ध जोडीदार मिळणे, शारीरिक, मानसिक, भावनिक, आर्थिक, छळवणूक इत्यादी कारणांमुळे महिला स्थलांतराचा निर्णय घेतात.

### ४. स्वत:च्या देशात व परदेशात ओळख किंवा नेटवर्क असणे

आपल्या स्वत:च्या देशात आणि परदेशात काही कारणामुळे झालेली ओळख आणि वाढलेले नेटवर्क यामुळे इतर समाजातील विविध घटकांचा आणि आर्थिक संधीचा फायदा घेण्यासाठी महिला स्थलांतर करतात.

### ५. प्रात्याक्षिक परिणाम

आपल्या कुटुंबातील किंवा समाजातील स्थलांतरित व्यक्तीचा स्थलांतरामुळे झालेला आमूलाग्र सकारात्मक बदल बघून लोक प्रभावित होतात. स्थलांतराचे झालेले फायदे-तोटे समजावून घेऊन महिला स्थलांतराचा विचार करतात. इतरांच्या जीवनात झालेला चांगला बदल स्वत:च्या जीवनात व्हावा, त्या स्थलांतरित झालेल्या व्यक्तीसारखे आपले जीवन सुखकर बनावे यासाठी महिला त्या व्यक्तींचे बघून स्थलांतर करतात, यालाच प्रात्याक्षिक परिणाम म्हणतात.

## समारोप

महिलांना विविध पातळ्यांवर सक्षम बनवण्यामध्ये स्थलांतर महत्त्वाची भूमिका पार पाडते. स्थलांतरामुळे महिलांमध्ये हिंमत आणि निर्णयक्षमता विकसित होण्यास मदत होते. पूर्वीचे असलेले ज्ञान आणि नवीन मिळालेले ज्ञान यामुळे चांगल्या गोष्टींचा स्वीकार करून आपल्या आयुष्याची आणि परिवाराची योग्य दिशा ठरवल्यास स्थलांतरामुळे प्रेरणा मिळते. एक महिला आपल्या आयुष्यात सक्षम झाली, तर ती पुढील पिढीस सक्षमीकरणाचे धडे देते म्हणून पुढची पिढी आणि समाज सक्षम होण्यास मदत होते.

निश्चितच आज महिलांचे स्थलांतरांचे प्रमाण वाढत जात असलेले अनेक संशोधनावरून व आकडेवारीवरून दिसून येते. जेव्हा महिलांकडे शिक्षण आणि कौशल्य नसते तेव्हा तिच्या परिचयाचे व तिला सहज, सोपे वाटणारे घरकाम करणे अधिक पसंत करते. घरातील गरिबी, संपत्तीचा अभाव चांगल्या नोकरीचा, संधीचा अभाव असल्यामुळे त्यांचे शिक्षण कमी असते, पर्यायाने त्यांना अशा प्रकारची कामे करावी लागतात.

## संदर्भ


१. Afsar R. (2009). "Unraveling the vicious cycle of recruitment : Labour Mirgartion form Bangladesh to the Gulf States" Working paper 63, International Labor organization, Geneva.

२. 'B Chandra Mohan Patnaik, Ipeseeta Satpathy' (2014), "Determinants of Migration - A Review of Literature."

३. Cerrutti, M., and D. S. Massey. 2001. "On the Auspices of Female Migration from Mexico to the United States." Demography 38 (2): 187–200.

४. Donato, K. 1993. "Current Trends and

Patterns of Female Migration: Evidence from Mexico.” International Migration Review 27 (4): 748–71.

५. Flevry, Anjali, (February 2016) Understanding women and Migration: A Literature Review, KNOMAD Working Paper 8.

६. Francisca Antman M, (January, 2018) "Women and Migration", Discussion Papeer Series.

७. Ghosh, J. 2009. “Migration and Gender Empowerment: Recent Trends and Emerging Issues.” Human Development Research Paper 04, United Nations Development Programme, Human Development Report Office, New York.

८. http://psychology.about.com/ od/ gindex/9/gender.

९. ILO (International Labour Organization). 2009. Protecting the Rights of Migrant Workers: A Shared Responsibility. Geneva: ILO.

१०. Kanaiaupuni, S. M. 2000. “Reframing the Migration Question: An Analysis of Men, Women, and Gender in Mexico.” Social Forces 78 (4): 1311–47.

११. KC, B. K. 2004. “Migration, Poverty and Development in Nepal.” Asian and Pacific Migration Journal 13 (2): 205–32.

१२. Moreno-Fontes Chammartin, G. 2005. “Domestic Workers: Little Protection for the Underpaid.” Migration Policy Institute, Washington. http://www.migrationpolicy.org/article/domestic-workers-little-protection-underpaid.

१३. National Sample Survey Office. 2010. Migration in India 2007-2008. NSS 64th Round. Report 533. New Delhi: Government of India. http://mospi.nic.in/Mospi_New/upload/533_final.pdf.

१४. O’Connor, R. A. 1995. “Indigenous Urbanism: Class, City and Society in Southeast Asia.” Journal of Southeast Asian Studies 26 (1): 30–45.

१५. Rustagi Preet (2004) 'Significance of Gender Development Indicators : An Analysis of Indian States', Indian Journal of Gender Studies, Sage Publication New Delhi.

१६. Sandhya Rani 'Mahapatro (2010), "Patterns and Determinants of Female Migration in India : Insights from Census"

१७. Shaw, J.. 2005a. “Overseas Migration in the Household Economies of Microfinance Clients: Evidence from Sri Lanka.” In Remittances, Microfinance and Development: Building the Link, edited by J. Shaw. Brisbane, Australia: The Foundation for Development Cooperation.

१८. Sudha D.K. (2002), 'Gender Roles' A.P.H. Publishing Corporation, New Delhi.

१९. UNFPA and IOM (United Nations Population Fund and International Organization for Migration). 2006. Women on the Move. New York: UNFPA; Geneva: IOM.

२०. 'Woodward Kath ' (2012) 'The Short Guide to Gender' Rawat Publication, New Delhi.

२१. www.web.nic.in

२२. www.un.org./en/globalissue/women.

२३. भसीन कमला, अनुवाद : वीणा शिवपुरी ‘‘भला ये जेण्डर क्या है?’’ जागोरी प्रकाशन (२००३)

◆

# महाराष्ट्रातील शेती उत्पन्नातील प्रादेशिक तफावती

**एम. एच. शिंदे** †

**प्रस्तावना**

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत सर्व प्रदेशांचा समान विकास होणे अपेक्षित असते. त्यामुळे आर्थिक विकासाची फळे सर्वांना समान प्रमाणात उपभोगण्याची संधी प्राप्त होते. असे असले तरी, विकासाच्या प्रक्रियेत प्रादेशिक तफावती निर्माण होतात हे सत्य आहे. परिणामी, देशाच्या आर्थिक विकास प्रक्रियेमध्ये अडथळे निर्माण होतात. त्यामुळे प्रादेशिक विषमता कमी करण्यासाठी सरकार विविध धोरणांच्या माध्यमातून प्रयत्नशील असते. प्रादेशिक आर्थिक विषमता दूर करत असताना ती कशामुळे निर्माण होते ते पाहणे आणि त्यादृष्टीने उपाययोजना करणे महत्त्वाचे असते. देशातील विकासाच्या प्रक्रियेचे विभागीय मूल्यमापन केले असता, लक्षात येते की, देशातील काही राज्य (महाराष्ट्र, गुजरात, तामिळनाडू, आंध्रप्रदेश, पंजाब, हरियाणा, गोवा, कर्नाटक इ.) आर्थिक विकासात आघाडीवर तर काही राज्य (बिहार, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, ओरिसा, इ.) मागास आहेत तर विकासाच्या बाबतीत आघाडीवर असणाऱ्या राज्यांमध्येदेखील विकासाचा प्रादेशिक असमतोल दिसून येतो. यापैकीच महाराष्ट्र हे राज्य आर्थिकदृष्ट्या देशात आघाडीवर असणारे राज्य म्हणून मानले जाते. मात्र, महाराष्ट्र राज्यामध्ये आर्थिक विकासाचा प्रादेशिक असमतोल दिसून येतो. राज्यातील आर्थिक विकास प्रक्रिया ही मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर या भागातच मोठ्या प्रमाणावर केंद्रित झाल्याचे तर उर्वरित प्रदेश विकासाच्या प्रक्रियेत मागे राहिल्याचे चित्र दिसून येते.

आर्थिक विकासात मागास राहिलेल्या विभागांची अर्थव्यवस्था आजही मुख्यतः कृषी क्षेत्रावर अवलंबून असल्याने कृषी क्षेत्रातून मिळणारे उत्पन्न त्यांच्यासाठी महत्त्वाचे आहे. राज्यातील दरडोई उत्पन्नाची प्रदेशनिहाय रचना पाहिल्यास लक्षात येते की, मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र या प्रदेशांचे दरडोई उत्पन्न मुंबईसह कोकण आणि पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत कमी राहिले आहे. २०१७-१८च्या अहवालानुसार मुंबईसह कोकण विभागाचे दरडोई उत्पन्न रु.२,५९,५२१ इतके तर पश्चिम महाराष्ट्राचे रु.१,८९,६२६ असल्याचे दिसते. दुसरीकडे, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भाचे दरडोई उत्पन्न

† सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, अहमदनगर महाविद्यालय, अहमदनगर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
आजीव सभासद क्र. : १४३२. भ्रमणध्वनी : ०९४२०४७०५३४. ई-मेल : madhav.shinde@aca.edu.in

अनुक्रमे रु.१,३३,५६०, रु.१,०९,८६० आणि रु.१,२६,५०४ इतके राहिले आहे. दरडोई उत्पन्नातील या तफावतींचा विचार करता या प्रदेशांतील आर्थिक व्यवहारांची (कृती) चर्चा होणे आवश्यक आहे. यादृष्टीने विविध पिकांपासून मिळणारे उत्पन्न महत्त्वाचे ठरते. महाराष्ट्रात प्रादेशिक पातळीवर पीकरचनेत असलेल्या तफावती लक्षात घेता पिकांपासून मिळणाऱ्या उत्पन्नातदेखील तफावती दिसून येतात. राज्यातील वेगवेगळ्या प्रदेशांमध्ये वेगवेगळ्या प्रकारची पिके घेतली जातात. प्रदेशांची भौगोलिक रचना, मूलभूत पायाभूत सुविधा, बाजारपेठ यानुसार त्या त्या भागात पिके घेतली जातात. महाराष्ट्रात प्रामुख्याने ज्वारी, बाजरी, भात, सोयाबीन, ऊस, कापूस यांसारख्या पिकांबरोबरच इतर काही तृणधान्ये, तेलबिया पिके घेतली जातात. यापैकी कापूस आणि ऊस ही मूलभूत व्यावसायिक पिके आहेत. कापूस हे पीक प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा, खानदेश या प्रदेशांमध्ये तर ऊस आणि फळ पिके प्रामुख्याने पश्चिम महाराष्ट्रात घेतली जातात.

या दोन पिकांच्या उत्पादन आणि त्यांना मिळणाऱ्या किंमतीवरून विदर्भ, मराठवाडा, खानदेश आणि पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या उत्पन्नात मोठी तफावत असल्याचे स्पष्ट होते. दुसरीकडे, राष्ट्रीय उत्पन्नावर किंवा दरडोई उत्पन्नावर शेती, उद्योग आणि सेवा क्षेत्रातील विविध प्रकारच्या आर्थिक व्यवहारांचा (कृती) प्रभाव असतो तर उपलब्ध पायाभूत सुविधा, आदाने, तंत्रज्ञान, शिक्षण, आरोग्य यांसारखे घटक शेती, उद्योग व सेवा क्षेत्रांच्या विकासात प्रमुख भूमिका बजावतात. भारतातील जवळपास ५०% लोकसंख्या ही कृषी क्षेत्रावर अवलंबून असल्याने लोकांच्या उत्पन्नावर कृषी क्षेत्रातील उत्पादनाचा असलेला प्रभाव समजून घेणे आवश्यक आहे. गोपालप्पा (१९९६) यांनी आंध्रप्रदेशातील करिमनगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे उत्पन्न आणि पीक विविधता यांचा अभ्यास केला असता त्यांना पीक विविधतेचा शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर सकारात्मक परिणाम असल्याचे आढळून आले. बसंताराय आणि नांचरय्या (२०१७) यांनी ओरिसा राज्यातील पीक विविधता आणि कृषी उत्पन्न यांचा अभ्यास केला असता त्यांना पीक विविधतेचा शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर प्रभाव असल्याचे दिसून आले. सिंग आणि भल्ला (२००१) यांनी देशातील १७ राज्यातील पीक प्रवृत्ती अभ्यासली असता, ज्या राज्यांमध्ये उर्वरके, जलसिंचन आणि ट्रॅक्टर यांचा उपयोग अधिक आहे त्या राज्यांमध्ये अधिक कृषी विकास झाल्याचे दिसून आले. त्यादृष्टीने महाराष्ट्रातील विभागनिहाय पीकरचना आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न यामध्ये असलेल्या भिन्नता आणि राज्याच्या दरडोई उत्पन्नावर कृषी उत्पादनाचा असलेला प्रभाव अभ्यासण्यात आला आहे.

कृषी उत्पादन आणि उत्पन्न वाढविण्यासाठी प्रत्येक शेतकरी प्रयत्नशील असतो. त्यासाठी तो बाजारपेठेतील किंमतपातळीचा विचार करून पारंपरिक किंवा व्यावसायिक पिके घेतो. व्यावसायिक पिकांना मिळणारा बाजारभाव लक्षात घेता, त्यापासून शेतकऱ्यांना अधिक उत्पन्न मिळत असले तरी, त्याचा उत्पादन खर्चदेखील अधिक राहतो. त्यामुळे कृषी उत्पादन वाढीमुळे लोकांच्या उत्पन्नात वाढ होईलच असे म्हणता येत नाही. देशात औद्योगिकदृष्ट्या आघाडीवर असलेल्या महाराष्ट्र राज्याचा विचार करता, राज्याच्या विकासात उद्योग आणि सेवा क्षेत्राबरोबरच कृषी क्षेत्राची भूमिकादेखील तेवढीच महत्त्वाची राहिलेली आहे. व्यावसायिक पिकांमुळे उत्पन्नात वाढ होण्याची शाश्वती अधिक असल्याने राज्यातील शेतकरी अशा पिकांना प्राधान्य देतात. यामध्ये ऊस, कापूस,

तेलबिया इ. बरोबरच इतरही व्यावसायिक पिके तो घेतो. अलीकडील काळात जागतिकीकरण, नवनवीन बियाणे, खते, कीटकनाशके, यंत्रसामुग्री यात झालेल्या बदलांमुळे शेतीच्या उत्पादनात वाढ झाली आहे. मात्र कृषी उत्पादनात झालेल्या बदलांमुळे राज्याचे दरडोई उत्पन्न बदलते की नाही हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. त्यादृष्टीने महाराष्ट्रातील पीकरचनेतील बदल आणि कृषी उत्पादनात झालेल्या वाढीचा राज्याच्या दरडोई उत्पन्नावर प्रभाव आहे की नाही याचा शोध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधात करण्यात आला आहे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये राज्यातील विभागनिहाय कृषी उत्पन्नातील तफावती आणि राज्याच्या दरडोई उत्पन्नावर कृषी उत्पादनाचा असलेला प्रभाव शोधण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. त्यासाठी दोन प्रतिमानांची मांडणी करण्यात आली आहे.

**प्रतिमान १ :** राज्यातील विभागनिहाय कृषी उत्पन्नातील तफावती शोधण्यासाठी ऊस आणि कापूस या दोन व्यावसायिक पिकांची निवड करण्यात आली आहे. ऊस आणि कापूस या व्यावसायिक पिकांची विभागीय रचना पाहता उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ या प्रदेशांमध्ये कापूस तर पश्चिम महाराष्ट्रात ऊस पिकाचे प्रमाण अधिक दिसून येते. या पिकांचे उत्पादन आणि त्यांना मिळणारी किंमत यात भिन्नता असल्याने उत्पन्नातील विभागीय तफावती निर्माण झाल्याचे लक्षात येते. उत्पन्नातील तफावती जाणून घेण्यासाठी ऊस आणि कापूस या पिकांचे विभागनिहाय क्षेत्रफळ, उत्पादन याबाबतच्या आकडेवारीचा आधार घेण्यात आला आहे. त्यासाठी आवश्यक असलेली आकडेवारी ही राज्य सरकारच्या कृषी विभागामार्फत प्रकाशित केल्या जाणाऱ्या विविध अहवालांमधून घेतली आहे, तर या पिकांचे उत्पन्नामध्ये रूपांतर करण्यासाठी केंद्रीय कृषिखर्च आणि मूल्य आयोगामार्फत संबंधित वर्षी जाहीर केल्या गेलेल्या किमान आधारभूत किंमती आणि ऊस पिकासाठी जाहीर केली जाणारी रास्त मोबदला किंमत (FRP) यांचा आधार घेण्यात आला आहे. या पिकांचा बाजारभाव वेगळा असल्यास कदाचित आकडे भिन्न मिळू शकतात. राज्यातील शेतकऱ्यांना ऊस आणि कापूस पिकांपासून मिळालेल्या प्रति हेक्टरी उत्पन्नाचे गणन पुढील समीकरणांच्या साहाय्याने केले आहेः

$Yi = Pi \times M^2$ ......... (१)

$Y_h = Yi / li$ ........ (२)

जेथे,

$Y_i$ = i व्या पीकाचे एकूण उत्पन्न,

$P_i$ = i व्या पिकाचे एकूण उत्पादन,

M = किमान आधारभूत किमत

$Y_h$ = प्रति हेक्टरी उत्पन्न

$l_i$ = व्या पिकाखालील क्षेत्र

**प्रतिमान २ :** शोधनिबंधातील दुसऱ्या प्रतिमानामध्ये राज्याच्या दरडोई ऊत्पन्नावर कृषी उत्पादनाचा प्रभाव तपासून पाहण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. सन २०००-०१ ते २०१६-१७ या कालखंडात राज्याचे दरडोई उत्पन्न रु.२५,२२८ वरून रु.९३,५६२ पर्यंत वाढले आहे. दरडोई उत्पन्नात झालेल्या वाढीशी कृषी उत्पादनाचा संबंध आहे की नाही हे तपासण्यासाठी सामान्य न्यूनतम वर्ग पद्धतीचा आधार घेण्यात आला असून प्रतिपगमन प्रतिमानाची मांडणी करण्यात आली आहे. या प्रतिमानामध्ये २०००-०१ ते २०१६-१७ या कालावधीत महाराष्ट्राचे दरडोई उत्पन्न आणि कृषी उत्पादनातील बदलाची प्रवृत्ती यांतील संबंध पाहण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. त्यासाठी राज्याच्या दरडोई उत्पन्नावर कृषी उत्पादनाचा प्रभाव आहे असे गृहीत धरण्यात आले

आहे. कृषी उत्पादन म्हणून अन्नधान्य, तेलबिया, ऊस आणि कापूस या प्रमुख पिकांचा विचार करण्यात आला आहे. या प्रतिमानात दरडोई उत्पन्न हे परतंत्र चल तर अन्नधान्य, तेलबिया, ऊस आणि कापूस या पिकांचे उत्पादन हे स्वतंत्र चले आहेत. दरडोई उत्पन्नावर इतर घटकांचा असलेला प्रभाव $\varepsilon$ या प्रमाद चलाच्या साहाय्याने स्पष्ट करण्यात आला आहे. यासाठी लागणारी दरडोई उत्पन्नाची आकडेवारी जिल्हा स्थूल उत्पन्न अहवालामधून घेण्यात आली आहे, तर अन्नधान्य, तेलबिया, ऊस आणि कापूस या पिकांच्या उत्पादनाची आकडेवारी कृषी विभाग, महाराष्ट्र शासनाच्या अहवालांमधून घेण्यात आली आहे. प्रतिपगमन प्रतिमान पुढीलप्रमाणे मांडण्यात आले आहे.

$$Y = \beta_0 + \beta_1 X_1 + \beta_2 X_2 + \beta_3 X_3 + \beta_4 X_4 + \varepsilon \quad ....(3)$$

जेथे,

$Y$ = दरडोई उत्पन्न

$\beta$ = सहगुणक

$X_1$ = अन्नधान्य उत्पादन

$X_2$ = तेलबिया उत्पादन

$X_3$ = ऊस उत्पादन

$X_4$ = कापूस उत्पादन

$\varepsilon$ = प्रमाद चल

या प्रतिमानामध्ये $\beta$ सहगुणक त्या त्या पिकांचा दरडोई उत्पन्नावरिल प्रभाव स्पष्ट करतात तर पी-मूल्याच्या आधारे परिकल्पना चाचणी केली जाते. या प्रतिमानाची मांडणी करताना

$H0 : \beta i = 0$; दरडोई उत्पन्नावर कृषी उत्पादनाचा प्रभाव नाही,

$H1 : \beta i \neq 0$ दरडोई उत्पन्नावर कृषी उत्पादनाचा परिणाम आहे.

अशी परिकल्पना मांडण्यात आली असून या परिकल्पनेची चाचणी करण्यात आली आहे.

**महाराष्ट्राच्या क्षेत्रनिहाय उत्पन्नाची चिकित्सा**

महाराष्ट्र राज्य हे देशात औद्योगिकदृष्ट्या आघाडीवर असणारे राज्य म्हणून ओळखले जाते. राष्ट्रीय स्तरावर वस्तुनिर्माण क्षेत्रातील मूल्यवृद्धीमध्ये राज्याचा प्रथम क्रमांक लागतो. तसेच राष्ट्रीय पातळीवरील वस्तुनिर्माण रोजगारामध्ये राज्याचा दुसरा क्रमांक लागतो. याबरोबरच महाराष्ट्र हे सर्वाधिक नागरीकरण झालेले राज्य म्हणूनही ओळखले जाते. महाराष्ट्रातील जवळपास ४६% लोकसंख्या ही नागरी भागात राहते. तसेच राज्यातील ८२.३% लोकसंख्या साक्षर असून राष्ट्रीय पातळीपेक्षा (७३%) हे प्रमाण लक्षणीयरीत्या अधिक असल्याचे दिसते. दुसरीकडे शेतीच्या उत्पादनातदेखील महाराष्ट्र हे आघाडीवर असणारे राज्य आहे. ऊस आणि कापूस या पिकांबरोबरच भात, कांदा, आंबा, केळी इ. पिकांच्या उत्पादनातही राज्य अग्रेसर आहे. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत स्थूल उत्पन्नातील कृषी क्षेत्राचा वाटा कमी होणे अपेक्षित असते. त्यानुसार, राज्यातील कृषी क्षेत्राचा एकूण स्थूल राज्य उत्पन्नातील वाटा २०००-०१ साली १७% वरून २०१६-१७ साली ११.९% पर्यंत कमी झाल्याचे दिसून येते. उद्योगक्षेत्र हे राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा मानले जाते. या क्षेत्राचा राज्याच्या स्थूल उत्पन्नातील वाटा वाढला असल्याचे तर सेवा क्षेत्राचा हिस्सा मात्र काहीसा कमी झाल्याचे दिसून येते (तक्ता क्र.०१). प्रादेशिक स्थूल उत्पन्नाची क्षेत्रीय रचना पाहता, कोकण विभागाच्या स्थूल उत्पन्नात कृषी क्षेत्राचा हिस्सा अत्यल्प तर सेवा क्षेत्राचा हिस्सा अधिक राहिला आहे. कोकण विभाग वगळता इतर विभागांच्या स्थूल उत्पन्नात कृषी क्षेत्राचा हिस्सा महत्त्वपूर्ण राहिला आहे. अर्थात, या विभागांच्या स्थूल उत्पन्नातील कृषी क्षेत्राचा हिस्सा कमी तर उद्योग आणि सेवा क्षेत्रांचा हिस्सा अधिक राहिला असून

त्यामध्ये वाढ होताना दिसून येते (तक्ता क्र.०२).

**तक्ता क्र. ०१ : महाराष्ट्राच्या स्थूल राज्य उत्पन्नाची क्षेत्रीय विभागणी** (%)

| वर्षे | कृषी | उद्योग | सेवा |
|---|---|---|---|
| २०००-०१ | १७ | २५ | ५८ |
| २००४-०५ | १३.९७ | २६.१३ | ५९.८८ |
| २००९-१० | ११.०७ | ३०.३३ | ५८.५८ |
| २०१६-१७ | ११.९ | ३३.६ | ५४.५ |

स्रोतः महाराष्ट्र आर्थिक पाहणी अहवाल, सांख्यिकीय आणि अर्थशास्त्र संचालनालय, मुंबई.

**तक्ता क्र. ०२ : प्रादेशिक स्थूल उत्पन्नाचा क्षेत्रनिहाय हिस्सा** (%)

| वर्ष | कोकण | उत्तर महाराष्ट्र | पश्चिम महाराष्ट्र | मराठवाडा | विदर्भ |
|---|---|---|---|---|---|
| **कृषी** | | | | | |
| २०००-०१ | ४.३१ | २६.१४ | २१.२० | २९.१३ | २३.९० |
| २००४-०५ | ३.३१ | २०.३८ | १३.०० | १९.८५ | १४.१२ |
| २०१३-१४ | १.६८ | १६.०३ | ८.९२ | १९.३० | १०.७२ |
| **उद्योग** | | | | | |
| २०००-०१ | ३०.१९ | २१.०० | २४.५५ | १८.९३ | २२.३१ |
| २००४-०५ | ३१.४७ | २५.१४ | ३२.९४ | २३.८७ | २७.१४ |
| २०१३-१४ | २५.५५ | २५.३५ | ३२.८६ | १९.१२ | २५.७५ |
| **सेवा** | | | | | |
| २०००-०१ | ६५.४८ | ५२.८२ | ५४.२५ | ५२.०० | ५३.७८ |
| २००४-०५ | ६५.२१ | ५४.४७ | ५४.०२ | ५६.२७ | ५८.२७ |
| २०१३-१४ | ७२.७४ | ५८.६० | ५८.२० | ५७.६० | ६३.५१ |

स्रोतः महाराष्ट्र आर्थिक पाहणी अहवाल, सांख्यिकीय आणि अर्थशास्त्र संचालनालय, मुंबई.

दरडोई उत्पन्न हा आर्थिक विकासाचा मूलभूत निकष होय. दरडोई उत्पन्नात दीर्घकाळ सातत्याने होणारी वाढ म्हणजे आर्थिक विकास अशी व्याख्या केली जाते. तर दरडोई उत्पन्नात वाढ करणे हे सरकारचे प्रमुख उद्दिष्ट असते. तक्ता क्र.०३ मध्ये महाराष्ट्रातील विभागनिहाय दरडोई उत्पन्न दर्शविण्यात आले आहे. २०००-०१ ते २०१३-१४ या कालखंडात राज्याचे दरडोई उत्पन्न रु.२५,२२८ वरून रु.७६,९१७ पर्यंत वाढले आहे. या कालखंडात राज्यातील सर्वच विभागांच्या दरडोई उत्पन्नात वाढ झाली असली तरी, कोकण विभागाचे दरडोई उत्पन्न सर्वाधिक तर मराठवाडा विभागाचे दरडोई उत्पन्न सर्वात कमी

असल्याचे दिसून येते. दरडोई उत्पन्नातील तफावती राज्याचा असमतोल विकास स्पष्ट करतात. राज्यातील उद्योग, सेवा आणि कृषी क्षेत्रातील घडामोडींचा राज्याच्या आणि त्या त्या विभागांच्या दरडोई उत्पन्नावर प्रभाव राहिल्याचे म्हणता येईल. वास्तविकता, राज्यातील विकासाचा प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी सरकारी पातळीवर धोरणात्मक प्रयत्न केले जात असले तरी, त्यास अपेक्षित यश अजूनही आलेले नाही, हे कटू सत्य आहे.

**तक्ता क्र.०३ : महाराष्ट्रातील विभागनिहाय दरडोई उत्पन्न** (रु.)

| विभाग | २०००-०१ | २००४-०५ | २००९-१० | २०१३-१४ |
|---|---|---|---|---|
| कोकण | ३५५८९ | ६२८०२ | ९४९१८ | ११७३१३ |
| उत्तर महाराष्ट्र | १९७०९ | ३०६४५ | ४५०२३ | ५६८१८ |
| पश्चिम महाराष्ट्र | २७५६० | ४३०८९ | ६४३४५ | ८४६२४ |
| मराठवाडा | १५३०३ | २४५९० | ३५५३१ | ४६१६३ |
| विदर्भ | १८५२८ | २९७४५ | ४२३१५ | ५४१४१ |
| महाराष्ट्र | २५२२८ | ४०५०९ | ६०३६५ | ७६९१७ |

स्रोतः जिल्हा स्थूल उत्पन्न अहवाल,अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.

राज्यातील जमिनीच्या एकूण क्षेत्रफळापैकी २२९ लाख क्षेत्रफळ विविध पिकांच्या लागवडीखाली येते. यापैकी १७.५% म्हणजेच ३९.४७ लाख हेक्टर क्षेत्र जलसिंचनाखाली येते. जलसिंचित क्षेत्रामध्ये प्रामुख्याने ऊस या पिकाबरोबरच इतरही व्यावसायिक पिके घेतली जातात. तर बिगर जलसिंचित क्षेत्रामध्ये कापूस या व्यावसायिक पिकाबरोरच अन्नधान्य आणि तेलबिया पिके घेतली जातात. २०१६-१७ साली राज्यातील एकूण पिकाखालील क्षेत्रापैकी १२८.४७ लाख हेक्टर क्षेत्र अन्नधान्य पिकाखाली, ४४.०८ लाख हेक्टर तेलबिया, ६.३३ लाख हेक्टर ऊसाखाली आणि ४२.१४ लाख हेक्टर क्षेत्र कापूस या पिकाखाली राहिले आहे. यापैकी राज्यातील एकूण उसाखालील क्षेत्रामध्ये पश्चिम महाराष्ट्राचा वाटा सर्वाधिक राहिला आहे, तर मराठवाडा आणि विदर्भाचा कापूस पिकाखालील क्षेत्रामध्ये अधिक वाटा राहिला आहे (तक्ता क्र.०४). या पिकाखालील क्षेत्रानुसार, ऊस आणि कापूस पिकाच्या उत्पादनाची प्रवृत्ती राहिल्याचे दिसून येते. राज्यातील एकूण ऊस उत्पादनापैकी पश्चिम महाराष्ट्रात जवळपास ८५% इतके उत्पादन होते. तर विदर्भाचा वाटा केवळ २.६४% इतका आहे. दुसरीकडे, राज्यातील एकूण कापूस उत्पादनामध्ये विदर्भाचा सर्वाधिक हिस्सा राहिला आहे. त्याखालोखाल मराठवाड्यामध्ये कापूस उत्पादन होते. पश्चिम महाराष्ट्रात कापसाचे उत्पादन अत्यंत नगण्य स्वरूपाचे असल्याचे दिसून येते (तक्ता क्र.०५). ऊस आणि कापूस या पिकांच्या उत्पादनात असलेल्या विभागीय भिन्नतेमुळे या पिकांपासून मिळणाऱ्या उत्पन्नातही विभागीय भिन्नता दिसून येतात. मुळात कापूस आणि ऊस पिकांना सरकारी पातळीवर जाहीर केला जाणारा दर आणि प्रत्यक्षात उत्पादकांना मिळणारा बाजारभाव यात असलेली तफावत विभागीय पातळीवरील उत्पन्न तफावतींचे एक कारण असू शकते.

**तक्ता क्र.०४ : राज्यातील विभागवार ऊस आणि कापूस पिकाखालील क्षेत्र** (%)

| विभाग | २०००-०१ | | २००४-०५ | | २००९-१० | | २०१५-१६ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ऊस | कापूस | ऊस | कापूस | ऊस | कापूस | ऊस | कापूस |
| कोकण | ० | ० | ० | ० | ० | ० | ०.१४ | ० |
| उ. महाराष्ट्र | ८.९१ | १६.६६ | १०.६१ | १८.३१ | ७.२७ | १८.९८ | ४.५७ | २०.२० |
| प.महाराष्ट्र | ५९.४१ | १.०४ | ६५.०६ | ०.६६ | ६७.२३ | २.६० | ७१.८६ | १.८० |
| मराठवाडा | २८.० | ३१.०३ | २९.४२ | ३५.२२ | २४.४६ | ४०.५२ | २०.६३ | ४२.९२ |
| विदर्भ | ३.७ | ५१.२५ | ३.१५ | ४५.७८ | १.०३ | ३७.८८ | २.७८ | ३५.०८ |
| एकूण | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० |

स्रोत: महाराष्ट्र आर्थिक पाहणी अहवाल, सांख्यिकीय आणि अर्थशास्त्र संचालनालय, मुंबई.

**तक्ता क्र.०५ : महाराष्ट्रातील ऊस आणि पिकांचे विभागीय उत्पादन** (%)


| विभाग | २०००-०१ | | २००४-०५ | | २००९-१० | | २०१५-१६ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ऊस | कापूस | ऊस | कापूस | ऊस | कापूस | ऊस | कापूस |
| कोकण | ० | ० | ० | ० | ० | ० | ०.१५ | ० |
| उ. महाराष्ट्र | ८.९६ | १८.७६ | ८.६० | २५.८३ | ६.१८ | २०.७२ | ५.०६ | २४.९३ |
| प.महाराष्ट्र | ६३.९१ | ३.०८ | ७१.३० | १.०१ | ७०.८० | २.५५ | ८५.८६ | १.०२ |
| मराठवाडा | २३.८० | २५.७९ | १७.५३ | ३५.१० | २२.१५ | ३९.५९ | ९.२७ | २३.६१ |
| विदर्भ | ३.३२ | ५२.४२ | २.५५ | ३८.०४ | ०.८५ | ३७.१२ | २.६४ | ५०.४१ |
| महाराष्ट्र | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० |

स्रोत: लेखकाचे गणन.

राज्यातील विभागवार शेतकऱ्यांचे ऊस आणि कापूस या दोन पिकांपासून प्रति हेक्टर मिळालेले उत्पन्न तक्ता क्र.०६ मध्ये दर्शविण्यात आले आहे. राज्यातील शेतकऱ्यांनी घेतलेल्या ऊस आणि कापूस या पिकांपासून मिळालेल्या उत्पन्नात विभागनिहाय मोठी तफावत असल्याचे दिसून येते. ऊस या पिकापासून मिळणारे प्रति हेक्टरी उत्पन्न हे कापूस पिकापासून मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा अधिक असून ऊस या पिकाच्या उत्पन्नामध्ये २०००-०१ ते २०१५-१६ या कालखंडात वाढ झाली असली तरी कापूस पिकाच्या उत्पन्नात अपेक्षित वाढ झाली नसल्याचे स्पष्ट होते. तसेच, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भ या विभागांमध्ये शेतकऱ्यांना ऊस या पिकापासून मिळालेले प्रति हेक्टर उत्पन्न हे पश्चिम महाराष्ट्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांपेक्षा लक्षणीयरित्या कमी असल्याचे दिसून येते. विदर्भ आणि मराठवाड्यात ऊस पिकाचे क्षेत्र पाहता खूप कमी शेतकऱ्यांना त्याचा लाभ झालेला दिसतो. तसेच या विभागांत कापूस

पीक मोठ्या प्रमाणात घेतले जात असल्याने शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी मिळणारे उत्पन्न ऊस या पिकापासून मिळणाऱ्या उत्पन्नाच्या तुलनेत लक्षणीय प्रमाणात कमी असल्याचे दिसून येते. याचा परिणाम उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भ या विभागांतील दरडोई उत्पन्न कमी राहिल्याने येथील लोकांच्या उपभोग, बचत, गुंतवणूक यावर होऊन एकूणच अर्थव्यवस्थेच्या विकासावर मर्यादा आल्याचे म्हणता येईल. ऊस आणि कापूस पिकांचा विचार करता, ऊस हे बागायती तर कापूस हे जिरायती पीक आहे. मराठवाडा आणि विदर्भामध्ये जलसिंचन सुविधांचा अभाव असल्याकारणाने इथला शेतकरी ऊस पिकाऐवजी कापूस पिकास प्राधान्य देतो. मराठवाड्यातील एकूण जलसिंचन क्षमतेपैकी केवळ ११% क्षेत्र सिंचनाखाली आहे. त्यामुळे या विभागातील शेतकरी कापूस पिकाला प्राधान्य देताना दिसून येतो. दुसरीकडे विदर्भासाठी हे प्रमाण जवळपास ६०% असले तरी, ऊस पिकाचे क्षेत्र अत्यल्प राहिले आहे. पश्चिम महाराष्ट्रातील एकूण सिंचनक्षमतेच्या जवळपास ७०% क्षेत्र सिंचनाखाली आहे (आलेख क्र. ०१) त्यामुळे या विभागातील शेतकरी ऊस पिकाला प्राधान्य देताना दिसून येते. थोडक्यात, सिंचनक्षमता

**आलेख क्र.१ : महाराष्ट्रातील सिंचित क्षेत्रांचे सिंचनक्षमतेशी असलेले प्रमाण**




स्रोत: महाराष्ट्र आर्थिक पाहणी अहवाल, सांख्यिकीय आणि अर्थशास्त्र संचालनालय, मुंबई.

**तक्ता क्र.०६ : राज्यातील विभागवार शेतकऱ्यांचे प्रति हेक्टर उत्पन्न(रु.)**


| विभाग | २०००-०१ | | २००४-०५ | | २००९-१० | | २०१५-१६ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ऊस | कापूस | ऊस | कापूस | ऊस | कापूस | ऊस | कापूस |
| कोकण | ० | ० | ० | ० | ० | ० | १७७८५७ | ० |
| उ. महाराष्ट्र | ५१९०७ | ११०१३ | ४४१७८ | २५६९४ | १००४०० | ४९३७० | १७८८२७ | ४७१०४ |
| प.महाराष्ट्र | ५५५७९ | २८९२२ | ५९७२८ | २७५१० | १२४३५२ | ४४३३७ | १८६१६६ | २१८०१ |
| मराठवाडा | ४३९९१ | ८१५६ | ४५१४० | १८१५२ | १०६९५० | ४४१७९ | ७२५६० | २०९८५ |
| विदर्भ | ४६२४८ | १००३ | ४४१३५ | १५१३२ | ९८१०२ | ४४२९७ | १५२९०१ | ५४८०८ |

स्रोत: लेखकाचे गणन.

आणि सिंचनाखालील क्षेत्रामध्ये विभागीय असमतोल असल्याने पीकरचनेत भिन्नता निर्माण होते. याचा परिणाम राज्यातील प्रदेशनिहाय कृषी उत्पन्नामध्येसुद्धा असमतोल निर्माण झाल्याचे दिसून येते.

महाराष्ट्राचे दरडोई उत्पन्न आणि प्रमुख पिकांच्या उत्पादनाचे संयुक्त वृद्धिदर तक्ता क्र.०७ मध्ये दर्शविण्यात आले आहेत. त्यानुसार, २०००-०१ ते २०१६-१७ या कालखंडात राज्याच्या दरडोई उत्पन्नाचा वृद्धिदर ८.५४% इतका राहिला आहे. तर याच कालखंडात कापूस पिकाच्या उत्पादनात ११.८१% दराने वाढ झाली. सरकारने स्वीकारलेल्या सुधारित बियाणांच्या (बीटी) धोरणाचा तो परिणाम असल्याचे म्हणता येईल.  अन्नधान्य, तेलबिया आणि ऊस या पिकांच्या उत्पादनाचे वृद्धिदर संबंधित कालखंडात अनुक्रमे ३.३७%, ५.७२% आणि ०.५६% राहिले. यापैकी तंत्रज्ञान, नवनवीन बियाणे, यंत्रसामुग्री यात

**आलेख क्र.२ : महाराष्ट्रातील प्रमुख पिकांचे उत्पादन प्रवृत्ती**




स्रोतः महाराष्ट्र आर्थिक पाहणी अहवाल, सांख्यिकीय आणि अर्थशास्त्र संचालनालय, मुंबई.

**तक्ता क्र.०७ : महाराष्ट्राचे दरडोई उत्पन्न आणि प्रमुख पिकांच्या उत्पादनातील वृद्धी**

(CAGR)(%)

| घटक | २०००-०१ ते २०१६-१७ |
|---|---|
| अन्नधान्य | ३.३७ |
| तेलबिया | ५.७२ |
| ऊस | ०.५६ |
| कापूस | ११.८१ |
| दरडोई उत्पन्न | ८.५४ |

स्रोतः लेखकाचे गणन.

आधुनिकीकरण झालेले असूनदेखील ऊस या व्यावसायिक पिकाच्या उत्पादनात झालेली अत्यल्प वाढ साखर उद्योगक्षेत्राची चिंता वाढविणारी आहे.

तक्ता क्र. ०८ मध्ये दर्शविण्यात आलेल्या विचलन विश्लेषणानुसार प्रस्तुत अभ्यासात मांडण्यात आलेल्या प्रतिमानाच्या प्राक्कलनातून प्राप्त झालेल्या पी-मूल्यावरून प्रतिमान महत्त्वपूर्ण असल्याचे स्पष्ट होते. प्रस्तुत प्रतिमानातील चलांची प्राक्कलित मूल्य तक्ता क्र. ०९ मध्ये दर्शविण्यात आली आहेत. प्रतिमानातील चलांच्या प्राक्कलित मूल्यांचे विश्लेषण पुढीलप्रमाणे

**तक्ता क्र.०८ : विचलन विश्लेषण (ANOVA) तक्ता (समग्र प्रतिमान)**

| विचलन स्त्रोत | df | SS | MS | F | P- मूल्य |
|---|---|---|---|---|---|
| प्रतिपगमन | ४ | ६३८५२६९६५५.४३४५ | १५९६३१७४१३.९ | १२.७३८३ | ०.०००२८ |
| अविशिष्ट | १२ | १५०३७८८४७२.४४७८ | १२५३१५७०६.०४ | --- | --- |
| एकूण | १६ | ७८८९०५८१२७.८८२३ | --- | --- | --- |

स्त्रोतः लेखकाचे गणन.

**तक्ता क्र.०९ : महाराष्ट्रातील दरडोई उत्पन्नाची प्रतिपगमन चाचणी मूल्ये**

| स्वतंत्र चले | सहगुणक | पी-मूल्ये |
|---|---|---|
| स्थिर | ६९३७५.४१ | ०.००७० |
| अन्नधान्य उत्पादन | -०.५५६* | ०.०३५१ |
| तेलबिया उत्पादन | -०.८७८ | ०.१०३५ |
| ऊस उत्पादन | ०.०३३* | ०.०४८६ |
| कापूस उत्पादन | १.२७६* | ०.०००६ |

टीपः *= ०.०५% महत्त्वपातळीला महत्त्वपूर्ण, $R^2$= ०.८०९, समायोजित $R^2$ =०.७४५,

स्त्रोतः लेखकाचे गणन.

करण्यात आले आहे.

१) अन्नधान्य उत्पादन चलाचे प्राक्कलित पी-मूल्य ५% महत्त्वपातळीला महत्त्वपूर्ण असून प्राप्त ९५% विश्वास अंतराळाच्या मूल्यानुसार शून्य परिकल्पना नाकारली जाते. यावरून, अन्नधान्य उत्पादनाचा दरडोई उत्पन्नावर प्रभाव असल्याचे स्पष्ट होते.

२) तेलबिया उत्पादन चलाचे प्राक्कलित पी-मूल्य ५% महत्त्वपातळीला महत्त्वपूर्ण नसल्याचे दिसून येते. तसेच, प्राप्त ९५% विश्वास अंतराळाच्या मूल्यानुसार शून्य परिकल्पना स्वीकारण्यात येते. यावरून तेलबिया उत्पादनाचा दरडोई उत्पन्नावर प्रभाव नसल्याचे स्पष्ट होते.

३) ऊस उत्पादन चलाचे प्राक्कलित पी-मूल्य ५% महत्त्वपातळीला महत्त्वपूर्ण असून प्राप्त ९५% विश्वास अंतराळाच्या मूल्यानुसार शून्य परिकल्पना नाकारली जाते. ऊस उत्पादन चलाचे पी-मूल्य पाहता, ऊस उत्पादनाचा दरडोई उत्पन्नावर अत्यंत नगण्य प्रभाव असल्याचे स्पष्ट होते.

४) कापूस उत्पादन चलाचे प्राक्कलित पी-मूल्य ५% महत्त्वपातळीला महत्त्वपूर्ण असल्याचे निदर्शनास येते. तसेच, प्राप्त ९५% विश्वास अंतराळाच्या मूल्यावरून शून्य परिकल्पना तपासली असता, याठिकाणी शून्य परिकल्पना नाकारली जाते. याचाच अर्थ, अन्नधान्य उत्पादनाचा दरडोई उत्पन्नावर प्रभाव असल्याचे स्पष्ट होते.

अशा प्रकारे, दिलेल्या कालखंडात राज्यातील प्रमुख पिकांच्या उत्पादनाचा राज्याच्या दरडोई उत्पन्नावर असलेल्या प्रभावाचे विश्लेषण करता येते. दिलेल्या कालखंडात निवडलेल्या पिकांपैकी, अन्नधान्य उत्पादन चलाच्या प्राक्कलित सहगुणकाच्या मूल्यावरून अन्नधान्य

उत्पादनाचा राज्याच्या दरडोई उत्पन्नावर ऋणात्मक प्रभाव असल्याचे तर ऊस आणि कापूस पिकांच्या उत्पादनाचा राज्याच्या दरडोई उत्पन्नावर धनात्मक प्रभाव असल्याचे स्पष्ट होते. दुसरीकडे, निवडण्यात आलेल्या प्रमुख पिकांपैकी तेलबिया पिकाच्या उत्पादनाचा राज्याच्या उत्पादनावर प्रभाव नसल्याचे प्रतिमानाच्या चाचणीवरून स्पष्ट होते.

**सारांश**

महाराष्ट्र हे राज्य विकासाच्याबाबतीत देशात आघाडीवर असले तरी, राज्याचा हा विकास विशिष्ट भागातच केंद्रित झाला आहे. राज्यात औद्योगिक विकासाबरोबरच कृषी क्षेत्राच्या विकासामध्येही प्रादेशिक असमतोल निर्माण झाला आहे. कृषी विकासाच्या प्रादेशिक असमतोलाचे कारण शोधण्याचा प्रयत्न केला असता, राज्यातील पीकरचना आणि त्यापासून मिळणारे उत्पन्न यात प्रादेशिक पातळीवर मोठ्या तफावती असल्याचे स्पष्ट होते. याउलट विदर्भ आणि मराठवाड्यात जलसिंचन सुविधा मुबलक प्रमाणात उपलब्ध नसल्यामुळे जिरायती पिकांना प्राधान्य दिले जाते. यामध्ये कापूस हे पीक प्रामुख्याने पिकवले जाते. कापूस पिकापासून मिळणारे उत्पन्न ऊस पिकापासून मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा तुलनेने कमी असल्याचे स्पष्ट होते. परिणामी, या प्रदेशांतील अर्थव्यवस्था तुलनेने मागास राहिल्याचे दिसून येते.

प्रादेशिक मागासलेपणाची कारणे अनेक असली तरी, त्या त्या भागाच्या भौगोलिक परिस्थितीचाही विकास प्रक्रियेवर निश्चित परिणाम होत असतो हे मात्र नक्की. कमी पावसाच्या आणि पसरट जमिनीच्या क्षेत्रामुळे या विभागांतील धरणप्रकल्पांचा खर्च हा तुलनेने अधिक असून पुनर्वसनाचा खर्चही मोठ्या प्रमाणात वाढतो. परिणामी, या विभागांमध्ये धरणांचे प्रमाण कमी असल्याने पाण्याची नेहमी टंचाई भासते. पाण्यासारख्या मूलभूत समस्येचा त्या भागात येणाऱ्या गुंतवणुकीवर विपरित परिणाम होतो. त्यामुळे या विभागांतील शेती, उद्योग आणि सेवा क्षेत्रांचा मर्यादित विकास झाला असून तेथील रोजगार आणि उत्पादनावर नकारात्मक परिणाम होऊन या भागातील विकास प्रक्रिया मंद राहिली असे म्हणता येईल. असे असले तरी, या भागातील लोकांना मोठ्या प्रमाणात रोजगार संधी उपलब्ध करून देण्यामध्ये विकासाच्या बाबतीत आघाडीवर मानल्या जाणाऱ्या मुंबई, ठाणे, पुणे यांसारख्या प्रदेशांची भूमिका महत्त्वाची राहिली आहे हे नाकारता येणार नाही.

दुसरीकडे, राज्याच्या दरडोई उत्पन्नावर कृषी उत्पादनाचा प्रभाव तपासून पाहण्यासाठी अन्नधान्य, तेलबिया, ऊस आणि कापूस या पिकांचा आधार घेतला आहे. यापैकी अन्नधान्य, ऊस आणि कापूस पिकांच्या ऊत्पादनाचा राज्याच्या दरडोई उत्पन्नावर प्रभाव असल्याचे तर तेलबिया पिकाच्या उत्पादनाचा प्रभाव नसल्याचे दिसून आले. दुसऱ्या हरितक्रांतीनंतर देशात कृषी उत्पादनात मोठी वाढ अनुभवास आली. त्यानंतर कृषी क्षेत्रातील सातत्याने सुरू असलेल्या संशोधनामुळे नवनवीन बियाणे, खते, कीटकनाशके यामुळे विविध पिकांच्या उत्पादनात मोठी वाढ होणे अपेक्षित असते. कापूस, तेलबिया आणि अन्नधान्य पिकांच्या उत्पादनात झालेली वाढ महत्त्वपूर्ण असली तरी, ऊस पिकाच्या उत्पादनात झालेली अत्यल्प वाढ साखर उद्योगासाठी समस्या निर्माण करणारी ठरू शकते.

**संदर्भ**


१) Aachary S.S & Agarwal N. L. (2009), "Agricultural Marketing in India", Oxford and IBH Publishing Co. Pvt. Ltd, New Delhi.

२) Alagh Y. K. ( 2005), "Report of the Expert Committee to examine

Methodological Issues in Fixing MSP", Ministry of Agriculture, Govt. of India.

३) Basantarai A. K. Nancharaya (2017) ''Relationship between crop diversification and farm income in Odisha- An Empirical Analysis'' Agricultural Economic Research Review, Vol. 30 pp- 45-58, 2017.

४) Bhalla G. Sing (2001), ''Indian Agriculture - Four decades of Development'', Sage Publication, New Delhi.

५) Datt-Mahajan (2014), Indian Economy, S. Chand Publication, New Delhi.

६) Gopalappa (1996) ''Crop Diversification and Income Levels in Krimnagar District of Andhra Pradesh'', Indian Journal of Agricultural Economics, Vol. 51 No. 3 July-Sept. 1996.

७) Janwari A. D., Subbarav K. (1986) "Agricultural price policy and income distribution in India''. Oxford University Press, New Delhi.

८) Kulkarni (1950) Agriculture Marketing in India, The Corporate Book Depot, Bombay.

९) कविमंडन विजय (२०१२), 'कृषी व ग्रामीण अर्थव्यवस्था', मंगेश प्रकाशन, नागपूर.

१०)किंमत धोरण, कृषी खर्च आणि मूल्य आयोग, भारत सरकार.

११) कृषी उत्पादन अहवाल, कृषी विभाग, महाराष्ट्र शासन.

१२) जिल्हा स्थूल उत्पन्न, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.

१३) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.

१४) शिंदे माधव (२०१८) 'कृषी खर्च आणि मूल्य आयोगाच्या किमत धोरणाची चिकित्सा', अर्थसंवाद, जाने.-मार्च., २०१९, ISSN: ०९७३-८४५२.

◆

## बदललेला नवीन संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता

**राहुल शं. म्होपरे**

'सर' निवास, री.स.नं. ३३/क/२, लेक व्ह्यू कॉलनी, दीपा गॅस गोडावूनच्या पाठीमागे, उजळाईवाडी, ता. करवीर, जि. कोल्हापूर. पिन कोड : ४१६ ००४

यापुढे उपरोक्त पत्त्यावर सर्व पत्रव्यवहार करावा ही विनंती.

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

# भारतातील शेती आधारित उद्योगांतील संधी आणि समस्या

**आर.जे. इंगोले †**

**प्रास्ताविक**

आपण अर्थव्यवस्थेचे शेती, उद्योग आणि सेवा असे तीन क्षेत्र मानतो आणि त्यात आधुनिक काळात एक नवीन क्षेत्र विकसित झालेले आहे आणि ते म्हणजे शेती आधारित उद्योग म्हणजे शेतीमध्ये जे उत्पादन असते तो अशा उद्योगाचा कच्चा माल असतो. उदाः साखर उद्योग, कापड उद्योग, पेपर उद्योग आणि यामुळे आपल्या देशात लोकांचे दारिद्र्य कमी करण्यासाठी या क्षेत्राने मोलाची भूमिका बजावली आहे. कारण यामुळे आपल्या देशात जो सीमान्त शेतकरी, भूमिहीन यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास यामुळे बरीच मदत झाली आहे आणि आपल्या शेतीतील कच्च्या मालाचा पर्याप्त वापर झाला आहे. भारतात शेती आधारित उद्योगाचा उत्पादन क्षेत्रात पाचवा क्रमांक आहे. जगात चीननंतर प्रक्रिया उद्योगात भारताचा दुसरा क्रमांक आहे. सध्याची भारताची अन्नप्रक्रिया उद्योगाची किंमत २,४७,६८० कोटी रुपयाची आहे. तसेच काही वर्षापासून भारतात सेंद्रिय उत्पादनाची एक नवीन ओळख निर्माण होत आहे. कारण सध्या भारतात आणि जगात आरोग्याबाबत लोक जागृत होत आहेत आणि त्यामुळे सेंद्रिय पद्धतीची उत्पादने यास मागणी वाढत आहे.

नवीन आर्थिक धोरणामुळे ग्रामीण भागात काही प्रमाणात जी खरेदीशक्ती वाढली आहे त्यामुळे सुद्धा या प्रक्रिया उद्योगाला चालना मिळाली आहे आणि आर्थिक विकासात एक महत्त्वाचे क्षेत्र म्हणून आज प्रक्रिया उद्योग ओळखला जात आहे.

आपल्या देशात शेतीवर आधारित काही असे ग्रामीण उद्योग अलीकडील काळात विकसित झाले आहेत की, ज्यामुळे ग्रामीण भागात आपणास एक मोठे वरदान निर्माण झाले आहे. कारण ग्रामीण भागात शेती हे एकमेव रोजगाराचे क्षेत्र असल्यामुळे जास्त भार शेतीवर होता पण या शेतीवर आधारित क्षेत्रामुळे बराचसा भार या क्षेत्रामुळे कमी झाला आणि त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था विकसित होण्यास मदत झाली आहे.

**भारतातील शेतीवर आधारित काही उद्योग**

**१) फळे आणि भाजीपाला**

फळे आणि भाजीपाला हा एक नवीन उद्योग नाही पण याचे प्रमाण आणि पद्धती आता बदलली आहे. शेतकरी पूर्वीपेक्षा मोठ्या प्रमाणावर भाजीपाला

† कला, वाणिज्य आणि विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय, चांदवड, जि. नाशिक
आजीव सभासद क्र.१७४३, भ्रमणध्वनी : ९४२३१८०८७६, ई-मेल : rameshingole358@gmail.com

शेतात उत्पादन करीत आणि हरितगृहाच्या माध्यमातून जास्त उत्पादन करून काही प्रमाणात विदेशात निर्यात करीत आहे ही एक चांगली बाब आहे आणि देशाच्या एकूण क्षेत्राच्या ७% आणि एकूण जमिनीच्या १२ मिलियन हेक्टरवर हे उत्पादन घेतले जाते आणि त्याचे उत्पादन १०० मिलियन मेट्रिक टन इतके आहे जे भारताच्या एकूण स्थूल उत्पादनाच्या १८% आहे. त्यामुळे भारतीय शेतीक्षेत्राच्या एकूण प्रगतीत या उत्पादनाचा सहभाग मोठ्या प्रमाणावर आहे.

### २) दूध आणि दुधाचे इतर उत्पादन

भारतात गाई आणि म्हशींचे प्रमाण जे दूध उत्पादनासाठी असते ते मोठ्या प्रमाणात आहे. भारत दूध उत्पादनात एक अग्रेसर देश म्हणून पुढे येत आहे. कारण शेती आधारित उद्योग असल्यामुळे वार्षिक दुधाचे उत्पादन ७२ मिलियन टन आहे आणि भारतातील डेअरी व्यवसाय हा एक यशस्वी उद्योग म्हणून उदयास येत आहे आणि जेव्हा जगात दूध उत्पादन मागील तीन वर्षात २% पर्यंत कमी झाले होते त्यावेळी भारतात हे उत्पादन ४% पर्यंत वाढले होते. भारतात ४६% लोक दुधाचा वापर करतात आणि उर्वरित दूध प्रक्रिया करून त्याचे इतर उप-उत्पादने तयार केली जातात आणि त्याची निर्यात इतर देशांना केली जाते, जसे अमूल उत्पादने आहेत. ज्यांची मागणी विदेशात आहे.

### ३) कुक्कुट पालन आणि मांस उत्पादन

भारतात शेतीवर आधारित अर्थव्यवस्था असल्यामुळे आपण कुक्कुटपालन आणि मांस निर्यात यामध्ये अग्रेसर आहोत. कारण भारतात पावसाचे प्रमाण चांगले असल्यामुळे पशुपालन आणि त्यांच्या चाऱ्याची व्यवस्था होते. FAO या संस्थेच्या एका पाहणीनुसार पशुपालन आणि कुक्कुटपालन व्यवसायापासून आपण ४.४२ मिलियन टन मांस मिळवतो. एकूण उत्पादनापैकी कमी प्रमाण हे इतर उत्पादनासाठी वापरले जाते आणि मोठ्या प्रमाणावर जे घरगुती आणि हॉटेल व्यवसायात वापरले जाते.

### ४) मासे आणि इतर उत्पादने

भारत हा जगात समुद्र किनारा लाभलेला सातवा क्रमांक असणारा देश आहे. ७.५०० किमी लांबीचा समुद्र किनारा लाभलेला आहे आणि त्यामुळे भारतात मासेमारी व्यवसाय मोठ्या प्रमाणावर आहे. त्यामुळे माशांची अंतर्गत आणि बाहेर अशी दोन्ही प्रकारची मागणी आहे आणि त्यासाठी नवनवीन तंत्र वापरून हा व्यवसाय केला जातो. तसेच याकाळात मासे व्यवसाय करीत असताना एक नवीन क्षेत्र विकसित झाले आहे आणि ते म्हणजे शेततळे यामधून सुद्धा शेतकऱ्याला एक उत्पन्नाचे साधन प्राप्त झाले आहे. याचा शेतकऱ्याला दुहेरी फायदा होतो आहे.

### ५) अन्नधान्य प्रक्रिया उद्योग

आज भारतात अन्नधान्य प्रक्रिया उद्योग म्हणून एक नवीन दालन तयार झाले आहे. त्यात अनेक उत्पादनावर प्रक्रिया करून नवीन उत्पादन केले जाते आणि त्यापासून उत्पादने विकली जातात. उदा. तांदूळ, ज्वारी, बाजरी, मका, तेलबिया यांपासून आज अनेक नवीन उत्पादने केली जातात आणि त्याचा बाजार, अर्थव्यवस्थेला आज मोठा हातभार लावत आहे आणि त्यामुळे ग्रामीण भागात कमी भांडवलात रोजगार निर्माण करण्यात या क्षेत्राची मोठी कामगिरी आहे. यामध्ये सर्वात अभिमानाची बाब म्हणजे आपला बासमती तांदूळ आज जगाच्या बाजारात मोठी मागणी निर्माण करीत आहे.

### ६) मद्यनिर्मिती उद्योग

सध्या देशात मद्यनिर्मिती आणि निर्यात याला एक महत्त्व प्राप्त झाले आहे. शेतीतील अनेक उत्पादनापासून आज आपण मद्यनिर्मिती करीत आहोत.


या मद्यास विदेशात खूप मोठ्या प्रमाणात मागणी आहे. भारतात आणि विशेषकरून महाराष्ट्रात अनेक प्रकारची मद्य, शेतीवर आधारित उत्पादनापासून निर्माण केली जातात. उदा. बियर आणि वाइन निर्मिती ही द्राक्ष, बोर, डाळिंब आणि बाजरी अशा उत्पादनापासून निर्माण केली जाते. भारताच्या वाईनला जगात मोठ्या प्रमाणात मागणी आहे आणि याचे उत्पादन वार्षिक १६० मिलियन लिटर्स आहे.

**तक्ता क्र. १ : भारतातील कृषी आधारित उद्योगात असणारा रोजगार**

| अ.नं. | उत्पादन | उद्योग | उत्पादक भांडवल | कामगार संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | अन्न उत्पादन | ३५३४६ | २१९७९८०२ | १२३२६७९ |
| २ | खादी उत्पादन | १८६४५ | २४८६०६३५ | १२६७६७० |
| ३ | रबर ,प्लॅस्टिक | १३१४७ | १००७९१७९ | ४६६७९० |
| ४ | तंबाखू | ३२९४ | १३१०७८८ | ४२५७९९ |
| ५ | विविध आरोग्यदायी पेये | २१०३ | ३८८१३०५ | १२१३४६ |
| ६ | कागद उत्पादन | ६८१० | ५४१५९०३ | १९३०२६ |
| ७ | कॉटन जिनिंग,क्लिलिंग आणि बियाणे प्रक्रिया | ३३०१ | १४७४०३६ | ७३०९६ |
| ८ | कागद उत्पादन | ४२६९ | ८९१९५२ | ६००३४ |
| एकूण | | ८६९१५ | ६९८९३६०० | ३८४०४४० |

Source: Annual Survey Industries 2013-14

**आकृती क्र. १ : भारतातील कृषी आधारित उद्योगात असणारा रोजगार**



कृषी आधारित उद्योगाची काही ठळक वैशिष्ट्ये:

१) जगात सर्वात जास्त सिंचन क्षेत्र असलेली जमीन भारतात आहे (५५ मिलियन हेक्टर).

२) भारत एक मोठा गहू उत्पादक देश आहे (७२ मिलियन टन). जगातील एकूण उत्पादनापैकी १५% उत्पादन भारतात होते.

३) डाळी उत्पादनात अग्रेसर आहे (१५ मिलियन टन). जगाच्या उत्पादनापैकी २१% उत्पादन भारतात होते.

४) चहा उत्पादनात जगात अग्रेसर जगातील उत्पादनापैकी २८% उत्पादन भारतात होते.

५) बासमती तांदळाची निर्यात करण्यात भारत जगात आघाडीवर आहे.

६) फळ आणि भाजीपाला उत्पादनात जगात दुसरा क्रमांक आहे (फळे ५० मिलियन टन आणि भाजीपाला १०० मिलियन टन)

७) उस उत्पादनात जगात दुसरा क्रमांक आहे (ऊस उत्पादन २९६ मिलियन टन) जगातील उत्पादना पैकी २१% उत्पादन भारतात होते.

८) तेलबिया उत्पादनात जगात तिसरा क्रमांक आहे (२५ मिलियन टन) जगाच्या उत्पादनाच्या ७% उत्पादन भारतात होते

**तक्ता क्र. २ : भारतातील दूध, अंडी, लोकर, मांस, मासे उत्पादन**


| **वर्ष** | **दूध** (मिलियन टन) | **अंडे** (मिलियन नंबर) | **लोकर** (मिलियन कि.) | **मांस** (मिलियन टन) | **मासे** (मिलियन टन) |
|---|---|---|---|---|---|
| २००४-०५ | ९२. ५ | ४५२०१ | ४४.६ | २.२ | ६.३१ |
| २००५-०६ | ९७. १ | ४६२३५ | ४४.९ | २.३ | ६.५७ |
| २००६-०७ | १०२.६ | ५०६६३ | ४५.१ | २.३ | ६.८७ |
| २००७-०८ | १०७. ९ | ५३५८३ | ४३.९ | ४ | ७.१३ |
| २००८-०९ | १११.२ | ५५५६२ | ४२.८ | ४.३ | ७.६२ |
| २००९-१० | ११६.४ | ६०२६७ | ४३.१ | ४.६ | ८ |
| २०१०-११ | १२१.८ | ६३०२४ | ४३ | ४.८ | ८.२३ |
| २०११-१२ | १२७. ९ | ६६४५० | ४४.७ | ५.५ | ८.६७ |
| २०१२-१३ | १३२.४ | ६९७३१ | ४६.१ | ५.९ | ९.०४ |
| २०१३-१४ | १३७.४ | ७४७५२ | ४७.९ | ६.२ | ९.५७ |
| २०१४-१५ | १४६.३ | ७८४८४ | ४८.१ | ६.७ | १०.३४ |
| २०१५-१६ | १५५.५ | ८२९२९ | ४३.६ | ७ | १०.०८ |
| २०१६-१७ | १६३.७ | ८८१३९ | ४३.५ | ७.४ | ११.४१ |

Source: Department of Animal Husbandry,Dairying Fisheries.

वरील तक्त्यावरून आपणास असे स्पष्ट होते की, भारतात २००५ ते २०१७ पर्यंत दूध, अंडे, लोकर, मांस आणि मासे याचे उत्पादन वाढते आहे. त्यामुळे भारतातील लोकांच्या उपभोगातील या वस्तूंचे प्रमाण वाढत आहे. देशाला त्यांच्या निर्यातीतून विदेशी चलनसुद्धा प्राप्त झालेले आहे ते आपण पुढे पाहणारच

आहोत आणि म्हणून भारताच्या अर्थव्यवस्थेच्या जडघडणीत या शेती आधारित उद्योगांची भूमिका खूप मोलाची आहे, असे आपणास म्हणावे लागते.

आकृती क्र. २




**तक्ता क्र. ३ : भारतातील फळ उत्पादनाचे निर्यात मूल्य खालीलप्रमाणे आहे**

| अ.नं. | वस्तूचा प्रकार | २००४-०५ (कोटी रु.) | २०१६-१७ (कोटी) |
|---|---|---|---|
| १ | फळे आणि भाजीपाला | १७२५.२५ कोटी | १०३६९.९५ कोटी |
| २ | फुले | २२२.९२ कोटी | ५४८.७० कोटी |
| ३ | मसाले | १८८३. १८ कोटी | १९४४२.०५कोटी |
| ४ | काजू | २४७७.१८ | ३०३.३० कोटी |

Source: Directorate General Commercial Intelligence and Statistics (DGCIS).

या वरील तक्त्यावरून आपणास असे स्पष्ट होते की, २००४-०५ ते २०१६-१७ या काळात फळे, भाजीपाला, फुले आणि मसाले यांची निर्यात मोठ्या प्रमाणात वाढली आहे. फक्त काजूची निर्यात कमी झाली आहे. काजूची निर्यात फक्त २४७७.१८ कोटीवरून कमी होऊन ती ३०३.३० कोटी झाली; पण एकंदरीत भारताच्या निर्यातीतून आपणास मोठ्या प्रमाणात विदेशी चलन प्राप्त झालेले आहे.


यानंतर आपणास शेती आधारित उद्योगातील संधी आणि आव्हाने याबद्दल विचार करू. भारतात काही संधी आहेत आणि काही आव्हाने आहेत त्यात शासनाची भूमिका महत्त्वाची आहे. शासनाने जर थोडे लक्ष दिले तर या क्षेत्रापासून आपणास खूप मोठ्या प्रमाणात रोजगार आणि विदेशी चलन मिळू शकते. याचा विचार आपण खालीलप्रमाणे करू

**शेती आधारित उद्योगासमोरील आव्हाने**

**१) अपूर्ण मूलभूत संरचना**

कोणत्याही देशात व्यापार आणि उद्योग विकसित

**आकृती क्र. ३ : भारतातील फळ उत्पादनाचे निर्यात मूल्य**




होण्यासाठी काही मूलभूत संरचना सरकारने विकसित करणे आवश्यक आहे. त्यामध्ये फळप्रक्रिया उद्योगात सरकारने गुंतवणूक केली पाहिजे, त्यामुळे निर्यात वाढीला उत्तेजन मिळते. तसेच काही संरचना उदा. रस्ते, रेल्वे, हवाई वाहतूक आणि शीतगृहे निर्माण केली पाहिजे, ज्यामुळे काही नाशवंत शेतमाल आपण काही दिवस टिकवू शकतो आणि त्यामुळे त्या शेतमालाला चांगली किंमत मिळेल.

**२) प्रशिक्षित मनुष्यबळाची कमतरता**

शेती आधारित उद्योगाचा विकास करण्यासाठी कौशल्यपूर्ण मनुष्यबळ आवश्यक आहे. कारण बाजारातील वस्तूंची मागणी आणि पुरवठा याचा मेळ घालण्यासाठी प्रशिक्षित मजूर पाहिजेत; पण या क्षेत्रात अकुशल श्रमिक जास्त प्रमाणात असल्यामुळे त्यांना बाजाराचा अंदाज येत नाही आणि त्यामुळे पाहिजे तसा बाजाराचा फायदा या लोकांना घेता येत नाही.

**३) अन्नप्रक्रिया उद्योगासाठी एकच धोरण नाही**

देशात अन्नप्रक्रिया उद्योगासाठी राज्य आणि केंद्राचे वेगवेगळे कर आणि धोरणे असतात ती एकाच प्रशासकीय कायद्याने नियंत्रित केली असली पाहिजेत. केंद्र सरकारच्या अंतर्गतसुद्धा एकाच मंत्रालयाकडून नियंत्रित केली गेली पाहिजे तरच या क्षेत्रात काही निर्णय आणि त्याची अंमलबजावणी प्रभावी होईल आणि या क्षेत्राला नवसंजीवनी मिळेल.

**४) अन्नसुरक्षा कायदा राज्य आणि केंद्राचा**

भारतात अनेक उद्योग आहेत जे शेतीवर आधारित आहेत. पण हे उत्पादन करताना राज्याचे आणि केंद्राचे अनेक कायदे आहेत. परंतु त्यामुळे उत्पादन करणाऱ्या संस्था गोंधळून जातात. त्यासाठी एकच कायदा आणि त्याचे नियम काय आहेत, हे संस्थेला स्पष्ट समजेल तर उत्पादन करण्यात अडचणी निर्माण होणार नाहीत.

**शेती आधारित उद्योगातील संधी**

१) जगात सातवा असा देश भारत आहे की, ज्यामध्ये या क्षेत्रासाठी प्रशासकीय आणि कायदेशीर स्वतंत्र व्यवस्था आहे. यातील वित्तीय आणि संरचना ही लोकशाही पद्धतीने काम करते आहे, ही या क्षेत्राची एक मोठी जमेची बाजू आहे.

२) देशात विविध प्रकारचे वातावरण आहे यामुळे कोणत्याही उद्योगासाठी मोठ्या प्रमाणात कच्चा माल उपलब्ध होतो. त्यामुळे शेतीवर आधारित उद्योगात

जे उत्पादन होते त्याचे मूल्य बाजारात खूप वाढते. त्यामुळे या उद्योगाला आर्थिक फायदा होतो.

३) या क्षेत्रात ज्या वस्तूंचे उत्पादन होते त्यासाठी ग्राहक शोधण्याची गरज पडत नाही. कारण आपल्याच देशातील लोक मोठ्या प्रमाणात ग्राहक आहेत. २५० मिलियन लोक मध्यम वर्गातील आहेत.

४) भारतात शहरीकरण, साक्षरता वाढली आणि लोकांचे दरडोई उत्पन्नसुद्धा वाढले आहे. लोकांचा वस्तूच्या मागणीचा कल बदलला आहे. भारतीय लोकांचा जो उपभोग खर्च आहे त्याच्या ५०% खर्च हा फळांवर आहे. कारण भारतीय जनमानस आता आरोग्याच्या बाबतीत जास्त जागरूक होत आहेत. त्यामुळे सेंद्रिय फळे किंवा फळांचा आहारात वापर वाढला आहे.

**निष्कर्ष**

अशा प्रकारे शेती आधारित उद्योग आणि त्यातील उत्पादन यासाठी दीर्घकाळात एक मोठी विकासाची संधी आहे. आपल्या देशातील अंतर्गत मोठा ग्राहक वर्ग आहे. त्यामुळे आपल्या उत्पादनाला कोण विकत घेईल याची काळजी भारतीय मार्केटमध्ये नाही. भारतीय बाजारात आज अन्नप्रक्रिया उद्योगाला मोठी संधी आहे. कारण आपल्या उत्पादन प्रक्रियेतील ज्या त्रुटी आहेत त्या जर आपण सुधारणा केल्या तर आपण जगात सर्वात पुढे असणार आहोत. कारण स्वस्त श्रमिक आणि कच्चा माल यामुळे तुलनेत आपल्या वस्तूची किंमत कमी असणार आणि त्यामुळे जागतिक स्पर्धेत इतर देश मागे पडणार यात शंका नाही.

**संदर्भ**


१) Annual Survey industries report, 2013-14.

२) Bhuyan, A (2012) ''India's Food industries on the Path of High Growth.''

३) Central Statistics office ( Economic survey) 2014-15.

४) Indian Food Processing Industry-Opportunities and Outlook 2015. Gyan Research and Analytics Pvt.Ltd. 2012.

५) Surendra P. Singha, Fisseha Tegene. (March,2012), The Food Processing Industry in India: Challenges and Opportunities.''

६) Vikrampuri. (2012) Agribusiness a great career opportunity for talented people. International food and Agribusiness management.


◆

सर्वात कमी बर्बरता पण शांतता, सुलभ कर आणि न्यायाचा एक सहनशील कारभार यांच्यापासून राज्य अत्यंत उच्च प्रमाणात नेणे आवश्यक आहे.

**- ॲडम स्मिथ**

# आर्थिक जाणीव समृद्ध करणारे अर्थजागर

**मंजुषा मुसमाडे** †

पुस्तकाचे नाव : आर्थिक जाणीव समृद्ध करणारे अर्थजागर
लेखक : संजय तुपे
प्रकाशक : अथर्व प्रकाशन, धुळे, २०१९.
ISBN : ९७८-९३-८८५४४-३१-३

**प्रस्तावना**

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे आजीव सभासद डॉ.संजय तुपे यांनी २०१६ यावर्षी 'महाराष्ट्र टाइम्स' वृत्तपत्रात लिहिलेल्या त्या वर्षीच्या आर्थिक घडामोडींवर आधारित लेखांचे प्रस्तुत पुस्तक आहे. अशा प्रकारच्या पुस्तकांची गरज भासते. कारण त्यामुळे पुढील काळातही तत्कालीन आर्थिक घडामोडींचे साद्यंत विश्लेषण वाचायला मिळते. त्यादृष्टीने या पुस्तकाचे महत्त्व अर्थशास्त्राच्या वाचक-अभ्यासकांना अतिशय मोठे आहे. क्रमिक अभ्यासक्रमाचे पुस्तक लिहिणे तुलनेने सोपे असते. मात्र, अशा पुस्तकांमध्ये लेखकाचे तटस्थ विश्लेषण आणि मत हाच मुख्य गाभा असतो. डॉ.तुपे यांनी हे आव्हान लीलया पेलले आहे. या पुस्तकाला ख्यातनाम अर्थतज्ज्ञ भालचंद्र मुणगेकर यांची चूतेखणी प्रस्तावना लाभली आहे. तसेच, राज्याचे विद्यमानमंत्री जयंत पाटील यांचेही शुभेच्छापर टिपण आहे.

**परिचय**

पुस्तकात एकूण सात प्रकरणे असून पुस्तकाची सुरुवात 'भारतीय नाणेधोरणाचे अर्थकारणावरील परिणाम' या प्रकरणाने होऊन पुढे नोटाबंदी, अर्थव्यवस्थेची वाटचाल, बँकिंग उद्योगातील घडामोडी, करसुधारणा, महाराष्ट्रातील जनजीवन व कृषी समस्या आणि शेवटी जागतिक आर्थिक आणि राजकीय घडामोडींचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील संभाव्य परिणाम अशा विषयांवरील प्रकरणे आहेत. प्रत्येक प्रकरणात सुमारे सात-आठ उपविषयांवरील लेख आहेत. त्यामुळे हे पुस्तक संदर्भाच्या दृष्टीने वाचनीय झाले आहे.

लेखकाने आपल्या मनोगतात म्हटले आहे की, दररोज घडणाऱ्या आर्थिक घडामोडींकडे केवळ आर्थिक कोनातून न बघता एका व्यापक आणि समग्र दृष्टिकोनातून बघण्याची वृत्ती वाचकांच्या मनात रुजविण्याचा हा छोटासा प्रयत्न आहे. आर्थिक धोरणे, दैनंदिन आर्थिक घडामोडी आणि शासन निर्णय हे

† अर्थशास्त्र विभागप्रमुख, नौरोसजी वाडिया महाविद्यालय, पुणे.
आजीव सभासद क्र.-९३१. भ्रमणध्वनी : ९८८१३४०७२५ ई-मेल : manjushamusmade@gmail.com

समाजाच्या सामाजिक राजकीय आणि मानसिक बाजूंवर खोलवर परिणाम करीत असतात आणि त्या संभाव्य परिणामांची उकल करण्याचा सविस्तर प्रयत्न या पुस्तकात केला आहे.

पहिल्या प्रकरणात प्रामुख्याने भारतीय नाणेधोरणाची चर्चा आहे. लेखकाच्या मते, उदारीकरण कार्यक्रमांतर्गत भारतीय उद्योगांनी बाहेरील देशांतून कर्ज उभारणी करणे अपेक्षित असले तरी ते धोरण भारताच्या बाबतीत परवडणारे नाही. गेल्या काही वर्षांतील भारतीय रुपयाची घसरण चिंता वाढविणारी बाब असली तरी माहिती तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि वाहन उद्योग, कृषी उत्पादने अशा निर्यात उद्योगांना या घसरणीचा फायदा होईल, ही जमेची बाजू आहे. १९९१ पासून सुरू केलेल्या आर्थिक सुधारणा पुरेशा नसून त्या अधिक शीघ्रगतीने करणे, प्रशासकीय सुधारणा, भ्रष्टाचार कमी करणे अशा अनेक उपायांची गरज आहे, हे लेखकाचे मत कोणालाही मान्य होईल.

२०१६-१७ च्या अर्थसंकल्पाचे विश्लेषण करणारे दोन लेख या प्रकरणात आहेत. या अर्थसंकल्पाकडून आगामी अपेक्षा व्यक्त करताना लेखकाने सरकारी बँकांचे अनुत्पादक भांडवलाचे वाढते प्रमाण, घटलेले कर्जवितरण आणि मागणी, बँकांना पुरवण्यात येणारे सरकारी भांडवल, अनौपचारिक क्षेत्रातील कारागिरांचा घटलेला रोजगार या बाबींवर मत करणारे आर्थिक धोरण मांडले जावे, असे म्हटले आहे. प्रत्यक्षात या अर्थसंकल्पाचे वर्णन त्यांनी 'मेक इन इंडिया'चे भान हरपलेला अर्थसंकल्प असे केले आहे. परंतु त्याचबरोबर अर्थसंकल्पातील रस्ते आणि रेल्वेसाठी दिलेल्या ५.११ लाख कोटी रुपयांच्या तरतुदीमुळे पायाभूत सुविधांमध्ये वाढ होऊ शकेल ही त्याची जमेची बाजू आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. कारण त्यामुळे ग्रामीण भागात रोजगार निर्माण होईल, पोलाद, सिमेंट, वाहतूक इत्यादी क्षेत्रांना ऊर्जितावस्था येऊ शकेल. या अर्थसंकल्पातील किती बाबी प्रत्यक्षात खऱ्या ठरल्या हे पाहणे वाचकांसाठी उद्बोधक ठरू शकेल.

नोटाबंदी निर्णयावरील दुसऱ्या प्रकरणात लेखकाने सरकारच्या या धोरणाची परखड चिकित्सा केली आहे. या निर्णयामुळे भारतीय अर्थव्यवस्थेचे नुकसान झाल्याचे मत ते मांडतात. रोकडरहित व्यवहार करण्यासाठी अर्थव्यवस्थेचे स्वरूप, अर्थसाक्षरता, रोख व्यवहार प्रमाण अशा अनेक पातळ्यांवर भारत प्रगत देशांपेक्षा खूप मागे असल्याने तसेच नोटाबंदीनंतर देशात काय परिणाम होऊ शकतात याचा व्यवस्थित गृहपाठ रिझर्व्ह बँकेने आणि केंद्र सरकारने केला नसल्यामुळे हा निर्णय अपयशी ठरेल, हे त्यांचे मत दुर्दैवाने खरे ठरले आहे.

पुढील प्रकरणात भारतीय अर्थव्यवस्थेची वाटचाल स्पष्ट करताना लेखक म्हणतात की, भारतातील रोजगार निर्मितीचे चित्र निराशाजनक आहे. शिवाय घसरत्या बचत-राष्ट्रीय उत्पन्न प्रमाणामुळे परकीय भांडवलाद्वारे गुंतवणुकीची गरज भागवावी लागेल. त्यामुळे चालू खात्यावरील तूट वाढून देशी चलनाचे मूल्य घटेल आणि परिणामी देशाच्या विकासावर प्रतिकूल परिणाम होईल, अशी चिंता ते व्यक्त करतात. एकंदरीत, त्यांच्या दृष्टीने भारतीय अर्थव्यवस्थेची वाटचाल चिंताजनक आहे.

भारतीय बँकिंग क्षेत्रावरील प्रकरणात स्टेट बँकेच्या पाच सहयोगी बँकांच्या एकत्रीकरणाचे वास्तव उलगडून दाखवताना आज पेमेंट बँक म्हणून उदयाला आलेल्या बँका काही वर्षांनी युनिव्हर्सल सेवा देणाऱ्या बँका होऊन सरकारी बँकांच्या मुळावर घाला घालणार नाहीत हे कशावरून, अशी रास्त भीतीही ते व्यक्त करतात. बँक चार्जेस लागू करणे अन्यायकारक असल्याचे

स्पष्ट करताना त्याची सांगड ते नोटाबंदी आणि डिजिटल व्यवहारांच्या वाढत्या प्रमाणाशी घालतात. याच प्रकरणात भारताच्या महालेखापरीक्षकांनी बारा राष्ट्रीय बँकांच्या व्यवस्थापन आणि वैधानिक लेखापरीक्षणासंदर्भात २०१६-१७ वर्षाचा नफा फुगविणे आणि अक्रियाशील जिंदगीची रक्कम कमी दाखविण्याबद्दल जे ताशेरे ओढले होते, त्याचे विश्लेषण आहे. वाईट कर्जे बँक स्थापन करून वाईट कर्जे या बँकेला विकून ताळेबंद स्वच्छ करणे हा जुजबी इलाज असल्याचे त्यांचे मत योग्यच आहे. देशातील राष्ट्रीयकृत बँका वाचवायच्या असतील तर थकीत कर्जे वसूल करण्याची प्रक्रिया जलद आणि प्रभावीपणे राबवण्याची गरज ते विशद करतात. सरकारने सरकारी बँकांना जनतेच्या पैशातून भांडवल पुरवावे आणि त्यांनी अकार्यक्षम उद्योगजगताला कर्जे वाटून ती वाईट आणि थकीत कर्जे होऊ द्यावीत, हे चक्र तोडण्याच्या त्या दिशेने प्रयत्न होण्याची लेखक आशा व्यक्त करतात.

भारतीय करसुधारणा या विषयावरील प्रकरणात हॉटेलमधील ऐच्छिक सेवाशुल्काबाबत लिहिताना लेखक म्हणतात की, आता ग्राहकांनीच जागरुकता दाखवून स्वतःचे पैसे वाचविले पाहिजेत. भारतात १ जुलै २०१७ पासून वस्तू आणि सेवा कर लागू झाला. त्या संदर्भात लेखकाने भारताची इतर देशांमधील कराची तुलना केली आहे. या करामुळे संघराज्यात अनेक गोंधळ होतील आणि अंतिमतः महागाई वाढेल हे त्यांचे मत अंशतः खरे झाले आहे. भारताचा जगात कर सुधारणेच्या बाबतीत १६१वा क्रमांक लागतो हे नमूद करून ते म्हणतात की, वस्तू आणि सेवा कर लागू करण्यापूर्वी शासनाने पूर्व गृहपाठ केला नसल्याने अडचणींचा डोंगर कमी होत नाही.

पुढील प्रकरणात महाराष्ट्रातील ढासळती कायदा आणि सुव्यवस्था राज्याच्या विकासाला कशी मारक ठरते आहे हे स्पष्ट करताना लेखकाचा भर प्रामुख्याने महिला सुरक्षिततेवर आहे. याच प्रकरणात महाराष्ट्रातील वीज दरवाढीचे उलटे अर्थशास्त्र मांडले आहे. त्यांच्या मते, सतत वीजदरवाढ करणे हा काही कार्यक्षमतेचा निकष ठरत नाही. वीजचोरी, वीज गळती, शेतकऱ्यांना अतिरिक्त सवलतीच्या दराने वीज देणे अशा अनेक मुद्द्यांचा ऊहापोह त्यांनी येथे केला आहे. देशातील शेतकरी कुटुंबाची तुटपुंज्या उत्पन्नावर गुजराण होत असल्याचे प्रखर वास्तव त्यांनी सविस्तर आकडेवारीसह मांडले आहे. कृषी क्षेत्रावरील या प्रकरणात पीक विमा योजना, कर्जमाफी, किंमत आयोग, कांद्याच्या किंमती अशा अनेक ज्वलंत समस्यांना स्पर्श केला आहे.

शेवटच्या प्रकरणात लेखकाने जागतिक घडामोडींचा भारतावर होणारा परिणाम विशद केला आहे. यात ब्रेक्झिट, ट्रम्प यांचे भारताबाबतचे आर्थिक धोरण, आंतरराष्ट्रीय स्थलांतर, पॅरिस कराराचे अर्थकारण अशा तत्कालीन महत्त्वपूर्ण विषयांबरोबरच नोबेल विजेते अंगस डेटन यांच्या विचारातून भारतासाठी काय धडा घ्यावा, याचेही मुद्देसूद विवेचन केलेले आहे.

**समारोप**

एकंदरीत, प्रस्तुत पुस्तक हे भारतीय अर्थव्यवस्थेच्या समग्रलक्षी अर्थशास्त्राच्या व्यावहारिक उपाययोजनांच्या तार्किक विश्लेषणाचा वस्तुपाठ आहे. पुस्तकात किरकोळ मुद्रणचुका झालेल्या आहेत. मात्र, त्यामुळे त्याच्या विचारगर्भ आशयाला बाधा पोचत नाही.

प्रस्तावनेत अर्थतज्ज्ञ मुणगेकरांनी म्हटल्याप्रमाणे वर्षभर घडणाऱ्या आर्थिक घटना आणि सरकारी धोरणे यांचा समग्र आढावा 'अर्थजागर' या पुस्तकात घेण्याचा यशस्वी प्रयत्न लेखकाने केला आहे. प्राध्यापक,

अभ्यासक आणि विशेषकरून स्पर्धापरीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थी वर्गाला हे पुस्तक उपयुक्त होईल. गुंतागुंतीच्या आर्थिक घडामोडी सहजपणे आणि सोप्या भाषेत आकडेवारीसह मांडण्याचा प्रामाणिक प्रयत्न केल्याचा लेखकाचा दावा वाचकाला मान्य करावा लागेल. मंत्रीमहोदयांनी लिहिल्याप्रमाणे प्रस्तुत पुस्तक वाचकाला आर्थिक घडामोडींचा सर्व क्षेत्रावर होणारा परिणाम जाणवून देणारे डोळस भान देईल. तसेच, वाचकांच्या आर्थिक जाणिवा समृद्ध होण्याबरोबरच त्यांची सामाजिक आणि राजकीय प्रगल्भता वाढीस लागेल, यात शंका नाही.

◆

## निवेदन : अर्थसंवाद वर्गणी

अर्थसंवाद अंकाचे वर्गणीदार होऊ इच्छिणाऱ्या महाविद्यालय / शैक्षणिक संस्था / व्यावसायिक संस्था/ग्रंथालये यांच्यासाठी **त्रैवार्षिक वर्गणी रु. २०००/- तर पंचवार्षिक वर्गणी रु. ३०००/-** आहे. ही वर्गणी कृपया 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने राष्ट्रीयीकृत बँकेच्या डिमांड ड्राफ्टद्वारे किंवा संपादकांशी संपर्क साधून NEFT (मराठी अर्थशास्त्र परिषद, बँक ऑफ इंडिया, राजारामपुरी, कोल्हापूर. खाते क्र. : 094720110000368, IFSC : BKID0000947) द्वारे पाठवावी. **मनिऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.** सदर वर्गणी कृपया प्रमुख संपादकाच्या पुढील पत्त्यावर कव्हरिंग लेटरसह पाठवावी.

**डॉ. राहुल शं. म्होपरे**
विद्यापीठ क्वार्टर्स नं. डी-३४, सायबर समोर, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, ता. करवीर, जि. कोल्हापूर. पिन : ४१६ ००४. भ्रमणध्वनी : ०९९२३८७९०२०

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

जगातील सर्व काही श्रमाद्वारे खरेदी केले जाते.

**- डेव्हीड हुमी**

# आर्थिक जगत

**जे. एफ. पाटील** †

पुस्तकाचे नाव : आर्थिक जगत (खंड ५)
लेखक : दि. व्य. जहागीरदार
प्रकाशक : कौशिल्य ज्ञान प्रबोधिनी, अमरावती
पृष्ठ संख्या : ८+२००
किंमत : रु.३००/-
प्रकाशन वर्ष : २०२०

प्रा. डॉ. दि. व्य. जहागीरदार (अमरावती) यांचे ''आर्थिक जगत''(खंड ५) हे वृत्तपत्रीय लेखांचा (५०) संग्रह करणारे पुस्तक नुकतेच वाचून झाले.

सेवानिवृत्त प्राध्यापक तथा प्रशासक डॉ. जहागीरदार हे उन्मुक्त शिक्षकी प्रवृत्तीचे आहेत. त्यांच्यातील अर्थशास्त्राचा विद्यार्थी आजही कुतूहलयुक्त अभ्यासक म्हणून चैतन्यशील आहे. आपल्या भोवतीच्या जगात होणाऱ्या असंख्य बदलांचा, निर्माण होणाऱ्या प्रश्नांचा व अडचणींचा संबंध मूलतः या ना त्या आर्थिक वास्तवाशी असतो व तसा संबंध सोप्या भाषेत सर्वसाधारण वाचकासमोर मांडणे हा या संग्रहातील लेखाचा मुख्य उद्देश आहे. कांही लेख आर्थिक विचारवंतावर आहेत.

आर्थिक विचारवंतावर/राजकीय नेत्यावर एकूण १० लेख आहेत. त्यात गोपाळ कृष्ण गोखले, पं. नेहरू, न्या. रानडे, म. गांधी या स्वातंत्र्य चळवळीची जडणघडण करणाऱ्या चार महत्त्वाच्या राजकीय नेत्यांच्या आर्थिक विचारांचा नेमका, संक्षिप्त, संतुलित आढावा आहे.

प्रो. लॉरन्स क्लाईन, अमर्त्य सेन, भगवती वाद, जॉननॅश, कार्लमार्क्स, थॉमस प्रिकेटी, ए. व्ही. राजवाडे या अर्थतज्ज्ञावरील लेखात त्या अभ्यास विषयाची व्याप्ती मोजक्याच पृष्ठसंख्येत मांडण्याचे कठीण काम प्रा. जहागीरदार यांनी सुगम पद्धतीने केले आहे.

प्रचलित काल-प्रवाहात निर्माण झालेल्या प्रश्नांच्या अनुषंगाने प्रा. जहागीरदार, सिद्धांत, व्यवहार व प्रशासन यातील संतुलन स्पष्ट करतात. काही लेख ऐतिहासिक नोंद म्हणून महत्त्वाचे आहेत. त्यात ब्रिटिशनागरी प्रशासन, नागपूर करार, महाराष्ट्राच्या मध्ययुगीन कालखंडातील अर्थव्यवस्थेचे पैलू, २०१५ चा पॅरिस करार, जागतिक व्यापार संघटनेची (WTO) २५ वर्षे, बँक राष्ट्रीयकरणाची ५० वर्षे इ.

उर्वरित लेख बदलत्या परिस्थितीत निर्माण

† माजी अध्यक्ष, कार्याध्यक्ष व विश्वस्त, मराठी अर्थशास्त्र परिषद.
आजीव सभासद क्र. : ६२, भ्रमणध्वनी : ९४२२०४६३८२, ई-मेल : jfpatil@rediffmail.com

झालेल्या आर्थिक प्रश्नांची जबाबादर सामाजिक चिकित्सा आहे. अशा प्रश्नात, शहरीकरण, वृद्धी व रोजगार विसंवाद, विकासाची पर्यायी प्रारूपे, आरोग्यविमा, शेती उत्पादकता, स्वच्छता, विकास-वित्त, औद्योगिक समस्या, सार्वजनिक तेल क्षेत्र, हिवरे बाजार, विषमता, स्त्रीवर्गाचा घटता श्रमसहभाग, सार्वत्रिक प्राथमिक उत्पन्न, केंद्रीय अर्थसंकल्प, हवामान बदल, विदेशी विनिमय साठा, तेलाच्या किंमती, पीकविमा, शेतमालाच्या आधार किंमती, महिला दिन, मध्यवर्ती बँक, विमान वाहतूक, अर्थसंकल्प अशा विविध विषयांवर प्रा. जहागीरदार, तत्कालीन संदर्भ व चिरंतन शास्त्रीय सत्य यांच्यातील संलग्नता सहज-सुंदर भाषेत व्यक्त करतात. प्रश्नांचे सामाजिक संदर्भ स्पष्ट करताना अभ्यासविषयाची शास्त्रीय चौकट शाबूत ठेवण्याचे त्यांचे भान लक्षणीय आहे.

आयुष्यभर अध्ययन, अध्यापन, संशोधन व त्या मानाने सीमांत प्रमाणात प्रशासकीय कार्य असे व्यक्तिमत्त्व असणारे प्रा. जहागीरदार अंगभूत विचारवंत आहेत. त्यांच्या विषय निवडीला व विषय विवेचनाला सामाजिक न्यायाची बैठक आहे. युक्तिवाद, हट्टाग्रही नाही, तर अत्यंत आर्जवी पटवून देण्यासाठी आक्रमंतऐवजी नम्रतेचा आधार घेणारा आहे. सतत वाचन, सतत चिंतन व सतत लेखन (प्रबोधन) करणे ही एका अर्थाने यशस्वी शिक्षकाची त्रिगुणात्मक कसोटी असते. प्रा. जहागीरदार अशा शिक्षकांपैकी एक ठळक उदाहरण आहेत.

पुस्तकाचे प्रकाशन केल्याबद्दल कौटिल्य ज्ञान प्रबोधिनीचे आभार मानले पाहिजेत. प्रा. जहागीरदार असेच लिहिते राहोत हीच सदिच्छा!

◆

उद्योगपतींसाठी एक नियम आहे आणि तो म्हणजे : अत्यल्प वेतन देऊन शक्य तितक्या कमी किंमतीवर उत्तम प्रतीची वस्तू उपलब्ध करा.

**- हेन्री फोर्ड**

मला वाटतं की, अर्थशास्त्रींना भौतिकशास्त्रज्ञापेक्षा वैज्ञानिक पद्धतीने ज्ञानी आणि अत्याधुनिक व्हायला हवे कारण ते नियंत्रित प्रयोगशाळेतील प्रयोगांमुळे प्रत्यक्ष व्यवहारात मार्गदर्शन करतात आणि त्यामुळे आपण भलतीकडे जाऊ शकत नाही.

**- पॉल सॅम्युएलसन**

# विकास (Telescopic Development)

**शि. ना. माने** †

Telescopic Development – विकास ही अर्थशास्त्रातील संज्ञा (प्रतिमान) दीर्घकालिक व कालसापेक्ष आहे. नमुना म्हणून स्मिथ - माल्थस प्रतिमान, रिकार्डो - मार्क्स - सोलो प्रतिमान आणि त्यानंतरचे हॅरॉड - डोमर प्रतिमान यांचा उल्लेख करावा लागेल. या सर्व प्रतिमानांचे एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांचे तंत्रविशिष्ट स्थिर (Technical Constant). तसेच प्राकृतिक भांडवल हा विकासाचा नायक होता. आज एकविसाव्या शतकात त्याची जागा ज्ञान किंवा तंत्रविद्येने घेतली आहे. आणि त्याचे बीजारोपण प्रसिद्ध विकास अर्थशास्त्रज्ञ ऑर्थर लेविस यांनी 'दगडी कोळसा ही मूल्यांकित साधनसंपत्ती नाही जोपर्यंत माणसांना त्याचे ज्वलन करण्याचे ज्ञान अवगत करता येत नाही' (Coal is not a valued resource unless men learn to burn it.) या त्यांच्या प्रतिपादनात केले आहे. असो.

पाठीमागील सुमारे दोनेक शतकांत विकास प्रक्रिया विविध संक्रमणातून गेली आहे. तिच्या पुढील काही प्रकारांवरून त्या संक्रमणाची कल्पना यावी. हॅरॉड - डोमर, स्वयंनिर्वाही, नवप्रवर्तन व सर्जनशील विध्वंस, सामाजिक परिबद्धता/वचनबद्धता, मूलभूत शक्तता, सकल राष्ट्रीय उत्पादित, मानव विकास, उपयोगिता - पितृत्व पुनर्मेळ (Nudge) आणि हरित वृद्धी. हे प्रकार/ प्रावस्था परस्पर अपवर्जक (Mutually Exclusive) असतीलच असे नाही.

आता आपण सॅम्युअलसन यांनी त्यांच्या इकॉनॉमिक्स (१९७३, पृष्ठ ७८२) मध्ये उपक्रमी व नवप्रवर्तन यांच्या तसेच न्यून-विकसित देशांच्या संदर्भात सूतोवाच केलेल्या टेलिस्कोपिक विकास संज्ञेचा विचार करू. पुढील उदाहरणात ते स्पष्ट करतात : अमेरिकेसारख्या देशात विकासाची वर्तमान पायरी गाठण्यासाठी काही दशके प्रयत्न करावे लागले. उलट, भारतासारख्या न्यून-विकसित देशाच्या सरकारला ती पायरी वर्षभरात पार करण्याची घाई झाली आहे. दुर्बिणीतून दूरची वस्तू अगदी जवळ दिसते त्याप्रमाणे त्या देशातील निवडक लोकांनी अमेरिकेचा अभ्यास दौरा करावा. तेथील अधिकतर कार्यदक्ष उत्पादन पद्धतींची नक्कल करावी. मायदेशात परत येऊन तेथे त्या पद्धतींचा प्रयोग करावा आणि नंतर स्वस्थ बसून जादा उत्पादनाची वाट पाहावी. हे आहे विकासाचे

† माजी अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद, निवृत्त प्राध्यापक, धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय, सातारा.
आजीव सभासद क्र. : १०८, भ्रमणध्वनी : ७७३८३५६७८१

जादूमयी आश्चर्य. विकास प्रक्रिया इतकी सहजसिद्ध प्रावस्था नसते. यातून 'ग्रीक ट्रॅजेडी' सारखे गहिरे आर्थिक संकट निर्माण होते. ग्रीस, पोर्तुगाल आदि युरोपीय देशांचा हा ताजा इतिहास आहे. या संज्ञेचे पहिले अपत्य म्हणून सरकारी, लोकानुनयवादी व अर्थशास्त्रदुष्ट कर्जमाफी या नवीन आर्थिक नितीचा उल्लेख करता येईल आणि त्या प्रतिमानाचे दुसरे अपत्य म्हणून उत्पादन परिव्ययावर किमान ५०% अतिरिक्त किंमतीच्या (Surplus Price) सर्वपक्षीय, संघटित मागणीचा आपत्तिकारक लघुदृष्टी (Disaster Myopia) म्हणून उल्लेख करता येईल. वास्तव हे आहे की, अतिरिक्त शेतकरी (Surplus Farmers) ही भारतीय शेतीची कळीची व दीर्घकालिक समस्या आहे, तथाकथित अतिरिक्त किंमत नव्हे. अर्थातच, त्याची सविस्तर चिकित्सा करण्याचे हे स्थळ नव्हे. अर्थसंवाद, ऑक्टोंबर-डिसेंबर, २०१७ व जानेवारी-मार्च, २०१८ मध्ये ती प्रसिद्ध झाली आहे. वरील चर्चेच्या आधारे दुर्बिणांकित किंवा दूरदर्शकांकिक विकास प्रतिमान हे पर्याय सुचविले आहेत.

अखेरचा एक प्रश्न. एका वनस्पतीची फांदी कापून तिची जास्त जोमदारपणे वाढ होईल अशा हेतूने तिचे दुसऱ्या वनस्पतीवर कलम करण्याइतपत विकास प्रक्रिया बटाट्याच्या चिप्ससारखी चीप आहे काय?

◆

## निवेदन - अर्थसंवाद

अर्थसंवादच्या सर्व वर्गणीदार शैक्षणिक संस्था, व्यावसायिक संस्था, ग्रंथालयांना कळविण्यात येते की, मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या कार्यकारिणी व सर्वसाधारण सभेच्या ठरावानुसार १ एप्रिल, २०२० पासून अर्थसंवादची त्रैवार्षिक वर्गणी २००० रु. व पंचवार्षिक वर्गणी ३००० रु. करण्यात आलेली आहे. ज्या वर्गणीदार सदस्यांनी यापूर्वीच जुन्या दराने रक्कम पाठवली आहे त्यांनी फरकाची रक्कम त्वरित पाठवून देवून सहकार्य करावे.

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

# बॅड बँक BAD BANK

**संतोष दास्ताने** †

बँकांच्या विविध प्रकारांमध्ये आता या नव्या प्रकाराची भर पडली आहे. जगात ही बँक प्रथम १९८८ साली अमेरिकेत स्थापन झाली. त्यानंतर इंग्लंड, जर्मनी, आयर्लंड, फ्रान्स अशा अनेक देशांमध्ये या प्रकारच्या बँका स्थापन झाल्या. बॅड बँक याचा अर्थ एखाद्या बँकेची अकार्यकारी मत्ता आणि/अगर रोकड-असुलभ मत्ता अशा बँकेला विकणे किंवा त्या बँकेकडे वर्ग करणे. मंदीचा फेरा किंवा गैरव्यवस्थापन किंवा इतर काही कारणाने अशी बेसुमार कर्जे साचत जातात. त्यातील कित्येकांची वसुली अवघड, अतिअवघड, किंवा अशक्य असते. तेव्हा हे नसते ओझे अशा बँकेकडे देऊन आपला ताळेबंद स्वच्छ करणे हे बँकेला क्रमप्राप्त असते. त्यासाठी या बँकेची स्थापना केली जाते. या बॅड बँकेने आता त्या कर्ज प्रकरणांचा पाठपुरावा करणे, कर्जाची वसुली करणे, त्यासाठी कोर्ट कचेऱ्या करणे अशी वेळ खाणारी गुंतागुंतीची कामे करीत राहणे अपेक्षित असते.

आता बॅड बँक या शीर्षकाचे काय? अर्थशास्त्र/बँकिंग/वाणिज्य विषयात कोठेही गुड बँक असा शब्दप्रयोग वापरात असलेला आढळत नाही. तेव्हा गुड - चांगला, बॅड - वाईट अशा संज्ञा केवळ भाषांतर करून येथे वापरता येणार नाहीत. खरे पाहता शीर्षकातही उलटपालट झाली आहे. धोकादायक किंवा चुकीचा कर्ज व्यवहार करून थकबाकी साचू देणाऱ्या बँकेला येथे (अप्रत्यक्षपणे) गुड असे म्हटले जाते व ती कर्ज प्रकरणे हाती घेऊन कर्जवसुली करण्याचे चिवट काम चिकाटीने करणाऱ्या बँकेला मात्र बॅड असा शब्दप्रयोग हा विरोधाभास न कळणारा आहे. तेव्हा वाईट बँक, निकृष्ट बँक, मलिन बँक, अनिष्ट बँक असे शब्दप्रयोग दूर ठेवलेले बरे. अशी थकीत कर्जे बाजूला काढणे, ती इतरांमध्ये मिसळू न देणे व अशी प्रकरणे एक एक करून हाती घेणे आणि मार्गी लावणे अशी मुख्य कामे ही बँक करते. तिला त्या कार्यानुसार डब्बा बँक असा शब्दप्रयोग ठीक होईल असे वाटते. उद्दिष्ट आणि कामकाज यात वाईट किंवा अनिष्ट काहीच नसताना त्या शब्दाचा वापर कशासाठी? उलट असा विनाकारण वाईटपणा न सुचवणारा व त्या डब्यातून कर्ज प्रकरणे एक एक करून काढून त्यावर प्रक्रिया करणारा शब्दप्रयोग म्हणून डब्बा बँक हा योग्य होईल असे वाटते. डब्बा या

† माजी अध्यक्ष, माजी विश्वस्त मराठी अर्थशास्त्र परिषद
आजीव सभासद क्र. : ६२, भ्रमणध्वनी : ९८२२००९९५४, ई मेल : santosh.dastane@gmail.com

शब्दात ब या अक्षराचे द्वित्व मुद्दाम ठेवले आहे. कारण हा नेहमीचा खाऊचा किंवा फराळाचा डबा नव्हे. यातील काही माल शेवटी टाकूनच द्यायचा आहे. त्यामुळे काहीसा तुच्छतेचा किंवा टाकाऊपणाचा अर्थ डब्बा यात अभिप्रेत आहे.

जाता जाता, भारतात सुनील मेहता समितीने २०१८ साली या बँकेची स्थापना करावी, असे सुचवले आहे. पण त्यावर सरकारने किंवा रिझर्व्ह बँकेने अद्याप गांभीर्याने विचार केलेला नाही.

◆

## निवेदन : अर्थसंवाद

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ज्या आजीव सदस्यांना अंक मिळत नसेल किंवा पत्त्यात बदल झाला असेल तर त्यांनी प्रमुख संपादक, अर्थसंवाद यांच्याकडे तशा आशयाचे पत्र पाठवून त्या पत्रात आपला नवीन पत्ता लिहून पाठवावा; मात्र या पत्रात आजीव सदस्य क्रमांकाचा उल्लेख असणे अत्यंत गरजेचे आहे.

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

आम्हाला माहित आहे की स्थिर सरकारे असलेल्या प्रगत अर्थव्यवस्था ज्या त्यांच्या स्वत:च्या चलनात कर्ज घेतात, संकट न करता अत्यंत उच्च पातळीवरील कर्ज उचलण्यास सक्षम असतात.

**- पॉल क्रुगमन**

# राष्ट्रीय वेबसंवाद अहवाल

**१. कोविड -१९ नंतरची भारतीय अर्थव्यवस्था**

मराठी अर्थशास्त्र परिषद आणि कला, वाणिज्य महिला महाविद्यालय, बल्लारपूर यांच्या संयुक्त विद्यमाने वेब संवादाचे आयोजन करण्यात आले होते. दि. १२ जून, २०२० रोजी सकाळी १०:३० वाजता झूम ॲपच्या साहाय्याने ऑनलाईन पद्धतीने आयोजित या वेबसंवादात परिषदेच्या ६०० पेक्षा जास्त आजीव सदस्यांनी नोंदणी केली होती. 'कोविड-१९ नंतरची भारतीय अर्थव्यवस्था' या प्रमुख विषयाला घेऊन दोन उपविषयावर वेबसंवादात चर्चा करण्यात आली. 'कोविड-१९ चे भारतीय शेती क्षेत्रावरील परिणाम' या विषयावर ग्रो इकॉनॉमिक्स रिसर्च सेंटर, आनंद (गुजरात) चे संचालक डॉ. श्रीकांत कळमकर यांनी अतिशय विस्ताराने मांडणी केली. दैनिक दिव्य मराठीचे प्रमुख संपादक तथा महाराष्ट्रातील ख्यातनाम विचारवंत संजयजी आवटे यांनी 'कोरोनानंतरच्या भारतीय अर्थव्यवस्थेचे प्रारूप' या विषयावर मूलगामी स्वरूपाची मांडणी केली. या वेबसंवादाचे अध्यक्षस्थान मराठी अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. अनिल सूर्यवंशी यांनी भूषविले. या वेबसंवादाचे उद्घाटन कला, वाणिज्य महिला महाविद्यालय, बल्लारपूरचे प्राचार्य डॉ. अनिल शिंदे यांनी केले. प्रास्ताविक कार्यवाह-खजिनदार डॉ. मारोती तेगमपुरे यांनी केले. परिषदेचे कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. कैलाश पाटील, अर्थसंवादाचे प्रमुख संपादक डॉ. राहुल म्होपरे, कार्यकारणीचे सदस्य, विश्वस्त, माजी अध्यक्षासह मोठ्या प्रमाणात परिषदेच्या आजीव सभासदांनी यामध्ये सहभाग नोंदवला.

डॉ. श्रीकांत कळमकर यांनी आपल्या विषयाची मांडणी करीत असताना अतिशय परखड आणि वास्तवदर्शी निरीक्षणे नोंदवली. ते म्हणाले की, कोविड-१९ या जागतिक महामारीमुळे भारतीय अर्थव्यवस्था पूर्णपणे विस्कळित झाली आहे / होणार आहे. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेसमोर अनेक आव्हाने निर्माण होणार आहेत. भारताचा विकासदर घसरणार असल्याचा इशारा त्यांनी यावेळी दिला. कोविड-१९ मुळे भारतीय अर्थव्यवस्थेतील कृषिमूल्य साखळी विस्कळित होणार असून सीमांत शेतकरी व शेतमजूर यांचे बरोबरच गहू, द्राक्ष, केळी, टोमॅटो, चणा, कापूस, कांदा, बटाटा, मिरची, हळद यांसारख्या नगदी पिकांचे उत्पादन घेणारे मध्यम व श्रीमंत शेतकरीसुद्धा कोविड-१९ मुळे अडचणीत आले आहेत. देशात सर्वत्र लागू करण्यात आलेल्या टाळेबंदीमुळे विक्री व्यवस्था अडचणीत आली आहे. परिणामी, कृषिमालाच्या किंमतीत २० ते ५० टक्क्यांपर्यंत घसरण झाल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. कोविड-१९ च्या प्रभावामुळे या वर्षी सुमारे १४० दशलक्ष लोकांना अत्यंत गरिबीचा सामना करावा लागू शकतो. अशी मांडणी आकडेवारीच्या साहाय्याने डॉ. कळमकर यांनी केली.

या वेबसंवादातील दुसरे प्रमुख साधन व्यक्ती संजयजी आवटे यांनी 'कोरोनानंतरच्या भारतीय अर्थव्यवस्थेचे प्रारूप' या विषयावर सखोल मांडणी केली. कोरोना या साथ रोगाचे जगावर संकट आले

असून यामुळे जागतिक स्तरावरील सर्व संदर्भ बदलले आहे/बदलत आहेत. तेव्हा कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर नव्या-नव्या प्रारूपाची मांडणी आपणास करावी लागेल. महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येपैकी एकचतुर्थांश लोकसंख्या मुंबई आणि मुंबईच्या उपनगरामध्ये राहते, औद्योगिक केंद्रीकरण, राजकीय केंद्रीकरण, सामाजिक तथा सांस्कृतिक केंद्रीकरण मोजक्याच शहरांत झालेले आहे. या केंद्रीकरणामुळे गावे ओस पडली आहेत आणि शहरे अवास्तव बकालपणे वाढली आहेत. या महामारीने आपणास जाणीव करून दिली की, कोणतेही केंद्रीकरण हे वाईटच असते. अशी मांडणी करून संजय आवटे पुढे म्हणाले की, कोविड-१९ मुळे सर्वत्र ऑनलाईन शिक्षणाचे वारे वाहू लागले आहे. मात्र या नव्या प्रक्रियेमध्ये सामाजिक समस्येचे काय? हा प्रश्न निर्माण होणार असून या प्रक्रियेमुळे सर्व क्षेत्रातील श्रमाचे महत्त्व कमी होईल. श्रमाचे पारंपरिक संदर्भ बदलतील यामुळे सामाजिक न्यायाच्या तत्त्वाला बाधा निर्माण होऊ शकते. त्यामुळे कोविड-१९ नंतरच्या अर्थव्यवस्थेला नव्या प्रारूपाची गरज आहे. भारतीय अर्थव्यवस्थेला सामाजिक विषमतेची पार्श्वभूमी असून कोविड-१९ नंतरच्या अर्थव्यवस्थेत यावर विचार होण्याची नितांत गरज आहे. अशा स्वरूपाची मांडणी करून या प्रक्रियेमध्ये मराठी अर्थशास्त्र परिषदेने महत्त्वाची भूमिका साकारण्याची गरज असल्याचे प्रतिपादन करून परिषदेने आयोजित केलेल्या वेबसंवादाचे आवटे यांनी कौतुक केले.

या वेबसंवादाचा अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. अनिल सूर्यवंशी यांनी 'कोविड-१९' मुळे आज परिषदेला अशा स्वरूपाचे उपक्रम राबवावे लागत आहेत. परिषद नेहमीच महाराष्ट्राच्या तथा देशाच्या विकासाची आणि सामाजिक बांधिलकीची भूमिका बजावत आलेली आहे. तथा बजावत राहील, अशी भूमिका विशद करून एकूणच सकारात्मक संवाद विकासाला पूरक असतो, अशी भूमिका त्यांनी यावेळी मांडली. परिषदेचे कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. कैलाश पाटील यांनी सर्वांचे स्वागत केले. या राष्ट्रीय वेबसंवादाचे समन्वयक डॉ. मनिष कायरकर यांनी सूत्रसंचालन केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. शेवटी आभार व्यक्त करून कार्यक्रम संपला.

◆

## २. कोविड - १९ चा महिला जीवनावर झालेला परिणाम

कोविड-१९ मुळे जागतिक आणि भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेल्या परिणामांचे स्त्रियांच्या जीवनावर विविध अंगाने पडसाद उमटले आहेत. धोरणकर्त्यांनी नेहमीप्रमाणे याकडे दुर्लक्ष केल्याचे दिसते. श्रमिक, नागरिक आणि महिला या भूमिकेतून स्त्रियांना कोणत्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे, जावे लागणार आहे आणि देशाच्या व्यापक धोरणामध्ये त्यांचे प्रतिबिंब पडते अथवा नाही, याविषयीची व्यापक चिकित्सा होणे आवश्यक असून 'कोविड-१९ चा महिला जीवनावर झालेला परिणाम' असा विषय घेऊन मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या माध्यमातून २३ जून २०२० रोजी दुपारी ३:०० वाजता झूम ॲपच्या साहाय्याने ऑनलाईन पद्धतीने राष्ट्रीय वेबसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. मराठी अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. अनिल सूर्यवंशी हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. परिषदेचे कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. कैलास पाटील, अर्थसंवादाचे प्रमुख संपादक डॉ. राहुल म्होपरे, कार्यकारी मंडळाचे सदस्य,

विश्वस्त, माजी अध्यक्ष, परिषदेच्या आजीव सभासदांसह अनेक वेगवेगळ्या क्षेत्रातील अभ्यासक, कार्यकर्ते या वेबसंवादात मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. साधारणपणे ९५० पेक्षा अधिक नोंदणी या वेबसंवादासाठी करण्यात आली होती. या वेबसंवादाचे वैशिष्ट्य असे की, हा वेबसंवाद आयोजित करण्यापासून सर्वार्थाने यशस्वी करण्यापर्यंतची सर्व जबाबदारी महाराष्ट्रातील वेगवेगळ्या विद्यापीठ कार्यक्षेत्रातील परिषदेच्या आजीव सभासद असलेल्या महिला सभासदांनी पार पाडली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. अनिल सूर्यवंशी हे होते.

या वेबसंवादाच्या यशस्वितेसाठी संयोजन समिती गठीत करण्यात आली होती. डॉ. स्नेहा देशपांडे समन्वयक म्हणून तर डॉ. अमृता सूर्यवंशी या सहसमन्वयक म्हणून संयोजन समितीचे काम पाहात होत्या. या समितीत प्राचार्या डॉ. तेजस्विनी मुडेकर (कोल्हापूर), डॉ. रत्ना निंबाळकर (मुंबई), डॉ. क्रांती बोरावले, डॉ. मंजूषा मुसमाडे (पुणे), डॉ. वनिता चोरे (अमरावती), डॉ. विद्या पाटील (जळगांव), डॉ. कृतिका खंदारे (औरंगाबाद), डॉ. छाया करकरे (नांदेड), डॉ. शोभा खंदारे (सोलापूर), प्रा. रेणुका प्रजापती (एस.एन.डी.टी.), डॉ, मनिषा आवळे (उर्वरित विद्यापीठ) यांचा समावेश होता. संयोजन समितीतील प्रत्येकांनी आपली जबाबदारी स्वतंत्र कार्यशैलीने पार पाडून वेबसंवाद यशस्वी करण्यासाठी मोलाची भर घातली.

या वेबसंवादात प्रमुख साधन व्यक्ती म्हणून 'कोविड-१९ महिलांची परिस्थिती आणि सरकारी धोरण' या विषयावर मांडणी करण्यासाठी मा. किरण मोघे उपस्थित होत्या. त्या अखिल भारतीय जनवादी महिला संघटनेच्या केंद्रीय कमिटीच्या सदस्य आहेत. याबरोबरच एक अर्थतज्ज्ञ म्हणूनही सर्वत्र परिचित आहेत. आपल्या मांडणीत वेगवेगळी सामाजिक निरीक्षण नोंदवून एकूणच महिलांना कोणत्या अवस्थेतून या महामारीच्या काळात प्रवास करावा लागत आहे. या विषयीची परखड मांडणी करून सरकारी पातळीवरील उदासिनतेवरही त्यांनी आपले परखड भाष्य आपल्या विवेचनात ठेवले. वेगवेगळ्या सामाजिक संदर्भाचा दाखला देत महिला जीवनावर झालेल्या परिणामांची त्यांनी सूत्रबद्ध मांडणी केली.

या वेबसंवादातील दुसऱ्या प्रमुख साधन व्यक्ती म्हणून डॉ. विभूती पटेल यांची उपस्थिती होती. टाटा सामाजिक विज्ञान संस्था, मुंबई येथे कार्यरत असलेल्या विभूती पटेल यांनी कोविड-१९ 'महामारीचा महिला व बालकांवर झालेला परिणाम' या विषयावर अतिशय मूलगामी स्वरूपाची मांडणी त्यांनी केली. आपल्या मांडणीत जीवनाच्या वेगवेळ्या क्षेत्रात कार्यरत महिला व बालकांवर झालेल्या कोविड-१९ च्या परिणामांचा आकडेवारीच्या साहाय्याने आढावा घेतला. साधारणतः दीड तास चाललेल्या आपल्या विवेचनात त्यांनी या प्रश्नाच्या अनुषंगाने सविस्तर आढावा घेतला. २०११च्या जनगणननेनुसार भारतात ३०.९ दशलक्ष स्थलांतरित महिला असून त्या स्थलांतरित मजूर म्हणून, रोजंदारीवर असंघटित क्षेत्रात कार्यरत असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. भारतातील ९२% महिला या दहा हजार रुपयापेक्षा कमी मासिक मिळकत असणाऱ्या असून हे चित्र वेदनादायी आहे, अशी रास्त भूमिका त्यांनी यावेळी मांडली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. अनिल सूर्यवंशी म्हणाले की, कोरोना हा आजार श्रीमंत व मध्यमवर्गीय घेऊन आले आणि त्याचे गंभीर परिणाम मात्र गरीबांना भोगावे लागत आहेत. देशातील खालच्या स्तरातील लोकांना त्यातही गंभीर परिणाम

महिला जीवनावर झालेत अशी भूमिका मांडून या वेबसंवादाचे उत्तम आयोजन करणाऱ्या संयोजन समितीचे त्यांनी कौतुक केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यवाह-खजिनदार डॉ. मारोती तेगमपुरे यांनी केले. वेबसंवादाच्या समन्वयक डॉ.स्नेहा देशपांडे यांनी सर्वांचे स्वागत केले. सूत्रसंचालन डॉ.मंजूषा मुसमाडे यांनी तर दोन्ही पाहुण्यांचा परिचय प्रा. रेणुका प्रजापती, प्राचार्य डॉ. तेजस्विनी मुडेकर यांनी करून दिला. अहवाल लेखनाची जबाबदारी डॉ. विद्या पाटील व डॉ. कृतिका खंदारे यांनी पार पाडली. या वेबसंवादासाठी तंत्रसहाय्य डॉ. मनिष कायरकर यांनी पुरवले. डॉ. वनिता चोरे यांनी आभार प्रदर्शन केले.

**- मारोती वि. तेगमपुरे**
कार्यवाह - खजिनदार
मराठी अर्थशास्त्र परिषद

◆

## निवेदन

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सर्व आजीव सदस्यांना व अर्थसंवाद लेखकांना कळविण्यात येते की, कार्यकारिणीच्या ठरावानुसार दि. १ एप्रिल २०२० पासून अर्थसंवाद हा '**तज्ज्ञ परिक्षित नियतकालीक**' करण्यात आलेला आहे. त्यामुळे यापुढील काळात अर्थसंवादचे लेख हे तज्ज्ञांकडून परिक्षण करुन घेऊन, गरजेनुरूप त्यामध्ये लेखकांकडून योग्य त्या सुधारणा करुन घेऊनच अर्थसंवादमध्ये प्रसिद्ध केले जातील. युजीसीचे बदलते धोरण आणि गुणवत्ता वाढीच्या अनुषंगाने सदर हितावह बदल अर्थसंवादमध्ये करण्यात आलेला आहे, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

पत पुरवठा हा 'किंमत, रोजगार आणि व्यवसायाचे जीवनरक्त' आहे.

**- हार्बर्ट हुवर**

## महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

(स्थापना : १९ नोव्हेंबर, १९६०)

**रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई – ४०० ०२५**

दूरध्वनी : ०२२-२४३२५९२९/३१ फॅक्स : ०२२-२४३२ ५९३१ ई-मेल : secretary.sblc-mh@gov.in

संकेतस्तळ : https://msblc.maharashtra.gov.in


**मंडळाच्या योजना**

१. पुस्तक प्रकाशन योजना-विविध विषयांवरील बृहद्ग्रंथ प्रकाशित करणे
२. महाराष्ट्राचे शिल्पकार चरित्रमाला योजना
३. उत्कृष्ट ग्रंथांची भाषांतरे योजना
४. ललित व ललितेतर वाङ्मयाच्या प्रकाशनार्थ अनुदान योजना
५. नवलेखक पुस्तक प्रकाशनासाठी उत्तेजनार्थ अनुदान योजना
६. नवलेखक कार्यशाळा अनुदान योजना
७. नियतकालिकांना अनुदान योजना
८. स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजना, विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार योजना, श्री.पु. भागवत पुरस्कार योजना
९. अन्य मराठी साहित्य संमेलनांना अनुदान योजना.

**मंडळाची निवडक प्रकाशने**

१. मृगपक्षिशास्त्र (मूळ संस्कृतासह) हंसदेव विरचित-संपा. मारुती चित्तमपल्ली. पं. नरसिंशास्त्री भातखंडे
२. खगोलशास्त्राचे विश्व - डॉ. जयंत विष्णू नारळीकर
३. कलेची मूलतत्त्वे (R.G.Collingwood यांच्या The Principles of Art या पुस्तकाचे भाषांतर) – स.गं. मालशे, डॉ. मिलिंद मालशे
४. मराठी चित्रपटसृष्टीचा समग्र इतिहास-रेखा देशपांडे.
५. महाराष्ट्राचा खाद्यसंस्कृतीकोश - संपा. डॉ. अनुपमा उजगरे
६. आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास खंड पहिला- के.के. चौधरी
७. श्री. चांगदेव पासष्टी (अर्थ व विवरणासहित) – स्वामी नित्यबोधानंदतीर्थ
८. आधुनिक संत आणि समाज - श्री. रवींद्र गोळे

**मंडळाची निवडक ४४४ पुस्तके ई-बुक स्वरुपात मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहेत.**

**मंडळाच्या पुस्तकांचे जिल्हानिहाय वितरक**

१. मॅजेस्टिक बुक स्टॉल, गिरगाव, मुंबई
२. आयडियल पुस्तक, दादर, मुंबई
३. लोकवाङ्मयगृह, प्रभादेवी, मुंबई.
४. लक्ष्मी बुक डेपो, शिवाजी पेठ, ठाणे.
५. अक्षर साहित्य , चिपळूण, जि. रत्नागिरी.
६. अशोक एजन्सीज्, कणकवली, जि. सिंधुदुर्ग
७. ज्योती स्टोअर्स बुकसेलर, नाशिक.
८. अक्षय लॉ बुक सेलर्स, देवपूर, धुळे.
९. मे. शारदा प्रकाशन आणि बुक डेपो, जळगाव
१०. शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, जि. अहमदनगर
११. मॅजेस्टिक बुक स्टॉल, पुणे.
१२. बलशेटवार बुक सेलर्स, सातारा.
१३. गजानन बुक स्टोअर्स, सोलापूर.
१४. मे. अजब पुस्तकालय, कोल्हापूर.
१५. मेहता बुक सेलर्स, कोल्हापूर.
१६. मे. धारा (साकेत) प्रकाशन, औरंगाबाद
१७. दीपाली बुक एजेन्सी, जालना.
१८. देबडबाड पुस्तक भांडार, नांदेड.
१९. शारदा बुक डेपो, अकोला.
२०. भारतीय पुस्तकालय, लातूर.
२१. मेसर्स प्रकाश बुक डेपो, अकोला.
२२. सरस्वती बुक्स अँड स्टेशनर्स, अमरावती.
२३. स्वराज्य भांडार महिला सेवा मंडळ, वर्धा
२४. मे. साहित्य प्रसार केंद्र, चंद्रपूर
२५. साहित्य वितरण केंद्र, चंद्रपूर
२६. मुद्रा बुक डेपो, पालघर
२७. मावळे बुक डेबो, कर्जत, जि. रायगड
२८. सुशांत बुक डेपो, नंदूरबार
२९. रत्नाकर बुक सेलर्स, मिरज, सांगली
३०. पूजा ग्रंथ वितरण, परभणी
३१. गोपाल बुक सेलर, हिंगोली
३२. अनुराग पुस्तकालय, अंबाजोगाई, बीड.
३३. टिकार बुक एम्पोरिअम, जि. बुलढाणा
३४. बालाजी बुक डेपो, वाशिम.
३५. गणेश पुस्तकालय, यवतमाळ.
३६. व्हीजन बुक शॉप, भंडारा.
३७. सनी स्टोअर्स, गोदिंया.
३८. राहुल ट्रेडिंग कंपनी ॲन्ड बुक डेपो, गडचिरोली

**शासकीय ग्रंथागारांचे पत्ते**
**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची पुस्तके मिळणाऱ्या शासकीय ग्रंथागारांचे पत्ते**

१. संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, नेताजी सुभाष मार्ग, चर्नीरोड, मुंबई ४०० ००४.
दूरध्वनी : (०२२) २३६३२६९३ २३६३०६९५, २३६३११४८, २३६३४०४९

२. व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार, फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी.पी.ओ. नजीक, पुणे ४११ ००१.
दूरध्वनी : (०२०) २६१२५०८०८

३. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार, सिव्हिल लाईन्स, नागपूर - ४४० ००१.
दूरध्वनी : (०७१२) २५६२६१५

४. सहायक संचालक, शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार, शहागंज, गांधी चौकाजवळ, औरंगाबाद ४३१००१.
दूरध्वनी : (०२४०) २३३९१०९७

५. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, ताराबाई पार्क, कोल्हापूर - ४१६ ००३.
दूरध्वनी : (०२३१) २६५०३९५ २६५०४०२

**मंडळाकडून प्रकाशित ५२४ ग्रंथांवर २५२ अधिकृत वितरकांना ४० टक्के सूट मिळेल. जास्तीत जास्त पुस्तक वितरकांनी अधिकृत वितरणासाठी सहभागी व्हावे, असे आवाहन सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी मंडळाच्या https://msblc.maharashtra.gov.in संकेतस्थळाला भेट द्या.**

Reg.No. 31918/77 / ISSN 0973-8452

# अर्थसंवादसाठी
## हार्दिक शुभेच्छा

**डॉ. मृणालिनी फडणवीस**
मा. कुलगुरू
सोलापूर

**प्रा. शिवाजी काकडे**
गढी

**डॉ. राजू पाटील**
सोलापूर

**डॉ. जनार्दन काकडे**
चंद्रपुर

**प्राचार्य डॉ. भारत खंदारे**
जालना

**डॉ. अनिल सूर्यवंशी**
अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद

**डॉ. राहुल शं. म्होपरे**
अर्जुननगर

**डॉ. के. के. पाटील**
परभणी

**डॉ. मारोती तेगमपुरे**
अंबड

**डॉ. अरुण पिसे**
धुळे

**डॉ. डी. डी. चौधरी**
अहमदपूर

**डॉ. विजय भोपाळे**
नांदेड

**डॉ. तुकाराम मुंडे**
मानवत

**डॉ. मंगल भाटे/धोरण**
अमरावती

**डॉ. अशोक खाचने**
जळगाव

**डॉ. सुहास आव्हाड**
संगमनेर

**डॉ. दिनकर टकले**
जालना

**डॉ. ए. डी. गोस्वामी**
भुसावळ

**डॉ. सुरेश ढाके**
धुळे

**डॉ. विष्णू एकनाथ घुमटकर**
खामगाव

**डॉ. माधव शिंदे**
अहमदनगर

**डॉ. जी. के. सानप**
संगमनेर